यशवंतराव चव्हाण
प्रतिष्ठान, मुंबई

# वार्तापत्र

२५ नोव्हेंबर २०१४

॥ ३० वे पुण्यस्मरण ॥







१४ नोव्हेंबर २०१४

**पंडित जवाहरलाल नेहरू**

यांना १२५ व्या जयंतीनिमित्त

वि | न | म्र | अ | भि | वा | द | न!

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम.एम.एच./बी.ओ.एम.-५३९/८५

यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी क्रमांक : २२०२८५९८, २२८५२०८१, २२०४५४६० • फॅक्स : २२८५२०८१/८२


## ※ विश्वस्त मंडळ सदस्य ※

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरूण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श.गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. बी. के. अग्रवाल | |
| १०. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| ११. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. श्री. समीर दलवाई | |
| १४. | मा. श्री. ना. धो. महानोर | |
| १५. | मा. सौ. प्रभा कुलकर्णी | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर
आयुक्त विक्रीकर विभाग

१७.

## ※ कार्यकारिणी मंडळ सदस्य ※

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरूण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. रा. सु. गवई
१०. मा. श्री. विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री. जीवनराव गोरे
१४. मा. श्री. विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पां. पाटील
१९. मा. श्री. यशवंतराव गडाख - पाटील
२०. मा. श्री. चंद्रकांत घुले - पाटील
२१. मा. अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)
महाराष्ट्र शासन प्रतिनिधी
२२. मा. श्री. नितीन करीर
आयुक्त विक्रीकर विभाग

## ※ कार्यकारी समिती ※

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरूण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सुळे
४. मा. श्री. श.गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. अजित निबांळकर
७. मा. श्री. जीवनराव गोरे
८. मा. श्री. यशवंतराव गडाख-पाटील

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## विभागीय केंद्रे

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. बाळसाहेब उर्फ शामराव पां पाटील |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. डॉ. जनार्दन वाघमारे |
| विभागीय केंद्र, अमरावती | अध्यक्ष | श्री. रा. सु. गवई |

## विविध विभाग

| | | |
|---|---|---|
| सृजन | संकल्पना व संयोजक | सौ. सुप्रिया सुळे |
| शिक्षण विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | प्रमुख संयोजक | डॉ. वसंत काळपांडे |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| | सहसंयोजक | श्री. विश्वास ठाकूर |
| | संघटक | श्री. निलेश राऊत |
| अपंग हक्क विकास मंच | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |
| वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजक | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजक | श्रीमती ममता कानडे |
| कृषी व सहकार व्यासपीठ | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर – श्री. सुशील गुप्तन |

## मुख्य कार्यालय

| | | |
|---|---|---|
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | प्रमुख लेखाधिकारी | श्री. महेश चव्हाण |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू अ‍ॅण्ड असोसिएटस |
| सांविधिक लेखा परिक्षक | | मे.सी.व्ही.के. असोसिएटस, मुंबई |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मे. वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउन्टंट |

Website : www.ybchavanpratishthan.org E-mail: ybchavan100@gmail.com

## संपादकीय

आज आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे तिसावे पुण्यस्मरण करताना हा अंक आपल्या हाती देत आहेत. चव्हाण साहेबांच्या मृत्यूनंतर तीन दशके उलटून गेली आहेत. खूप काही बदलले आहे. मात्र त्यांनी राज्याच्या आणि देशाच्या जडण-घडणीत केलेले योगदान किती मोलाचे होते याची साक्ष आजही अनेक प्रसंगात मिळते आहे. शेती, शिक्षण, सहकार, उद्योग, सामाजिक न्याय आणि ऐक्य अशा सर्व बाबतीत त्यांनी दूरद्दष्टीने आणि व्यापक भूमिकेने केलेली पायाभरणी महाराष्ट्राला अग्रेसर ठेवण्यात उपयुक्त ठरत आहे. महाराष्ट्राची सत्ता आता नव्या शिलेदारांच्या हातात आहे. यशवंतरावांच्या विचार आणि कार्याच्या परिघाबाहेरील संस्कार आणि विचारात वाढलेल्या नेत्यांनी शासनाचा कारभार सांभाळला आहे. त्यांची धोरणे आणि कार्यक्रम जसजसा पुढे येईल त्यानुसार त्याचे मापन करावे लागेल. मात्र यशवंतनीतीच्या मूळ चौकटीला कोणालाही धक्का लावता येईल, असे वाटत नाही. असो.

या वर्षीचे राज्य पारितोषिक आदरणीय शरद जोशी यांना प्रदान करण्यात येत आहे. त्यांनी केलेली वैचारिक मांडणी महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला शेती प्रश्नांबद्दल नवी दृष्टी देणारी ठरली आहे तसेच शेती प्रश्नावर अनेक जन आंदोलने त्यांच्या आणि त्यांनी उभ्या केलेल्या शेतकरी संघटनेच्या नावावर आहेत.

मतभेदासह व्यापक हितासाठी एकत्रित येण्याच्याबाबातीत मा. यशवंतरावांनी पायंडा घालून दिलेला आहे. सन्माननीय शरद जोशी यांच्याशी अनेक मतभेद असले तरी त्यांच्या योगदानाबाबत मात्र शंका घेण्याचे कारण नाही. अंकातील त्याचे सन्मानपत्र वाचताना त्यांच्या कार्याचा व विचारांचा आपणांस प्रत्यय येईल.

यावर्षी देशाचे पहिले पंतप्रधान आदरणीय पंडित नेहरू यांची १२५ वी जयंती आपण साजरी करीत आहोत. पंडितजीसारखे एक असामान्य नेतृत्व भारताला सुरुवातीलाच लाभले. ही खरोखर भाग्याची गोष्ट आहे. भारतीय समाजाबद्दल प्रचंड आस्था आणि अभ्यास आणि जागतिक इतिहासाचे व्यासंग हे त्यांच्या व्यक्तीत्वाचे मौलिक पैलू होते. त्यांना अभिवादन करताना त्यांनी स्वातंत्र्यदिनी (खरं तर मध्यरात्री) लाल किल्ल्यावरुन केलेल्या भाषणाचा या अंकात समावेश केला आहे. मा. यशवंतराव चव्हाण साहेब आणि पंडीतजी यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. या अंकामध्ये आदरणीय यशवंतराव यांनी पंडीतजींबद्दल लिहीलेला लेख समाविष्ट केला आहे.

देवराष्ट्रे (जि. सांगली) या यशवंतरावांच्या जन्मस्थळांचे उत्तम अशा स्मृतिसदनात रुपांतर करण्यात आले आहे. शेकडो विद्यार्थी व स्त्री-पुरुष तेथे नियमित भेटी देत आहेत. तसेच प्रतिष्ठानही तेथे अनेक उपक्रम राबवित आहे. त्याचाही वृत्तांत अंकात दिला आहे.

प्रतिष्ठानचे नियमित उपक्रम नेहमीच्या उत्साहाने सुरु आहेतच आपला सहभाग आणि सूचना आम्हास उत्साहवर्धक व मार्गदर्शक ठरतील ...

मानद संपादक

# वार्तापत्र

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**

वर्ष : १८ वे ◆ अंक : ३४ वा ◆ प्रकाशन : २५ नोव्हेंबर २०१४ मा. यशवंतराव चव्हाण यांची ३०वी पुण्यतिथी

◆
सल्लागार
**मा. शरद काळे**
**मा. हेमंत टकले**

◆
मानद संपादक
**सुप्रिया सुळे**

◆
कार्यकारी संपादक
**दत्ता बाळसराफ**

◆
सहसंपादक
**सुरेश पाटील**

◆
विशेष सहाय्य
**निलेश पुराडकर**
**अनिल पाझारे**
**माधव सूर्यवंशी**
**रमेश मोरे**

◆
सहाय्यक
**मीनल सावंत**

◆
**केंद्रातील सहकारी :**
संजय बनसोडे, अरूण शिंदे, विद्याधर खंडे, संगीता गवारे, प्रशांत राऊत, स्मिता रायकर, महेश चौधरी, यतीन घोडेकर, राजेंद्र रूपवते, शोभा लोंढे, अनिल चिंदरकर, सुकेशनी मर्चंडे-शेवडे, सुहास बामल, प्रियंका देसाई, विजय नागरे, जयेश गुजराथी, विश्वदत्त मुळे, सुरेश कोठावळे, महादेव सगरे, सुरेश सावंत, अशोक जाधव, प्रकाश आंबेरकर, मंगेश शिंदे, सतिश लाड यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

## अनुक्रम...


- Tryst with Destiny ..... ५
- यशवंतजींच्या नजरेतून पंडित नेहरू ..... ७
- नियोजन, मनुष्यबळ व शेती – स्व. यशवंतराव चव्हाण लेख ..... ८
- यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन राज्यस्तरीय पारितोषिक मानपत्र ..... १३
- नवमहाराष्ट्र युवा अभियान ..... १५
- अपंग हक्क विकास मंच ..... २०
- शिक्षण विकास मंच ..... २६
- सृजन ..... ३०
- वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान ..... ३१
- कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम ..... ३३
- महाराष्ट्र महिला व्यासपीठ ..... ३७
- यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय ..... ३९

**विभागीय केंद्र कार्यवृत्त**

- विभागीय केंद्र, कोकण ..... ४४
- विभागीय केंद्र, औरंगाबाद ..... ५०
- विभागीय केंद्र, पुणे ..... ५४
- विभागीय केंद्र, नागपूर ..... ५९
- विभागीय केंद्र, कराड ..... ६२
- विभागीय केंद्र, नाशिक ..... ६४
- विभागीय केंद्र, लातूर ..... ७३
- माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी ..... ७७
- यशवंतराव चव्हाण यांचे जन्मघर उद्घाटन समारंभ वृत्तांत ..... ७९


मुखपृष्ठ व मलपृष्ठ रचना : इंडियन मॅजिक आय प्रा. लि. पुणे, अक्षरजुळणी आणि छपाई : हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-कार्यकारी संपादक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, नाईन स्क्वेअर प्रिंटस् (इंडिया) प्रायव्हेट लि., २४ बी, राजा बहादूर कपाऊंड, अंबालाल दोशी मार्ग, १०३, तळ मजला, फोर्ट, मुंबई - २३, दूरध्वनी :- ४०७८५६५६ येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई-४०० ०२१ येथे प्रकाशित केले. नोंदणी क्रं. ७१५८७/९९.

# Tryst with Destiny...

**Speech by Pandit Jawaharlal Nehru on the eve of India's independence.**

Long years ago we made a tryst with destiny, and now the time comes when we shall redeem our pledge, not wholly or in full measure, but very substantially. At the stroke of the midnight hour, when the world sleeps, India will awake to life and freedom.

A moment comes, which comes but rarely in history, when we step out from the old to the new, when an age ends, and when the soul of a nation, long suppressed, finds utterance. It is fitting that at this solemn moment, we take the pledge of dedication to the service of India and her people and to the still larger cause of humanity.

At the dawn of history, India started on her unending quest, and trackless centuries are filled with her striving and grandeur of her success and failures. Through good and ill fortune alike, she has never lost sight of that quest, forgotten the ideals which gave her strength.

We end today a period of misfortunes and India discovers herself again. The achievement we celebrate today is but a step, an opening of opportunity to the greater triumphs and achievements that await us. Are we brave enough and wise enough to grasp this opportunity and accept the challenge of the future?

Freedom and power bring responsibility. The responsibility rests upon this Assembly, a sovereign body representing the sovereign people of India. Before the birth of freedom, we have endured all the pains of labour and our hearts are heavy with the memory of this sorrrow. Some of those pains continue even now. Nevertheless, the past is over and it is the future that beckons us now.

That future is not one of ease or resting but of incessant striving so that we may fulfill the pledges we have so often taken and the one we shall take today. The service of India means, the service of the millions who suffer. It means the ending of poverty and ignorance and poverty and disease and inequality of opportunity.

The ambition of the greatest men of our generation has been to wipe every tear from every eye. That may be beyond us, but as long as there are tears and suffering, so long our work will not be over.

And so we have to labour and to work, and to work hard, to give reality to our dreams. Those dreams are for India, but they are also for the world, for all the nations and peoples are too closely knit together today for any one of them to imagine that it can live apart. Peace is said to be indivisible, so is freedom, so is prosperity now, and also is disaster in this one world that can no longer be split into isolated fragments.

To the people of India, whose representatives we are, we make an appeal to join us with faith and confidence in this great adventure. This is no time for petty and destructive criticism, no time for ill-will or blaming others. We have to build the noble mansion of free India where all her children may dwell.

The appointed day has come -the day appointed by destiny- and India stands forth again, after long slumber and struggle, awake, vital, free and independent. The past clings on to us still in some

measure and we have to do much before we redeem the pledges we have so often taken. Yet the turning-point is past, and history begins anew for us, the history which we shall live and act and others will write about.

It is a fateful moment for us in India, for all Asia and for the world. A new star rises, the star of freedom in the East, a new hope comes into being, a vision long cherished materializes. May the star never set and that hope never be betrayed !

We rejoice in that freedom, even though clouds surround us, and many of our people are sorrow-stricken and difficult problems encompass us. But freedom brings responsibilities and burdens and we have to face them in the spirit of a free and disciplined people.

On this day our first thoughts go to the architect of this freedom, the Father of our Nation, who, embodying the old spirit of India, held aloft the torch of freedom and lighted up the darkness that surrounded us.

We have often been unworthy followers of his and have strayed from his message, but not only we but succeeding generations will remember this message and bear the imprint in their hearts of this great son of India, magnificent in his faith and strength and courage and humility.

We shall never allow that torch of freedom to be blown out, however high the wind or stormy the tempest.Our next thoughts must be of the unknown volunteers and soldiers of freedom who, without praise or reward, have served India even unto death.

We think also of our brothers and sisters who have been cut off from us by political boundaries and who unhappily cannot share at present in the freedom that has come. They are of us and will remain of us whatever may happen, and we shall be sharers in their good [or] ill fortune alike.

The future beckons to us. Whither do we go and what shall be our endeavour? To bring freedom and opportunity to the common man, to the peasants and workers of India; to fight and end poverty and ignorance and disease; to build up a prosperous, democratic and progressive nation, and to create social, economic and political institutions which will ensure justice and fullness of life to every man and woman.

We have hard work ahead. There is no resting for any one of us till we redeem our pledge in full, till we make all the people of India what destiny intended them to be. We are citizens of a great country on the verge of bold advance, and we have to live up to that high standard.

All of us, to whatever religion we may belong, are equally the children of India with equal rights, privileges and obligations. We cannot encourage communalism or narrow-mindedness, for no nation can be great whose people are narrow in thought or in action.

To the nations and peoples of the world we send greetings and pledge ourselves to cooperate with them in furthering peace, freedom and democracy.

And to India, our much-loved motherland, the ancient, the eternal and the ever-new, we pay our reverent homage and we bind ourselves afresh to her service.

**Jai Hind.....**

# यशवंतजींच्या नजरेतून पंडित नेहरु ....

.....पंडितजींच्या मनाच्या मोकळेपणाच्या कितीतरी हकिगती आज माझ्या मनात दाटून येत आहेत. आणखी एक आठवण, प्रतापगडच्या मोर्च्याच्या वेळची येथेच सांगून टाकतो. पुण्याहून आम्ही प्रतापगडाकडे निघालो. राज्यपाल श्रीप्रकाशजी एका कडेला, मध्ये मी व दुसऱ्या कडेला पंडितजी असे आम्ही गाडीत बसलेलो होतो. वाई जवळ आली तसे पंडित नेहरुंना कडेला बसू न देता मध्ये बसवावे, असे माझ्या मनात आले व मी तसे पंडितजींना म्हटले. वाईजवळ निदर्शने होणार, निदर्शकांची गर्दी रस्त्यावर असणार, तेव्हा कडेला पंडितजी असू नयेत, हा माझ्या म्हणण्यातील अर्थ त्यांच्या बरोबर ध्यानात आला होता. पंडितजी म्हणाले,

'गैरसोयीच्या जागी आम्ही दोघे बसलो आहोत. आमच्यापैकी जास्त वृद्ध कोण आहे, त्याने प्रथम सोयीच्या जागेवर बसावे', असे म्हणून श्रीप्रकाशजींना त्यांनी कडेच्या जागेवरुन मध्ये बसवले आणि स्वतः त्याच जागी बसून राहिले.

प्रतापगडच्या शिवपुतळयाचे अनावरण झाल्यावर आम्ही परत निघालो, तेव्हाची एक आठवण पंडितजींच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीची व ऐतिहासिक उपपत्ती लावण्याच्या चिंतनशील मनाची द्योतक आहे. प्रतापगडच्या मोर्च्याचा, निदर्शनांचा कार्यक्रम संपवून निदर्शक गटागटाने परतत होते. काही सायकलींवरुन चालले होते. जवळ जवळच्या गावांतील मंडळी पायीच चालली होती. पण निदर्शनांच्या वातावरणातून ती अजून बाहेर आलेली नव्हती. अशाच वेळी आमची मोटार जाताना दिसली, म्हणजे त्यांना मोठा जोश चढे आणि मोठमोठया घोषणांनी ते वातावरण दणाणून सोडत.

पं. नेहरु हा सगळा प्रकार न्याहाळत होते. बऱ्याच वेळाने ते म्हणाले,

'तुम्हाला गंमत सांगतो. पंजाबचे लोकही खूप संतापतात. तुमच्या मराठयांप्रमाणेच तेही रागीट आहेत. पण कितीही रागावले, तरी लवकर थंड होतात. मराठयांचे तसे नाही. ते रागावतात उशिरा व थंड व्हायलाही त्यांना वेळच लागतो. लवकर संताप विसरणे त्यांना शक्य होत नाही, असे दिसते.'

जवळूनच घोषणा देत चाललेल्या निदर्शकांच्या एका पथकाकडे बोट दाखवून ते म्हणाले,

''बघा, निदर्शने होऊन तीन तास झाले, तरी त्यांच्या घोषणांचा जोर काही कमी झालेला नाही.''

१९६२ च्या नोव्हेंबरमध्ये मी दिल्लीला गेलो आणि पंडितजींच्या नित्य सहवासाचा, विचारविनिमय – मार्गदर्शन यांचा लाभ मला झाला. १९६४ च्या मे महिन्यापर्यंत म्हणजे जवळजवळ दीड वर्ष मी त्यांना अगदी जवळून पाहिले. सहा महिने ते चांगले क्रियाशील होते. पुढे ते झपाटयाने थकत गेले आणि घडणाऱ्या घटनांचे तटस्थ साक्षीदार म्हणून वावरताना आम्ही पाहिले.

१९३१ साली कराडच्या स्टेशनवर एक तरुण विद्यार्थी म्हणून पं. नेहरुचे दर्शन घेतले होते. तेव्हा आपल्या या नेत्याच्या अगदी निकट, त्यांचा सहकारी म्हणून, मित्र म्हणून राहण्याची संधी आपल्याला मिळेल, अशी कल्पना स्वप्नातसुद्धा मला शिवली नव्हती. पण त्यानंतर त्यांचा सहकारी म्हणून काम करण्याचे भाग्य माझ्या वाट्यास आले. त्यांच्यासमवेत काम करताना माझे मन धन्यता व कृतज्ञता अशा संमिश्र भावनांनी भरुन येत असे. विद्यार्थी असताना आम्ही आमचा नेता म्हणून त्यांना मानले, ते त्यांचे पुरोगाती विचार, इतिहासाकडे पाहण्याची त्यांची शास्त्रीय दृष्टी, भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची जगाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात त्यांनी केलेली मांडणी या सगळ्यांचे आम्हांला आकर्षण होते, यामुळे आज इतक्या वर्षानंतर, आम्ही चुकीच्या मार्गाकडे आकर्षित झालो नाही, भलत्याच राजकीय दैवताच्या मागे लागलो नाही, अशा समाधानात आम्ही आहोत. अनुयायांच्या विश्वासास पात्र ठरणे ही यशस्वी नेतृत्वाची एक कसोटी मानली, तर पं. नेहरुंचे यश अलौकिकच म्हणावे लागेल.

'ऋणानुबंध'
या ग्रंथातून साभार

❑❑❑

# नियोजन, मनुष्यबळ व शेती

**– स्व. यशवंतराव चव्हाण**

गेल्या दोन–तीन दिवसांमध्ये नियोजनावर आपण अनेक चर्चा ऐकल्या परंतु नियोजन हा विषयच इतका नित्य नवा आहे कीं, त्याच्यासंबंधीची चर्चा कधी कंटाळवाणी वाटत नाही. आकाशाकडे माणसाने पाहिल्यानंतर ज्याच्या त्याच्या नजरेप्रमाणे त्याला ते दिसते. जसे आकाश विशाल आहे तसाच नियोजनाचा हा प्रश्नही विशाल आहे. असंख्य दृष्टिकोन आणि असंख्य प्रश्न यांतून असंख्य माणसांच्या जीवनास पूर्णतया स्पर्श करणारा हा विषय असल्यामुळे त्याच्यासंबंधी कधी कंटाळा येत नाही. पण नियोजनाचा निश्चित अर्थ आपण आपल्या मनाशी समजावून घेतला पाहिजे. विशेषतः महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर जी परिस्थिति महाराष्ट्रात आहे तिच्या पार्श्वभूमीवर आणि देशांतील नियोजनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या जनतेचे नियोजनाच्या बाबतींत आजचे कर्तव्य काय आहे हे आपण पाहिले पाहिजे.

मी तपशिलाच्या प्रश्नांत फारसा जाऊ इच्छीत नाही. या प्रश्नाची शास्त्रीय चर्चा करण्यापेक्षा त्याच्या पाठीमागे जी दोन मूलभूत तत्त्वे आहेत त्यांचा आपण विचार केला पाहिजे. मी अगदी सामान्य माणसाच्या दृष्टीने नियोजनाकडे पाहण्याचा प्रयत्न करीत असतो. आमच्या देशामध्ये जी साधने आहेत त्या साधनांचा जास्तीत जास्त विकास करून आमच्या जीवनाला समृद्ध बनविण्याचा नियोजन हा एक प्रयत्न आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे या प्रयत्नामधून निर्माण होणारी जी संपत्ति आहे, जी शक्ति आहे, जे सामर्थ्य आहे, त्याचा फायदा सर्वसामान्य माणसांस मिळेल याचीहि काळजी नियोजनामध्ये घेतली पाहिजे. नियोजनाच्या बाबतींतला हा सुद्धां अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

नियोजनाच्या दृष्टीने महाराष्ट्राजवळ कोणती साधने आहेत? जमीन, पाणी, जमिनीखालचे खनिज पदार्थ जे काही असतील ते, आणि मनुष्यशक्ति. मला पहिल्याप्रथम एक गोष्ट सांगावयाची आहे आणि ती ही की, आमची जी साधने आहेत त्या साधनांचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर करणे हाच आपल्या दृष्टीने खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. परंतु नियोजनाच्या संदर्भात आपले मनुष्यबळ व आपली शेती हीच आज आपली मुख्य साधने असल्याकारणाने त्यांच्या प्रश्नांसंबंधानेच मुख्यतः मी आज बोलणार आहे. आमचे मनुष्यबळ कसे आहे, आमची पाण्याची साधने काय आहेत, आमची जमिनीची साधने काय आहेत हे आपण प्रथम पाहिले पाहिजे. आतापर्यंत आपण महाराष्ट्राचे जे चित्र पाहिले ते जुन्या इतिहासांतल्या सिंहगडावरच्या, प्रतापगडावरच्या आणि शिवनेरीवरच्या महाराष्ट्राचे. पण आतांच्या महाराष्ट्राचे जे चित्र 'आहे ते आपण जरा पाहा. ते चित्र अगदी वेगळे आहे. आतांचा हा महाराष्ट्र खेड्यापाड्यांत पसरलेला आहे, जमीनजुमल्यांत वसतो आहे, जोंधळा, शाळू, कापूस, ऊस ही पिके तो पिकवितो आहे. आणि त्याला मिळणारे पाणीहि पाहा. हे चित्र पाहिल्यानंतर बुद्धीला थोडीशी का होईना, एक प्रकारची जागृति येईल. आपल्याजवळ काही तरी अपरंपार आहे असे समजू नका. जे आहे ते मर्यादित आहे. पाणी मर्यादित आहे, जमिनीची शक्ति मर्यादित आहे आणि या मर्यादित शक्तीचाहि उपयोग केलेला नाही अशी ही परिस्थिति आहे. ही परिस्थिति बदलण्यासाठी आपणांला पांच, दहा, पंधरा वर्षे प्रयत्न करावयाचा आहे.

माझ्या मते अतिशय चांगली साधनसंपत्ति महाराष्ट्रात जर कुठची असेल तर ती महाराष्ट्राचे मनुष्यबळ ही आहे. परंतु येथील माणसे काही उद्योग करीत नाहीत, परिश्रम करीत नाहीत, असा एक दृष्टिकोन मांडण्यांत येतो. मला हे मान्य नाही. अर्थात् जगांत काही आळशी माणसे असतीलहि. त्यांच्यासंबंधी वकीलपत्र घेऊन मी बोलत नाही. पण खेड्यापाड्यांमध्ये पावसांत शेतीमध्ये काम करणारा माणूस केवळ आळशीपणामुळे घरी राहिला आहे हे म्हणणे योग्य दिसत नाही. तो बारा महिन्यांतले तीन महिने काम करतो आणि बाकीचे महिने तो काम करीत नाही याचे कारण त्याला उपयोगी पडेल असे काम मिळण्यासारखी परिस्थिति नाही. श्रमाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे, असे काही पुढारी ''आराम हराम है'' ह्या पंडितजींच्या भाषेत किंवा विनोबाजींच्या श्रमदानाच्या

भाषेत सांगत असतात त्याला वेगळाच अर्थ आहे. ते पण एक सत्य आहे. परंतु माणसे हातपाय पसरून आपली खेड्यांमध्ये बसलेली आहेत, तोंडापर्यंत गंगा येऊनहि ती आपले तोंड उघडत नाहीत अशी काही परिस्थिति नाही. आपल्या समाजाचे आपण असे चित्र रंगविणार असला तर ते मला मंजूर नाही.

वस्तुस्थिति अशी आहे की, इतरांकडे जशी माणसे आहेत तशीच आपल्याकडेही आहेत हे जरी खरे असले तरी आम्हांला अभिमान वाटावा असे आमच्याकडील मनुष्यबळ आहे असे मला वाटते. आणि हे आपण समजून घेतले पाहिजे. छोटा शेतकरी, खेड्यापाड्यांतून काम करणारा शेतावरचा मजूर, गिरणीतून काम करणारा कामगार, स्वतःचे हात व स्वतःची छोटी अक्कल वापरणारा छोटा तंत्रज्ञ, हुशार पंडित, लक्ष्मणशास्त्री जोशी ज्यांचे प्रतिनिधि आहेत ते बुद्धिमान विचारवंत, छोटेमोठे इंजिनिअर, डॉक्टर ही वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणारी सगळी माणसे पाहिल्यानंतर मला असे वाटते की, आमच्याजवळ जबरदस्त मनुष्यबळ आहे. आपली ही साधने पाहून आपण आपल्या नियोजनाचा विचार केला पाहिजे.

या दृष्टीने शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. मघाशी श्री. बाळासाहेब देसाई यांनी शिक्षणासंबंधीचा जो दृष्टिकोन सांगितला तो मला मंजूर आहे. त्याच्या पाठीमागचा विचार मला सांगावयाचा आहे. तो विचार असा आहे की, आपण शिक्षणाकडे जे पाहतो ते केवळ गरिबाच्या मुलाला शिक्षण मिळाले पाहिजे आणि श्रीमंताच्या मुलाला ते मिळाले नाही तरी चालेल अशा दृष्टीने नाही. आमच्यामध्ये जे चांगले आहे त्याला जास्तीत जास्त वाव मिळाला पाहिजे, अशा दृष्टीने आपण शिक्षणाकडे पाहिले पाहिजे. मी आपणांला सांगू इच्छितो की, शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने मी पाहता नाही. माझ्या मते शिक्षण हें आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ति निर्माण करण्याकरितां आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हांला या साधनाचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. खेड्यांत बिजली नेऊन पोहोंचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही, त्याचप्रमाणे आमचा नापीक पडलेला मनुष्यबळाचा हा जो मोठा थोरला साधनसंपत्तीचा भाग आहे त्यांत शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही. शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वतःचा हा असा दृष्टिकोन आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, शेतीचे औद्योगीकरण करण्याचा कार्यक्रम जितका महत्त्वाचा आहे, तितकाच शिक्षणाचा हा कार्यक्रम महाराष्ट्रांत महत्त्वाचा आहे.

मग हे शिक्षण कोणत्या प्रकारचे असावे हा विचार ओघानेच येतो. हे शिक्षण म्हणजे निव्वळ आपल्या शाळा उघडल्या आहेत आणि मुले शाळेत जात आहेत, परंतु मुले शाळेत काय करतात हे आपल्याला माहीत नाही, अशी परिस्थिति नव्हे. तर या देशांतील किंवा या राज्यांतील समाजोपयोगी साधनांचा वापर करण्याइतकी शक्ति मुलामध्ये येईल अशा तऱ्हेने मुलगा शिक्षण घेतो की नाही हे पाहण्याचे काम आतां तुम्हांआम्हांला केले पाहिजे. मी या प्रश्नाला फक्त येथे स्पर्श करतो आणि तो सोडून देतो. परंतु शिक्षणाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या आताच्या संदर्भांत अत्यंत क्रांतिकारक प्रश्न आहे असे मी म्हणतो. हा विचार माझ्या मनांत अलीकडे फार तीव्रतेनें येतो याचे कारण इतर साधनांचा वापर करण्याची आपली अपेक्षा काही मर्यादेपर्यंतच आहे हें आपण समजले पाहिजे.

आता आपण शेतीच्या प्रश्नांकडे वळू या. महाराष्ट्रांतील जमीन आपणा सर्वांना माहीत आहे. तिचे वर्णन मी केले पाहिजे असे नाही. सह्याद्रीच्या पलीकडची जमीन म्हणजे कोंकणांतला कातळ, तो आपल्या परिचयाचा आहे. नद्यांच्या कांठचा सुपीक भाग सोडला व पलीकडे गेलो म्हणजे कमी पावसाचा भाग सुरू होतो. मराठवाड्यांतील गोदावरीच्या कांठचा भाग चांगला आहे आणि विदर्भामध्ये काळी जमीन पुष्कळ व चांगली आहे. परंतु तेथे पाटबंधाऱ्यांची शक्यता अतिशय कमी आहे. जिथे पाणी आहे तिथे ते वापरण्याची शक्यता कमी आहे आणि जिथे पाणी कमी आहे तिथे त्याची गरज जास्ती आहे; एवढेच नव्हे तर तिथे पाणी मिळेल की नाही अशी शंका निर्माण झाली आहे. ही जमिनीची व पाण्याची मर्यादा आपणांला मुळांतच समजली पाहिजे.

याच पार्श्वभूमीवर आपण आपल्या शेतीच्या प्रश्नांचा विचार केला पाहिजे. शेतीचे अनेक प्रश्न आहेत. प्रथम आपण शेतीच्या मालकीचा प्रश्न घेऊ. कुळकायदा फार चांगल्या प्रकारे हाताळणारे राज्य असा हिंदुस्तानमध्ये गेल्या दहा-बारा वर्षांचा आपला लौकिक आहे. कुळकायद्याचा आपल्याला चांगला अनुभव आहे. त्याच अनुभवासंबंधी परत एकदा विचार करण्याची पाळी

आली आहे. आज आपण जमिनीच्या कमाल मर्यादेच्या प्रश्नाचा विचार करीत आहोत. कमाल मर्यादेचे हे तत्त्व स्वीकारले पाहिजे याबद्दल मला शंका नाही. ते कोणत्या पद्धतीने स्वीकारावे, कसे स्वीकारावे, याबद्दल मी आज माझे मत देत नाही. उद्या आपले महसूल मंत्री श्री. वसंतराव नाईक त्यासंबंधी जो दृष्टिकोन आपल्यासमोर मांडतील तो आपणांला स्वीकारावा लागेल. राष्ट्राने स्वीकारलेले असे ते धोरण असल्यामुळे त्याच्या पाठोपाठ आपणांला गेले पाहिजे. आता त्यामध्ये काय असावे, कोणती पद्धत असावी वगैरे प्रश्न आपण सोडून देऊ. पण एक गोष्ट मात्र निश्चित की, शेती कसणारा माणूस हा शेतमालक असला पाहिजे आणि त्याच्या शेतीच्या प्रयत्नाला सर्व्हिस कोऑपरेटिव्हज्‌ची म्हणजे सेवा सहकारी प्रयत्नांची जोड देऊन त्या प्रयत्नांची परिणति शेवटी आम्हांला सहकारी शेतीत केली पाहिजे. त्या विकासाचा क्रम काय असावा, त्याची गति किती असावी, ती कशी वाढवावी, केव्हां वाढवावी वगैरे प्रश्न त्यांतून उद्‌भवणार आहेतच. पण हे जे चित्र आहे ते आपल्याला नेहमीं मनांत ठेवावे लागेल. यासंबंधानें कसलीहि शंका बाळगण्याचे कारण नाही. म्हणून शेती कसणारा हा शेतीचा मालक असला पाहिजे या दृष्टीने, आपण आपापल्या जिल्ह्यांत परत जाल तेव्हा हा आपला एक मूलभूत कार्यक्रम असल्यामुळे तेथील परिस्थितीची आपण पाहणी करा. आपण ज्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची सेवा करण्याची घोषणा करीत आहांत तेथील शेतकऱ्यांचा हा मूलभूत प्रश्न आहे. त्यासंबंधानें काय प्रगति झाली, काय गत झाली याचा आपण विचार केला पाहिजे. या प्रश्नाबाबत फार घबराट झाली म्हणून किंवा बागायतदारांनी फार टिका केली म्हणून घाबरण्याचे कांही कारण आहे असे नव्हे. कोणी तरी तिडिकीने, पोटतिडिकीने जरा आपले म्हणणे मांडले पाहिजे. रागाचा हा प्रश्न थोड्याशा निराळ्या अर्थाने मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. गेले आठपंधरा दिवस हा प्रश्न मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. याचा अर्थ तशी कांही भयानक परिस्थिति निर्माण झाली आहे, असाहि कृपा करून आपण करूं नका. जागृतपणें आम्हांला या प्रश्नाचा पाठपुरावा केला पाहिजे, म्हणून ही गोष्ट मी आपल्यापुढें आग्रहानें मांडतों. असा हा जमिनीच्या मालकीचा प्रश्न झाला.

त्यानंतर जमिनीच्या विकासाचा प्रश्न येतो. आपल्या देशांतील शेतीच्या प्रश्नाशी निगडित असणारा अतिशय महत्त्वाचा असा हा प्रश्न आहे. गेली शेकडों वर्षे, कदाचित् हजारो वर्षे शेतजमिनीच्या विकासाचा हा प्रश्न तसाच राहिलेला आहे. आम्ही आजपर्यंत ज्याकडे फार दुर्लक्ष केले असा हा प्रश्न आहे. आजहि आपल्या देशांत कोट्यवधि एकर जमीन–आज मला निश्चित आंकडा माहीत नाही – तशीच विकास न होता राहिली आहे. विशाल मुंबई राज्य होतें त्यावेळी हिशेब करून मी पाहिले की, जिथे बंडिंग करावे लागेल, जिच्याबाबत भूसंरक्षणाची उपाययोजना करावी लागेल अशी चार कोटि एकर जमीन मुंबई राज्यांत होती. वसंतराव नाइकांनी आतांच सांगितल्याप्रमाणें आजहि साडेतीन कोटि एकर जमीन महाराष्ट्रांत अशी आहे की, जी गळक्या भांड्यासारखी आहे. मथुरेची गवळण पाणी भरून डोक्यावर हंडा घेऊन निघाली आणि घरीं येऊन पाहते तो आपल्या डोक्यावरच्या हंड्यामध्यें पाणी नाही. तसेंच आपल्या शेतीचें झालें आहे. दरवर्षी मृग नक्षत्रापासून हस्त नक्षत्रापर्यंत भरलेल्या नक्षत्रांच्या बाजारामध्यें आपल्या डोक्यावर भांडे घेऊन जाते बिचारी आमची शेती. पण त्यांत शेवटी कांही शिल्लक राहत नाही. आमच्या महाराष्ट्राच्या शेतीचा हा मथुरेचा बाजार झालेला आहे. आणि आज एक वर्ष नाही, दोन वर्षे नाही, तर गेली कित्येक शतके हे असेंच चालले आहे.

शेतीशीं निगडित असलेला भूमिहीनांचा प्रश्नही आपल्या महाराष्ट्रांत एक मोठाच प्रश्न होऊन बसला आहे. आपण ज्या शक्तिमान नवसमाजाची उभारणी करूं इच्छितों त्या समाजाचा, शेतांत कष्ट करणारा, राबणारा शेतकरी समाज हा जणुं कणाच आहे. या शेतकरी समाजामध्ये भूमिहीनांचाहि समावेश होतो. आणि म्हणून आमच्याजवळ जी जमीन असेल तिच्या टक्क्या–दोन–टक्क्यांपर्यंत जी मिळेल ती जमीन आपण भूमिहीनांकरितां दिली पाहिजे. आणि त्याचबरोबर ह्या भूमिहीनांकरितां छोट्या छोट्या उद्योगधंद्यांचा नवीन कार्यक्रम तयार केला पाहिजे आणि त्याला प्राधान्य दिले पाहिजे. कारण ह्या सगळ्या योजनांमध्ये भूमिहीनांकडे दुर्लक्ष झाले अशी जी टीका सर्वत्र ऐकू येते ती रास्त टीका आहे यांत शंका नाही. परंतु अगोदरच जो शेतकरी उपाशी आहे त्याच्याच घरामध्ये घुसून हा प्रश्न सुटणार नाही. २० टक्के जमीन ५० ते ६० टक्के शेतकऱ्यांच्या जवळ आहे. राहिलेली ८० टक्के जमीन काही थोड्या लोकांच्या हातांत आहे. म्हणजे जास्त जमीन थोड्या लोकांच्या हातांत, आणि थोडी

जमीन जास्त लोकांच्या हातांत आहे. हा जो हिशेब आहे तो ऐकला म्हणजे माणसाला फसल्यासारखे वाटते. पण यामध्ये फारसा जीव आहे असे नाही. याचे कारण महाराष्ट्रामध्ये सरंजामी पद्धत नाही हे आहे. त्यामुळें एक मर्यादित स्वरूपाची कमाल मर्यादाच आपणांस स्वीकारावी लागेल. परंतु या मार्गाने फार जमीन वांटावयास मिळणार आहे अशांतला भाग नाही. मला येथें सांगितले पाहिजे की, जमिनीची फेरवांटणी हा महाराष्ट्राच्या शेतीच्या पुनर्रचनेमध्ये मेजर प्रोग्राम-मोठा कार्यक्रम होऊ शकत नाही. ही गोष्ट जितक्या लवकर आम्ही स्वीकारूं तितके अधिक बरे. कारण त्यानंतर त्याच्यापुढचा कार्यक्रम आपणांला सुचवावा लागेल.

परंतु भूमिहीनांचा प्रश्न मी माझ्या समजुतीप्रमाणे, माझ्या शक्तीप्रमाणे सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. सरकारजवळ जंगल खात्याची आणि महसूल खात्याची जी जमीन आहे ती भूमिहीन लोकांना देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत. एवढेंच नव्हे तर गेल्या सहा महिन्यांत फारच चांगला व मोठ्या प्रमाणांत हा प्रयत्न करण्यांत आलेला आहे, याबद्दल महसूल खात्याच्या मंत्र्यांना आणि परंपरागत आळस सोडून देऊन जलद गतीने काम चालू केल्याबद्दल खात्याला खरोखरच धन्यवाद द्यावयास पाहिजेत.

महाराष्ट्रांतील शेतीच्या बाबतींत आणखी एक महत्त्वाचा जो प्रश्न आहे तो शेतीच्या आधुनिकीकरणाचा आहे. शेतीची जमीन वाढविण्यानेच धान्योत्पादनाचा प्रश्न सुटेल असे म्हणणे बरोबर नाही. आधुनिकीकरणाच्या बाबतींत इतर देशांच्या मानाने आपण फार मागे आहोत हे कबूल केले पाहिजे. आपण आपली फार स्तुति करीत असतो. आमचे राज्य फार पुढारलेले, प्रगतिपर आहे असे आपण म्हणत असतो. परंतु आम्हांला कोणाचीहि फसवणूक करण्याची इच्छा नाही. मागासलेले राज्य असेच महाराष्ट्र राज्याचे वर्णन केले पाहिजे. मुंबई शहर सोडले तर महाराष्ट्रांत आहे काय? ओसाड मैदाने, दुष्काळी भाग आणि आम्ही अभिमान बाळगावा असे जुने किल्ले. महाराष्ट्रांत नद्या पुष्कळ आहोत, पण त्या छोट्या छोट्या आहेत. आणि आमच्या जमिनीची भूक तर मोठी आहे. म्हणून पावसाळ्यांत जे पाणी मिळेल ते चार महिने साठवून ठेवावे आणि पुढच्या आठ महिन्यांत ते वापरावे असा महाराष्ट्राचा गरिबीचा संसार आहे. म्हणून महाराष्ट्रांत पाटबंधाऱ्यांच्या सोयी उपलब्ध करून देणे पार महत्त्वाचे आहे. परंतु त्यांतहि इथे धरण करूं नका, तिथे धरण करु नका, अशा प्रकारचे अडथळे निर्माण करण्यांत येत असल्याचे दिसून येते. मला एवढेंच सांगावयाचे आहे की, शेतीच्या उत्पादनाकरितां जास्तींत जास्त आधुनिक साहित्य उपलब्ध करून देणें हा आजचा महत्त्वाचा प्रश्न आहे. म्हणून ज्यायोगे लोकांचे मन विचलित होईल, लोकांच्या मनांत संशय निर्माण होईल अशा गोष्टी आपण सोडून दिल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या कोणत्याहि घोषणा करणे चुकीचें होईल असे मला नम्रपणें सुचवावयाचे आहे.

आपली भरभराट ही शेतीवरच अवलंबून आहे. याच्याहि पुढे जाऊन मी असे म्हणेन की आपले औद्योगीकरणहि आपल्या शेतीच्या भरभराटीवर अवलंबून आहे. आपल्या देशाच्या आर्थिक यंत्रणेंत शेतीला मध्यवर्ती स्थान आहे. शेतीच्या सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करून जोमदार लागवड करणे ही शेतमालाचे उत्पादन वाढविण्याची गुरुकिल्ली आहे. आपल्या शेतकऱ्यांची सध्यांची जी आर्थिक परिस्थिति आहे ती लक्षांत घेता आपल्या शेतकऱ्यांना एकत्र काम करूनच स्वतःसाठी आणि देशासाठी अधिक धान्योत्पादन करणे सोपे जाईल. सहकारी शेती म्हणजे सामुदायिक शेती नव्हे. शेतकऱ्यांना आंधळेपणानें मोठा धोका पत्करावा लागणार आहे असेहि त्यांत काही नाही. सेवा सहकारी सोसायट्या स्थापून याबाबतची सुरुवात करावयाची आहे. आणि त्यांचे काम सुरू झालें म्हणजे जमीनमालकांची संयुक्त मालकी असलेली व त्यांच्या संयुक्त व्यवस्थेखालीं काम करणारी स्वयंस्फूर्त सहकारी शेती संस्था स्थापन करण्यास आवश्यक ती भूमिका तयार होईल.

शेतीच्या संदर्भात आणखी एका प्रश्नाचा मी उल्लेख करु इच्छितो. तो म्हणजे कृषि-उद्योगांचा प्रश्न होय. शेतीच्या धंद्याला महाराष्ट्रांत आम्हांला उद्योगांची जोड द्यावयाची आहे, आम्हांला कृषि-उद्योग निर्माण करावयाचे आहेत. यांत आम्ही काही नवीन गोष्ट करणार आहोत असा दावा मी करीत नाही, तसा आमचा आग्रहहि नाही. कारण हे शब्द माझे नाहीत. जे शब्द राजकीय आणि आर्थिक संदर्भात वापरले जातात तेच मी वापरले आहेत. पण त्यांना मी आता आमच्या कारभारामध्ये निश्चित अर्थ देऊ

इच्छितो. यासंबंधी मी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. या कृषि-उद्योग शब्दाचा आशय काळाच्या ओघाबरोबर वाढत जाईल, बदलतहि जाईल. पण आपण महाराष्ट्रांतील खेड्यांकडे पाहिलें तर आपल्याला असे दिसेल की आज खेड्यांमधील सगळा समाज शेतीच्या मूलभूत उद्योगावर आधारलेला आहे. यांतूनच भूमिहीनांच्या प्रश्नासारख्या अनेक सामाजिक कटकटी आणि तणाव निर्माण झाले असून या सर्व गोष्टी दूर करावयाच्या असतील तर शेती न करणारा जो वर्ग आहे त्याला शहरामध्ये घेऊन आले पाहिजे. अशा दृष्टीने आज चालू असलेले नागरीकरण आपण पाहत आहोत.

परंतु खेड्यांमध्ये निव्वळ शेतीवर आधारलेला जो समाज आहे त्याच्यासाठी कृषि-उद्योग काढण्याचा प्रयत्न झाला तर खेडे हे खेडे राहणार नाही. खेडे आणि शहर, खेडे आणि नगर यामधील अंतर कृत्रिम आहे आणि ते दूर झाले पाहिजे. ते करण्याचा मार्ग म्हणजे उत्पादनाचे नवीन तंत्र आणि नवीन विज्ञान निर्माण करणारी साधने शेतकऱ्यापर्यंत गेली पाहिजेत, शेतीमध्ये त्यांचा वापर करण्यास सुरुवात झाली पाहिजे, शेती हा उद्योग आहे आणि म्हणून त्यांत त्यांचा उपयोग झालाच पाहिजे. आणि त्याचप्रमाणें त्यांच्या मदतीने दुसरे धंदे काढता आले पाहिजेत. शेतीच्या कामांत आपण नांगर वापरतो. मी असे म्हणेन की शेतीच्या उपयोगाकरितां लागणारा हा नांगर नागपूर, मुंबई किंवा इतर ठिकाणी निर्माण न होता खेड्यांतच निर्माण झाला पाहिजे. यांत काही अपुरेपणा असेल तर तो नाहीसा करून पूर्णता आणणे आवश्यक आहे.

शेतीमधून निर्माण होणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्यावर औद्योगिक प्रक्रिया करणें म्हणजे कृषि-औद्योगिक समाज नव्हे. त्याच्या पाठीमागे खेड्यांत वीज गेली पाहिजे ही कल्पना आहे. आर्थिक जीवनामध्ये विजेची शक्ति नसेल तर खेड्यांतील शेतकऱ्यांचे जीवन आपण बदलूं शकणार नाही. हे म्हणणे माझे नाही, ते एका महापुरुषाचे आहे. लेनिनने हे चित्र सुरुवातीलाच जगापुढे ठेवले होते. त्याबद्दल आपण त्याचे ऋणी राहिले पाहिजे. जे चांगले आहे ते आपण जरूर घेतले पाहिजे. अनुभवाच्या बाबतींत आपण एकमेकांची उसनवारी करण्यांत काहीच कमीपणा नाही. तेव्हा मला हेच सांगावयाचें आहे की कृषि-उद्योग-प्रधान अर्थरचना या शब्दप्रयोगाच्या पाठीमागची विचारसरणी ही अशी आहे. ही कल्पना केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाही. जुन्या पद्धतीने शेती करणाऱ्या सर्व समाजाने स्वीकारण्यासारखी ही गोष्ट आहे. या कल्पनेला मूर्त स्वरूप येण्यास किती वर्षे लागतील हे सांगता येणार नाही. परंतु ज्या वेगाने औद्योगीकरण वाढत जाईल त्या वेगावर कृषि-औद्योगिक समाज निर्माण होणें अवलंबून राहील, आमचा हेतु, आमची विचारसरणी ही अशी आहे. यासाठी वेगळा शब्दप्रयोग उपयोगी पडणार असेल तर तो आम्ही जरूर घेऊं.

शेवटी मी हे स्पष्ट करु इच्छितो की पुढील निवडणुकीच्या दृष्टीने आम्ही ही कल्पना मांडलेली नाही. जनता आता जागृत असल्यामुळे कोणत्या पक्षाच्या लोकांना निवडून द्यावयाचे आणि कोणत्या नाही हे पारखूनच ती आपले काम करील. परंतु मते मिळविण्यासाठी ही गोष्ट आम्ही मांडलेली नाही. अर्थात् सरकार जे काही करीत आहे त्याचा सरकार पक्षाला निवडणुकीमध्ये उपयोग झाला तर मला आनंदच होईल. हे धोरण स्वीकारल्यामुळे सरकारला निवडणुकीमध्ये मदत होत असेल तर ती आनंदाची गोष्ट आहे असे मी म्हणेन. परंतु त्याचबरोबर विरोधी पक्षाला मी असें म्हणेन की तुम्हीही त्यांत आनंद मानला पाहिजे. निदान ज्यांचा समाजवादी विचारसरणीवर विश्वास आहे त्यांना तरी आनंद वाटला पाहिजे.

शेतीसंबंधी अत्यंत महत्त्वाचे असे जे आपले प्रश्न आहेत ते मी आपणा-समोर अगदी थोडक्यांत मांडले आहेत. आपण त्यांतून कसा मार्ग काढतो यावर महाराष्ट्राची भरभराट आणि उत्कर्ष अवलंबून आहे. आपल्या आर्थिक विकासाचें सूत्रच त्यांत गोवलेले असल्यामुळे आपण या सर्व प्रश्नांचा साकल्यानें विचार करावा अशी विनंती करून मी आपली रजा घेतो.

'सह्याद्रीचे वारे'
या ग्रंथातून साभार

❑❑❑

# यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना / व्यवस्थापन प्रशासन राज्यस्तरीय पारितोषिक २०१४ मा.श्री. शरद अनंत जोशी

## सन्मानपत्र

श्री. शरद अनंत जोशी यांचा जन्म सातारा येथे ३ सप्टेंबर १९३५ रोजी झाला. मुंबईच्या पार्ले टिळक विद्यालयातून ते १९५१ साली शाळेत पहिला क्रमांक मिळवून एस.एस.सी. झाले. त्यांनतर त्यांनी मुंबईच्या सिडनॅम कॉलेजातून १९५७ साली एम.कॉम.ची पदवी मिळवली. ते विद्यापीठात पहिले आले होते व त्यांना सी.ई.रॅन्डल सुवर्णपदक मिळाले होते.

१९५८ साली ते इंडियन पोस्टल सर्व्हिसमध्ये रुजू झाले. त्यांनतर १९६८ साली त्यांना स्वित्झर्लंडची राजधानी बर्न येथे युनिव्हर्सल पोस्टल युनियनमध्ये चीफ इन्फर्मेशन सर्व्हिस, इंटरनॅशनल ब्युरो या पदावर नियुक्ती मिळाली. हे पद संयुक्त राष्ट्रसंघाचे असले तरी तिथल्या कामातून त्यांना आंतरिक समाधान वाटत नव्हते. इतकेच नव्हे तर तेथील काम हे बरेच निरर्थक असून विकसनशील देशांच्या हिताचे नाही असे जाणवू लागल्याने १९७६ मध्ये ते भारतामध्ये परत आले.

भारतातील दारिद्र्याचे मूळ हे कोरडवाहू शेतीमध्ये आहे असा मनोमन निश्चय हो न त्यांनी आंबेठाण येथे शेती घेतली. व स्वतः जमीन कसून शेतीस सुरुवात केली. त्यावेळी शेतीच्या प्रश्नाविषयी व शेतकऱ्यांच्या कुचंबणेविषयी त्यांना जो अनुभव येत गेला, त्यातूनच त्यांचा स्वतःचा निश्चित असा विचार व्यूह तयार झाला व त्या आधारावर पुढे त्यांच्या आंदोलनाचा पाया रचला गेला. विशेषतः त्यांना हे जाणवले की, उत्पादनाचा व विक्रीचा खर्चही ज्यात भरुन येत नाही अशा शेतीमालाच्या अपुऱ्या किंमती हे शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे मूळ आहे आणि शेतकऱ्यांचे दारिद्र्य हे देशाच्या दारिद्र्याचे व पर्यायाने मागासलेपणाचे मूळ आहे. त्यातूनच शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे या निर्णयावर ते येऊन ठेपले.

या दृष्टिकोनातून त्यांनी मानवी इतिहासाचा मागोवा घेतला व त्यांचे असे ठाम मत झाले की, एक दाण्यातून १०० दाणे तयार होण्याचा चमत्कार शेतीतूनच होतो परंतु आजपर्यंतच्या इतिहासाची खरी प्रेरणा ही शेतीमध्ये होणारा गुणाकार लुटण्याची आहे. तसेच विकासासाठी सुरु केलेल्या अनेक शासकीय योजनांचा खरा लाभ शेतकऱ्याला न पोहोचता संबंधित कारखानदारांनाच मिळतो व अनुदानाच्या योजना शेतकऱ्यांच्या दृष्टीने लाभदायी ठरत नाहीत. देशातील एकूण यंत्रणाच ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करुन शहरांना झुकते माप देणारी आहे या निष्कर्षातून श्री. शरद जोशी यांनी 'इंडिया विरुद्ध भारत' हा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते आर्थिकदृष्ट्या देशाचे दोन भाग पडले असून एक भाग हा दुसऱ्या भागाच्या शोषणावर जगतो आहे. यातील शोषण करणारा तो इंडिया आणि शोषित म्हणजे भारत.

ही त्यांची तात्विक मांडणी आणि शेतीमालाला रास्त भाव मिळालाच पाहिजे ही मागणी शेतकऱ्यांनी उचलून धरली व १९८० सालापासून शरद जोशींच्या नेतृत्वाखालील आंदोलने सुरु झाली. त्यामध्ये चाकण परिसरातील कांदा आंदोलन, निपाणी शहरातील तंबाखू आंदोलन, नाशिक येथील उसाचे आंदोलन व विदर्भातील कापसाचे आंदोलन हे टप्पे महत्वाचे ठरले. वास्तविक शेतकरी हे अनेक ठिकाणी विखुरलेले असल्यामुळे त्यांना संघटित करणे व त्यांच्यापर्यंत आंदोलनाचा संदेश पोहोचविणे हे सोपे नव्हते. परंतु आपल्या शेतीमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे व त्यासाठी शेतीमालाचा उत्पादन खर्च शास्त्रशुद्ध पद्धतीने काढला पाहिजे हा त्यांचा आग्रह सर्वच शेतकऱ्यांना प्रेरणा देणारा ठरला. त्यामुळे अक्षरशः हजारोंच्या संख्येने शेतकरी या आंदोलनामध्ये सहभागी झाले.

या आंदोलनांचा एक भाग म्हणून शरद जोशी यांनी शेतकरी स्त्रियांच्या प्रश्नांची दखल घेऊन 'लक्ष्मी मुक्ती'

आंदोलन उभारले व त्यातूनच खेडयापाडयातील दोन लाख स्त्रियांची नांवे ७/१२ च्या उताऱ्यावर जमिनीचे सहमालक म्हणून लावली गेली. ग्रामीण भागातील स्त्रियांचे शेतीतील महत्वाचे स्थान ओळखून त्यांना न्याय मिळावा व समाजांतही त्यांना मानाचे पान मिळावे या दृष्टीने प्रयत्न केल्यामुळे शेतकऱ्यांच्या आंदोलनातील शेतकरी स्त्रियांचा सहभाग हा अधिकाधिक बलवत्तर होऊ लागला. 'लूटमारीच्या व्यवस्थेत जिंको कोणी, हरो कोणी, खऱ्या हरतात दोन्ही बाजूच्या स्त्रिया' असे ठाम प्रतिपादन करणारे १९८२ मधील चांदवडचे अधिवेशन हा त्यांच्या आंदोलनाचा एक मानबिंदू मानला जातो. शेतकरी आंदोलनामधून त्यांना असाही अनुभव आला की, या देशातील सामान्य माणसांच्या मनामध्ये कुठेही संकुचित किंवा क्षुद्र वाद नसून देशातील गरिबी हटली व सर्व घटकांचा विकास होत राहिला तर संकुचित भेदांवर कायमची मात करता येईल.

शेतीतील उत्पादन वाढविणे, त्यातील जोखीम कमी करणे व उत्पादनाला बाजारात उत्तम भाव मिळवून देणे या उद्दिष्टांबरोबरच शरद जोशी यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा सातत्याने पुरस्कार केला. त्याचबरोबर सध्या जागतिकीकरणाचा सर्वत्र निर्माण झालेला सबळ प्रवाह लक्षात घेऊन त्यांनी खुली अर्थव्यवस्था अपरिहार्य आहे व त्यातूनच शेतकऱ्यांचे व सामान्य ग्राहकांचे हित साधता येईल अशी भूमिका मांडली.

शेतकरी संघटना आणि शेतीमालाविषयीची आंदोलने हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला असला तरी जीवनाच्या इतर अनेक क्षेत्रांमध्येही त्यांनी लक्षणीय यश मिळविले. ते एक प्रभावी लेखक असून साहित्याविषयी व मराठी भाषेविषयी त्यांची आस्था सर्वांनाच परिचित आहे. 'मराठी भाष मोठी व समृद्ध करायची असेल तर त्यासाठी आधी मराठी माणसाने सर्वार्थाने समृद्ध व्हावे लागले' असे त्यांचे परखड मत आहे. त्यांनी अनेक मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रातून विविध विषयांवर आपले विचार मांडणारी सदरे लिहिलेली आहेत. त्यांच्या बहुआयामी प्रतिभेला दाद द्यावी लागेल असेच त्यांचे कर्तृत्व आहे.

२००४ मध्ये त्यांची राज्यसभेवर नेमणूक झाली. त्या आधीही कृषिविषयक कार्यगटाचे अध्यक्ष व कृषिविषयक स्थायी सल्लागार समितीचे अध्यक्ष या पदांवर त्यांनी काम केले. २००५–२००८ या कालावधीत ते अनुसूचिम जाती व जमाती कल्याण समितीचे सदस्य होते. जमीन, पाणी, शेती या विषयीच्या अनेक उच्चस्तरीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समित्यांवर त्यांनी काम केले.

स्वतंत्र भारताच्या विकासात त्यांचे शाश्वत स्वरुपाचे योगदान म्हणजे त्यांनी शेतकऱ्यांच्या शोषणा विरुद्ध दिलेला वैचारिक व आंदोलनात्मक लढा हे होय. सर्व स्तरावरील शेतकऱ्यांना एकत्र आणून, सामान्य भारतीय जनतेला व विचारवंताना शेतकऱ्यांच्या समस्यांची दखल घ्यावी लागेल अशी ताकद त्यांनी या लढ्यांच्या मागे उभी केली व हा लढा जाती, भाषा, धर्म या सर्व भेदांच्या पलीकडे जा न उभा करता येतो हे प्रत्यक्ष दाखवून दिले. देशाच्या मागासलेपणाची व दारिद्र्याची त्यांनी केलेली चिकित्सा व त्यातून मांडलेला 'इंडिया विरुद्ध भारत' हा सिद्धांत तसेच सामान्य शेतकऱ्यांच्या आयुष्यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी केलेले भगीरथ प्रयत्न म्हणजे भारतीय कृषी विकासाच्या क्षेत्रातील एक गौरवपूर्ण पर्व आहे. त्यांच्या या अनन्यसाधारण कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना 'यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना / व्यवस्थापन प्रशासन' हा पुरस्कार देतना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला विशेष आनंद होत आहे.

**शरद पवार**

**अध्यक्ष**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

दिनांक : २५ नोव्हेंबर २०१४

# नवमहाराष्ट्र युवा अभियान
# कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक श्री. विश्वास ठाकूर, संघटक श्री. निलेश राऊत हे पहातात. श्री. विजय कान्हेकर समन्वयक आणि श्रीम. वैशाली मोटे या सह–समन्वयक आहेत. तर कार्यालयीन संघटक म्हणून श्री. सुरेश पाटील व सहाय्यक म्हणून मिनल सावंत, निलेश पुराडकर, रमेश मोरे हे काम पहातात.

### मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'आपली भाषा आपली कविता' या काव्य वाचनाचा कार्यक्रम

**बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०१४** ज्ञानपीठ विजेते ज्येष्ठ मराठी साहित्यिक मा. वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. कुसुमाग्रजांचा जन्मदिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. सामाजिक अन्याय, विषमता यावर कुसुमाग्रजांनी आपल्या लेखणीतून प्रहार केला. केवळ लिखाण करुन ते थांबले नाहीत तर चळवळीमध्ये सुद्धा त्यांचा सहभाग होता. त्यामुळे एका अर्थाने कुसुमाग्रज हे सामाजिक चळवळीचे प्रणेते होते.

या मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून मराठी भाषेची व मराठी कवितांची रसिकांना गोडी लागावी याकरीता **'आपली भाषा व आपली कविता'** हा कविता वाचन व गायनांचा कार्यक्रम सांस्कृतिक सभागृह, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे लोकसंवाद या उपक्रमांतर्गत रोजी सायं. ५.०० वाजता आयोजित करण्यात आलेला होता.

श्रोत्यांना अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी, पुणेरी या बोली भाषेतील कवितांची ओळख व्हावी, याकरिता कवितांचे वाचन व गायन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**गुरुवार दि. ६ मार्च २०१४** रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने 'महिला बचत गटाचे कार्य व महिला सक्षमीकरण' या विषयावर मा. कांचनताई परुळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम सायं. ५.०० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

सोमवार दि. ९ जून २०१४ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व मा. कांचनताई परुळेकर यांच्या स्वयंसिद्धा या संस्थेच्यावतीने 'सावित्री, दामिनी की कामिनी' या नाटकाचा प्रयोग करण्यात आला होता. हा प्रयोग सायं. ६ ते ८ या वेळेत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

### नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पिनॅकल क्लब गिर्यारोहण कार्यक्रम

दिनांक १६ आणि १७ एप्रिल २०१४ रोजी ओ. एन्. जी. सी. अग्नीशमन सप्ताह निमित्त गिर्यारोहण प्रात्यक्षिके करुन दाखविण्यात आली. बांद्रा येथील कार्यालयाच्या उंच इमारतीवरुन ओ. एन्. जी. सी. चे कर्मचारी रॅपलिंग करुन खाली उतरले. उपस्थित कर्मचाऱ्यांनी सगळ्यांचे कौतुक केले.

रेल्वे कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी तीन दिवसीय साहस शिबीराचे आयोजन करण्यात आले. दिनांक १४ ते १७ मे २०१४ रोजी लोणावळा येथे झालेल्या या शिबिराचा लाभ सांताक्रुझ येथील ५४ बाल गिर्यारोहकांनी घेतला.

दि. २८/०६/२०१४ रोजी गारबेट माथेरान पदभ्रमण मोहिम आयोजित करण्यात आली. त्याचा लाभ ३३ गिर्यारोहकांनी घेतला. ०८/०७/२०१४ रोजी माहुलीकिल्ला, दि. १९/०७/२०१४ रोजी नॅशनल पार्क मेनगेट ते कान्हेरी गुंफा पदभ्रमण मोहिम, दि. २७/०७/२०१४ रोजी सागरगड, दि. ०९/०८/२०१४ रोजी नानेघाट, दि. १७/०८/२०१४ रोजी डयूक नोज (नागफणी) येथे पदभ्रमण कार्यक्रमाचे आयोजन

करण्यात आले. त्याचा लाभ एकूण ७९ गिर्यारोहकांनी घेतला.

दिनांक ०४/०८/२०१४ रोजी जव्हार येथील शाळेला संस्थेतर्फे वह्या, पेन्सील, रबर, पेन आणि गोष्टींची पुस्तके वितरण करण्यात आली.

**युवा स्वातंत्र्यज्योत रॅली**

**मंगळवार दि. १४ ऑगस्ट २०१४**

दि. १४ ऑगस्ट २०१४ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्र पुरुषांना अभिवादन करण्यासाठी तरुणांमध्ये स्वातंत्र्य दिनाविषयी आदराची जाणिव व जागृती निर्माण व्हावी यासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले.

सहभागी तरुण–तरुणींचे व प्रमुख पाहुणे मा. अजित राणे यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक करताना मा. विजय कसबे यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीविषयीचे महत्त्व विषद करण्यात आले. स्वातंत्र्य चळवळीमध्ये स्वातंत्र्य सैनिकांनी दिलेली आहुती, केलेला त्याग याबद्दल माहिती देऊन स्वातंत्र्य दिनाचे अनुभव असलेल्या स्वातंत्र्याचे महत्त्व व त्याचे फायदे सांगण्यात आले. सूरज भोईर यांनी गायीलेल्या 'ये देश है वीरो जवानों का, अलबेलों का मस्तानों का इस देश का यारो क्या कहना.....' या जोशपूर्ण गाण्याने रॅली मार्गस्थ झाली.

पुढे मा. प्रबोधकार ठाकरे यांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करुन त्यानी केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला. पुढे सेनापती बापटांचा पुतळा, शिवाजीपार्कातील शिवाजी महाराजांचा पुतळा, सावरकर स्मारकातील स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पु–तळा यांना अभिवादन करुन तरुण कार्यकर्त्यांनी या महान नेत्यांच्या कार्यकतृत्वावर भाषणे केली. पोवाडा गायला गेला. शेवटी चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात येऊन त्यांच्या कार्याची माहिती अभिजित देशमुख यांनी विषद केली. याठिकाणी भारतीय राज्यघटनेचा सरनामा त्याचे सामुहिक वाचन करण्यात आले. आलेल्या पाहुण्यांचे तरूण–तरुणींचे कार्यकर्त्यांचे आभार मानण्यात येऊन सामुहिक राष्ट्रगीताने रॅलीची सांगता झाली.

युवा स्वातंत्र्यज्योत रॅली यशस्वी करण्यासाठी यशवंत सामाजिक केंद्र या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. अकबर काझी यांनी मोलाचे सहकार्य केले. हनुमंत पन्हाळकर, राजन डॅनियल, गोपी यांनी विशेष सहकार्य केले. उमाकांत जगदाळे, अभिजित देशमुख, मनोज टपाल, राकेश कांबळे, राहूल चव्हाण, दिपक पाटील यांनी दाखविलेला हुरुप वाखाणण्यासारखा आहे. रॅलीमध्ये २०० ते २५० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**गुरूवार दि. २१ ऑगस्ट २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्यावतीने 'चित्रपट चावडी' या उपक्रमात आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला तसेच ऑस्कर पुरस्काराने सन्मानित असलेला **'Good Will Hunting'** हा इंग्रजी चित्रपट दाखविण्यात आला होता.

हा चित्रपट यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सांस्कृतिक सभागृहात सायं. ५.३० वाजता दाखविण्यात आला होता.

**समाजकार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग** :– महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार आहेत. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील महाराष्ट्राचा थोर वैचारिक वारसा यांनी पुढे नेला. सामान्य माणसात आत्मविश्वास जागविण्याचे आणि त्यांच्या जागृत संघटित कर्तृत्वातून आधुनिक महाराष्ट्राची पायाउभारणी करण्याचे महान कार्य त्यांनी केले आहे. त्यांनी दिलेल्या दिशा आणि दृष्टी कैक पिढयांना मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत. त्यांचे हे विचार जनसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई ची स्थापना करण्यात आली आहे. वरील उद्‌दिष्टपूर्तीसाठी प्रतिष्ठानने नवमहाराष्ट्र युवा अभियान या युवा विभागाची उभारणी केली आहे. नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने समाजकार्यकर्ता प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासवर्ग यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे सुरु करण्यात आलेला आहे. हे वर्ग महिन्याच्या प्रत्येक रविवार घेण्यात येतात. या कोर्सेसचे उद्‌दिष्ट साध्य करण्याकरिता हाताळले जाणारे विषय केवळ

वैचारिक अथवा बौद्धिक पातळीवरचे नसून सध्याचे समाजस्थिती लक्षात घेता सदर विषयाची योग्य ती सांगड व्यवहारिक विषयांशी घातली जात आहे. तसेच केवळ ऐकण्यावर भर दिला जाणार नसून प्रशिक्षणार्थींकडून कार्यपाठ आणि प्रात्यक्षिकाच्या स्वरुपात कृती व त्याच्या प्रत्यक्ष सहभागावर भर दिला जातो.

## तंबाखू नियंत्रण उपक्रम

तंबाखुजन्य पदार्थांच्या सेवनाने आज खुप समस्या समाजात वाढत आहे व ही जागतिक समस्या दिवसेंदिवस उग्र स्वरुप धारण करत आहे. याची झळ भारतासारख्या विकसनशील देशाला बसत आहे. प्रामुख्याने मुलांना, तरुण पिढीला बसत आहे. या समस्येला नियंत्रित करणे किंवा अश्या पदार्थावर बंदी घालणे, खुप गरजेचे झालेले आहे. ही समस्या लक्षात घेता, संस्थेच्या तंबाखू नियंत्रण विभागा मार्फत महाराष्ट्रात तंबाखुमुक्त अभियान राबविले जात आहे व तंबाखू विरोधी व्यापक चळवळ उभारलेली आहे. या उपक्रमाचे समन्वयक कॅप्टन आशिष दामले असून त्यांच्या सोबत श्री. कैलाश मालखेडे, मा. नीता मालखेडे हे सह–समन्वयक म्हणून काम पाहतात. या उपक्रमाला 'सलाम मुंबई' फॉऊंडेशन यांचे मोलाचे सहकार्य लाभते. मुलांना तंबाखुच्या धोक्यापासुन दूर ठेवून, त्यांच्या जिवनामध्ये जीवन कौशल्याचा विकास करने व त्या आधारे भविष्यातील सशक्त भारताच्या निर्मितीचे उद्दिष्ट संस्थेने ठेवले आहे. समाजातील विविध वयोगटासाठी काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ज्यात प्रामुख्याने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, तंत्र शिक्षण देणाऱ्या संस्था येथे शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना सोबत कार्यशाळा, विविध स्पर्धा, आयोजित केल्या जातात. ज्या द्वारे सर्वांना तंबाखू जन्य पदार्थ व त्यांच्या सेवनाने होणारे दुष्परिणाम, कायदे, तंबाखूमुक्त संस्था अश्या विषयांवर मार्गदर्शन केले जाते. पोलिस, मजदुर चालक – वाहक, अश्या ही वर्गासाठी विशिष्ट कार्यक्रम घेतले जातात. पथनाट्ये, पोस्टर प्रदर्शन, रॅली, गाणी, नाटिका, एकांकिका, कीर्तन, भजन अश्याही कार्यक्रमातुन समाज प्रबोधन केले जाते. त्यामुळे आजपर्यंत अनेक संस्था तंबाखुमुक्त झाल्या, विविध व वयोगटातील अनेक जणांनी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करने बंद केले. विभागाने, सदर समस्या बाबत सरकारचे लक्ष वेधून घेत राज्यात तंबाखू जन्य पदार्थाच्या विक्रीबाबत कायद्यांची अंमलबजावणी व गुटखा बंदी करण्यास भाग पाडले. अभियानाचे सर्वात मोठे यश म्हणजे, लहान वयात योग्य माहिती मिळाल्याने अनेक मुले अश्या व्यसना पासून लांब रहातात. तंबाखूमुक्त अभियानाला लाभलेले यश बघता. हा उपक्रम अधिक प्रभावी व व्यापक होण्यासाठी अनेक प्रयत्न चालु आहेत. याचा फायदा येणाऱ्या नविन पिढीला नक्कीच होतोय. मुंबई व महाराष्ट्र, माध्यमिक शाळा, शिक्षक कार्यशाला, शालेय स्तरावर कार्यक्रम, अंमलबजावणी, कॉलेजमध्ये कार्यशाळा, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य सादरीकरण, पोस्टर स्पर्धेचे आयोजन, कला महोत्सवाचे आयोजन, घोषवाक्य स्पर्धा, व्यसनमुक्ती साहित्य संमेलन सहभाग, माहिती पुस्तिका छपाई व वाटप, एन एन एस च्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा, पोलिस स्टेशन कार्यशाळा, जनजागृती रॅलिंचे आयोजन, जनजागृति नाटिका एकांकिका सादरीकरण, गीत लिखान व गायन, बचत गटांसाठी कार्यशाळा, पोलिस प्रशिक्षण कार्यशाळा, आरोग्य सेवाकांसाठी कार्यशाळा, तंबाखूजन्य पदार्थाची होळी, तंबाखू मुक्त गणेशोत्सव सजावट, सरपंच कार्यशाळा, तंबाखू मुक्त संस्था कार्यक्रम, तंबाखू मुक्त परिवार, तंबाखू मुक्त परिसर, तंबाखूमुक्तिसाठी पोस्टर पेस्टिंग उपक्रम.

**तंबाखू नियंत्रण विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रम खालीलप्रमाणेः**

- दि. १३/०२/२०१३ ''तंबाखूचे दुष्परिणाम डेकोरेशन'' माघी गणेशोत्सव, बदलापूर. एकूण मंडळ सहभाग; ०८
- दि. २५/०३/२०१३ ''तंबाखू गुटख्याची होळी''. गुरुकृपा कॉलेजे कल्याण. एकूण सहभागी विद्यार्थी; ६००
- दि. २६/०३/२०१३ ''होळी उत्सव'' बदलापुर १३ चौकात तर अंबरनाथ, उल्हासनगर, भिवंडी येथे तंबाखूचा राक्षस बनवून होळी साजरी करण्यात आली.

- दि. २८/०४/२०१३ नरोत्तम सक्सेरिया फौंडेशन व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम. सहभागी; १५००
- दि. ०१/०५/२०१३ ''पोस्टर प्रदर्शन व माहिती पुस्तिका वाटप'' जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा. उड्डाणपूल, रेल्वे स्टेशन बदलापुर (प.) जनजागृती रॅलिंचे आयोजन. सहभागी संख्या; ६३०
- दि. ०५/०६/२०१३ शिक्षक दिनानिमित, ''शिक्षक व विद्यार्थी कार्यशाळा''. बेडेकर विद्यालय, ठाणे. लाभार्थी संख्या; ३३०
- दि. १९/१०/२०१३ ''पोलिस कार्यशाळा''. चिरागनगर पोलिस स्टेशन, घाटकोपर. लाभार्थी संख्या; ५०
- दि. २४/१०/२०१३ ''माहितीपट व स्लाईड शो''. ब्लड डोनेशन कॅम्प. लाभार्थी संख्या; २००–२५०
- दि. ०४/११/२०१३ ''माहितीपट व स्लाईड शो''. गुजराथी जैन न्यू ईअर कार्यक्रम कुर्ला. लाभार्थी संख्या; १४००–१५००
- दि. २७/११/२०१३ ''एन.एन.एस.कॅम्प''. कल्याण मुरबाड रोड. लाभार्थी विद्यार्थी संख्या; ६२
- दि. ०७/१२/२०१३ ''मजदूर कार्यशाळा''. राष्ट्रीय मिल मजदूर संघ, टाटा मिल, मुंबई. लाभार्थी मजदूर संख्या; ५०
- दि. ०९/१२/२०१३ ''मजदूर कार्यशाळा''. राष्ट्रीय मिल मजदूर संघ, पोदार, मुंबई. लाभार्थी मजदूर संख्या; ४०
- दि. १०/१२/२०१३ ''मजदूर कार्यशाळा''. राष्ट्रीय मिल मजदूर संघ, इंडिया युनायटेड मिल, मुंबई. लाभार्थी मजदूर संख्या; ४०
- दि. ११/१२/२०१३ ''मजदूर कार्यशाळा''. राष्ट्रीय मिल मजदूर संघ, दिग्विजय मिल, मुंबई. लाभार्थी मजदूर संख्या; ४५
- दि. ३१/१२/२०१३ ''शिक्षक व विद्यार्थी कार्यशाळा''. पराग विद्यालय भांडूप, मुंबई. लाभार्थी संख्या; ४१०
- दि. २०/०१/२०१४ ''शिक्षक व विद्यार्थी कार्यशाळा''. न्यू इंग्लिश स्कूल, मालदाभाडी, तालुका जामनेर, जळगाव. लाभार्थी संख्या; ४००
- दि. ०४/०२/२०१४ जागतिक कर्कदिना निमित कर्क रोग्यांसाठी, ''कला महोत्सव'' व ''विद्यार्थी कलावंत (सर जे.जे. कला महाविद्यालय विद्यार्थी) तंबाखू नियंत्रण अभियानात सहभागी करुन घेण्यासाठी मार्गदर्शन'', टाटा हॉस्पिटल, मुंबई. लाभार्थी संख्या ३००–३५० कलावंत विद्यार्थी संख्या; ४०
- दि. १३/०२/२०१४ ''कीर्तन सोहळा'' यात्रेचे निमित साधून, यात्रेकरु व ग्रामस्थांना भजन व कीर्तनातून, तंबाखूजन्य पदार्थांची माहिती, दुष्परिणाम कायदे यांची माहिती देण्यात आली. सोनारी, तालुका जामनेर, जळगाव. लाभार्थी संख्या; १०००–१२००
- दि. १८/०४/२०१४ ''तंबाखूमुक्ति पोस्टर पेस्टिंग उपक्रम'', बदलापूर, ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे. २०० पोस्टर्स पेस्टिंग
- दि. २५/०५/२०१४ ''तंबाखू नियंत्रण सत्र'' कोकण रेल्वे प्रवाशी संघ व टिसा ब्लड बँक कार्यकर्ते व प्रवाशी. लाभार्थी संख्या; ४०
- दि. १०/०७/२०१४ ''तंबाखू नियंत्रण कार्यशाळा'' जागतिक एड्स दिन. आदर्श कॉलेज, बदलापूर पूर्व, लाभार्थी एन.एन.एस. विद्यार्थी संख्या; २१०
- दि. १४/०७/२०१४ राज्यस्तरीय व्यसन मुक्ती साहित्य संमेलन, सहभाग.
- दि. १५/०७/२०१४ माहिती पोस्टर प्रदर्शन व माहिती पुस्तिका वाटप
- दि. ०६/०८/२०१४ ''तंबाखू नियंत्रण कार्यशाळा'' सहभाग एन.एन.एस.विद्यार्थी लीडर कॅम्प, गोवेली, टीटवाळा, जिल्हा ठाणे. ''तंबाखू मुक्त संस्था'' उपक्रमाबद्दल मार्गदर्शन ठाणे जिल्ह्यातील ६० महाविद्यालयातील लाभार्थी संख्या; १५०
- दि. ०७/०८/२०१४ ''पथनाट्ये सादरीकरण'' रेल्वे

स्टेशन, उड्डाण पूल व १० चौकात सादरीकरण, बदलापूर, ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे.

- दि. १५/०८/२०१४ ''चित्रकला स्पर्धा'' (तंबाखू मुक्ती विषयांवर आधारित) व ''गणवेश वाटप'' इंग्लिश स्कुल मालदाभाडी, ता. जामनेर, जिल्हा जळगाव. स्पर्धेत सहभागी विद्यार्थी ४२ ''शक्तिमान टीम'' स्थापना (तंबाखू सेवना विरोधी काम करणारी शाळेतील मुलांची टीम)
- दि. २३/०८/२०१४ ''तंबाखू मुक्त शाळा'' प्रगती अंध विद्यालय तंबाखू मुक्ती पर गीत – संगीत कार्यक्रम, बदलापूर गाव, ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे. लाभार्थी संख्या १३० सहभागी विद्यार्थी; १५
- दि. ३०/०८/२०१४ 'तंबाखूमुक्त गणेशोत्सव मंडळ, पोस्टर व माहिती पुस्तिका' वाटप, बदलापूर, ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे एकूण मंडळ सहभाग; ३८
- दि. ३१/०८/२०१४ 'तंबाखूमुक्ति माहिती पुस्तिका' वाटप कार्यक्रम सरकारी कार्यालये अंबरनाथ व बदलापूर, ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे.
- दि. १५/०९/२०१४ 'धुम्रपान निषेध क्षेत्र', 'तंबाखूमुक्ति परिसर पोस्टर' व माहिती पुस्तिका' वाटप कार्यक्रम अंबरनाथ व बदलापूर, ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे.

❑❑❑

## खरा नेता

खरे म्हणजे लोकांना योग्य तऱ्हेने, योग्य ठिकाणी नेतो, तो नेता. उदात्त उदाहरण घालून देणे, प्रगल्भ प्रात्यक्षिक निर्माण करणे म्हणजे नेतृत्व करणे होय. कोणत्याही समस्येत नेता हा अग्रभागी असावा लागतो. त्याला सर्वांच्या पुढे राहावे लागते. समस्या निर्माण करण्यासाठी आणि निर्माण झाल्यावर, सर्वांच्या अगोदर त्याला तेथे पोहोचावे लागते. पोहोचल्यावर अखेरपर्यंत थांबावे लागते. नेता असणाऱ्याला, नेतृत्व करणाऱ्याला सर्वांच्या अग्रभागी, शिरोभागी राहावे लागते, पण ते श्रेणीने–सर्वांच्या शिरोभागी म्हणजे प्रत्यक्ष डोक्यावर नव्हे. तसा तो डोक्यावर बसून राहिला, तर त्याला ज्यांचे नेतृत्व करावयाचे आहे, त्यांच्या भावना, आशा–आकांक्षा स्वभावतःच तो पायदळी तुडवू लागतो. असे घडले म्हणजे त्या नेत्याबद्दलचा, नेतृत्वाबद्दलचा आदर संपुष्टात येतो, इतकेच नव्हे, तर ते नेतृत्वही संपुष्टात येते. ज्याला नेतृत्व करावयाचे आहे, त्याने अशी काही पथ्ये पाळली पाहिजेत.

*– यशवंतराव चव्हाण*

# अपंग हक्क विकास मंच
# कार्यवृत्त

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या, संवाद व समन्वयाच्या'भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती झाली आहे. मंचाच्या निमंत्रक मा. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक विजय कान्हेकर व दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, संघटक विजय कसबे, शमीम खान, अनिल चाळके, रमेश सांगळे आणि कार्यालयीन सहाय्यक सुकेशनी मर्चंडे–शेवडे हे काम पाहतात.

## कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर

### • औरंगाबाद, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर, वसंतदादा पाटील सभागृह, जिल्हा परिषद औरंगाबाद, येथे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन मा. आ. कल्याण काळे, केशव औताडे, सुभाष झांबड, सय्यद अक्रम, प्रभाकर मुथ्थेपाटील, डॉ. विमल मापारी, नगरसेवक प्रमोद राठोड, राजू दहाडे, श्री. लोखंडे, वैद्यकीय सामाजिक अधिकारी जयश्री सोनकवडे, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर व समन्वयक सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण ३०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असुन गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फुट, कॅलिपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंधकाठी इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी श्री. जितेंद्र दाभाडे, जाधव, दादामियाँ पठाणसह आदी कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### • नांदेड, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर नांदेड येथे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिराच्या कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून श्री. दिलीप पाटील बेटमोगरेकर, श्री. सुनिल खामिटकर, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर व समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर यांच्यासह विठ्ठल मगनाळे, सदाशिव देशमुख, सुधाकर शेवाळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या शिबिरात एकुण ५२८ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फुट, कॅलिपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंधकाठी, गॉगल इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी श्री. जितेंद्र दाभाडे, संदिप शिरसाठ, जाधव दादामियाँ पठाणसह आदी कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• वाशीम : दिनांक १६ फेब्रुवारी, २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद वाशीम यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर नेवे मंगल कार्यालय बस स्टॅन्ड जवळ यावल जिल्हा वाशीम येथे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१४ रोजी संपन्न झाले. या शिबिराच्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद सभापती श्रीमती जाधव, तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. वाड, सोनाली ठाकरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या शिबीरात एकूण १२५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपूर फुट, कॅलिपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंधकाठी, गॉगल, सर्जिकल शुज, इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी श्री. जितेंद्र दाभाडे, संदिप शिरसाठ, जाधव, दादामियाँ पठाणसह आदी कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• हिंगोली, दिनांक : १७ फेब्रुवारी, २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद हिंगोली यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप. हिंगोली येथे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१४ रोजी संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभारी समाज कल्याण अधिकारी श्री. ए. बी. कुंभारगावे, सहाय्यक समाज कल्याण अधिकारी श्री. बी. एच. वाकडे, डॉ. मनिष बगाडिया, श्री. विजय कान्हेकर यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १४० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. जयपुर फुट, कॅलिपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, श्रवणयंत्र, अंधकाठी, अंध गॉगल इत्यादी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर इतर लाभार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार, शैक्षणिकविषयाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन संदीप शिरसाठ तर आभार प्रदर्शन श्री. जितेंद्र दाभाडे यांनी केले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघाचे कर्मचारी नसीम खान, जाधव दादामियाँ पठाणसह आदी कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• पुणे, दिनांक : १७ फेब्रुवारी २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद पुणे यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप पुणे येथे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१४ रोजी संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभारी समाज कल्याण अधिकारी श्री. ए.बी. कुंभारगावे, सहाय्यक समाज कल्याण यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

या शिबिरात एकूण ४०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ३५३ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• परभणी, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली,

अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग परभणी यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर परभणी येथे दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिसाठी प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. लोखंडे, वैद्यकीय सामाजिक अधिकारी प्रशांत गायकवाड, मंगेश उबाळे, सुमंत वाघ, आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १७५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

- **सांगली, दिनांक ३० जून, २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग सांगली यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर सांगली येथे दिनांक ३० जून, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे श्री. राजेंद्र माळी, उपाध्यक्ष – श्री. बसवराज पाटील, उपसभापती – दत्ताराम पाटील, वैशाली नाईक, श्री. किसनराव जंकर, वैद्यकीय सामाजिक अधिकारी सचिन कावळे, समाज कल्याण अधिकारी श्रीमती. एस. एस. गायकवाड आणि अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण २८५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी १७० गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

- **नाशिक, दिनांक ५, ६ व ७ जुलै, २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग नाशिक यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर नाशिक येथे दिनांक ५, ६ व ७ जुलै, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पी. डब्ल्यु. डी. चे आयुक्त श्री. ज्ञानेश्वर राजूरकर, श्री. पी. यु. पाटील, श्री. धीरज बिरजे, श्री. विनायक रानडे, श्री. विश्वास ठाकूर, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण २०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी १५२ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

- **मुंबई (उपनगर) : दिनांक ८, ९ व १० जुलै, २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग मुंबई शहर यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप व तपासणी शिबिर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या बेसमेंट हॉल

येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरास अध्यक्ष म्हणून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सरचिटणीस, मा. शरद काळे, अपंग हक्क विकास मंचचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली होती. यापैकी ७२ गरजू अपंग लाभार्थ्यांना कृत्रिम साहित्याचे वाटप करण्यात आले. जयपूर फुट १०, श्रवणयंत्र २०, तिनचाकी सायकल २५, व्हिलचेअर १५, अंधकाठी ७, गॉगल ३, कुबडी जोड २ इत्यादी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. तर उर्वरीत २८ लाभार्थी प्रतिक्षा यादीत आहेत. सर्व उपस्थित लाभार्थ्यांना स्वयंरोजगार, शैक्षणिक विषयी, अपंगाच्या शासन निर्णयाविषयी, अपंगांच्या विविध योजना याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबादचे कर्मचारी, श्री. प्रभाकर वावरे, चांदोबा बिरगड, अनिल बाराते आणि अपंग हक्क विकास मंच, मुंबईचे संघटक कु. सुकेशनी मर्चंडे, अनिल चाळके, विजय कस्बे, रमेश सांगळे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## • कोल्हापूर : दिनांक १६ जुलै, २०१४

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर कोल्हापूर येथे दिनांक १६ जुलै, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विजय सुर्यवंशी, श्री आनंदनाथ महाराज, श्री. शिंदे, श्री. पवन खेबुडकर, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १४५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ८१ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी आणि शिक्षक वृंद उपस्थित होते.

## • रायगड : दिनांक १६ जुलै, २०१४

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग रायगड यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर रायगड येथे दिनांक १६ जुलै, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन आमदार श्रीमती. मिनाक्षी पाटील, श्री. पंडीत शेठ पाटील, श्री. रमेश नागोणकर, श्री. मनोज भगत, श्रीम. प्रिती चाऊलकर, श्रीमती. निता गिधी, श्री. विजय गिधी, समाजसेवक श्री. किशोर वेखंडे, श्री. वाणी, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १४० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ७५ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी आणि शिक्षक वृंद उपस्थित होते.

## • सोलापूर : दिनांक १६ जुलै, २०१४

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर सोलापूर येथे दिनांक १६ जुलै, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार श्रीमती. मिनाक्षीताई पाटील, श्री. पंडीत शेठ पाटील, श्री. रमेश नागोणकर, श्री. मनोज भगत, श्रीम. प्रिती चाऊलकर, श्रीमती. निता गिधी, श्री. विजय गिधी, समाजसेवक श्री. किशोर वेखंडे, श्री. वाणी, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १४० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ७५ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संध व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी आणि शिक्षक वृंद उपस्थित होते.

**• जालना : दिनांक १७ व १८ जुलै, २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग जालना यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर जालना येथे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन जिल्हा परिषदेचे श्रीम. आशाताई भुतेकर, श्रीम. प्रेरणा देशभ्रतार, जालना जिल्हा वैद्यकीय सामाजिक अधिकारी श्रीम. संगीता मकरंद, पंडितदादा भुतेकर, वै.सा.का. पंकज वाघमारे, शिक्षक वृंद आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण २०० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी १५२ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• सातारा : दिनांक १७ व १८ जुलै, २०१४**

सामाजिक न्याय एवंम् मंत्रालय सरकार नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद सातारा यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर सातारा येथे दिनांक १७ व १८ जुलै, २०१४ रोजी संपन्न झाले.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. शिरीष यादव, श्री. डकरे, समाजकल्याण अधिकारी श्रीम. स्वाती इथापे, श्री. मोहन माळी, श्रीम. अनुराधा कानडे अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आणि समन्वयक श्री. सुहास तेंडुलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात एकूण १५५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व तपासणी करुन त्यापैकी ७९ गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. श्रवणयंत्र, व्हिलचेअर, अंध गॉगल, अंध काठी, ब्रेल कीट आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. सदरील साहित्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे कर्मचारी वृंद उपस्थित होते.

**• पुणे : दिनांक १९ व २० ऑगस्ट, २०१४ : पुणे जिल्ह्यातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरीक व कर्णबधिर मुलांना मोफत आधुनिक डिजिटल श्रवणयंत्र वाटप शिबिर :**

स्टारकी फाउंडेशन, अमेरीका, अपंग हक्क विकास मंच,

महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील १३०० श्रवणबाधित ज्येष्ठ नागरीक व कर्णबधिर मुले यांना मोफत श्रवणयंत्र वाटप शिबिर, निसर्ग मंगल कार्यालय, मार्केटयार्ड, पुणे येथे दिनांक १९ व २० ऑगस्ट, २०१४ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी स्टार्की फाऊंडेशन, अमेरीका या संस्थेचे, पदाधिकारी व स्वयंसेवक पुण्यात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्विरित्या पार पाडण्यासाठी पूर्व तयारी म्हणून सर्व स्वयंसेवकांना मा. श्री. विजय कान्हेकर, मा. श्री. सुहास तेंडुलकर, मा. श्री. निलेश राऊत, श्री. सुबोध जाधव व स्टारकीचे समन्वयक सतिश निर्मळ यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक १९ ऑगस्ट, २०१४ रोजी सकाळ पासूनच पुणे जिल्ह्यातील श्रवणबाधित ज्येष्ठ नागरीक आणि निवड केलेल्या विशेष शाळा व त्यांचे कर्णबधिर विद्यार्थी निसर्ग मंगल कार्यालयात येण्यास सुरुवात झाली. आलेल्या प्रत्येक कर्णबधिर विद्यार्थ्याला व श्रवणबाधित ज्येष्ठ नागरीकांना अगोदरच दिलेल्या व सविस्तर अशा फॉर्मसह त्यांच्या क्रमानुसार नोंदणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांना स्टेज वर बोलावून त्यांना श्रवणयंत्र बसवण्यात येत होते. प्रत्येक श्रवणयंत्राची नीट तपाणी करुन विद्यार्थ्यांना दिले जात होते. या आधुनिक डिजिटल श्रवणयंत्राची निग कशी राखावी त्याचा वापर कसा करावा, त्याची स्वच्छता कशी करावी, वापर नसताना ते कशा प्रकारे ठेवावे याची माहिति विशेष शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांना देण्यात येत होती. श्रवणयंत्र व्यवस्थित काम करत असलेल्याबद्दलची खात्री करुन माहिती पुस्तिका विद्यार्थ्यांना देण्यात येत होती.

पुणे जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. दूषित पाण्यामुळे कोणालाही त्रास होऊ नये याकरीता सर्वांना शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी मा. खा. सुप्रियाताई सुळे आणि मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांचा यशवंतराव चव्हाण साहेब लिखित ''कृष्णाकाठ'' पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती व स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. अपंग हक्क विकास मंच मुंबईचक राज्य संयोजक मा. श्री. दत्ता बाळसराफ, मा. श्री. विजय कान्हेकर, मा. श्री. निलेश राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस अपंग सेलचे राज्य प्रमुख मा. श्री. सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत, डॉ. कल्याणी मांडके आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबादचे कर्मचारी वृंद, स्वयंसेवक, नागपूर, मुंबई, पुणे विभागाचे कार्यकर्ते, स्वयंसेवकांची टीम, अपंग हक्क विकास मंचचे कार्यकर्ते आर्दीनी परिश्रम घेतले.

❑❑❑

## शासनाची कसोटी

शासनाची कसोटी केवळ कार्यक्षम कारभार ही नाही. तसेच राज्य ही काही उपभोग्य वस्तू नाही. ती समाजपरिवर्तनाची यंत्रणा झाली पाहिजे. केवळ नियोजनातील आकडेवारीने हे होणार नाही. पैसा खर्चून समाजनिर्मिती होत नाही. त्याला सर्वांगीण व जनतेच्या हृद्याला हात घालणारा ध्येयवाद लागेल व तो पेलणारे तळमळीचे नेतृत्व लागले. राजकारण हा सत्तास्पर्धेचा आखाडा करणे हे या दरिद्री असलेल्या देशात महापातक आहे. ही अवस्था फार काळ टिकू शकणार नाही. म्हणून कोणत्याही शासनाला लोकाभिमुख राहावेच लागेल.

*– यशवंतराव चव्हाण*

# शिक्षण विकास मंच
# कार्यवृत्त

शिक्षण विकास मंचाने आपल्या कतृत्त्वाच्या जोरावर महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे ह्या शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक म्हणून तर डॉ. वसंत काळपांडे, मुख्य संयोजक आणि श्रीमती बसंती रॉय विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. श्री. दत्ता बाळसराफ हे संयोजक, श्री. सुरेश पाटील, माधव सुर्यवंशी समन्वयक व मिनल सावंत, हे सहाय्यक म्हणून काम पहातात. तर श्रीमती शुभदा चौकर व श्री. विकास कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभते.

**विशेष बैठक दि. १८ फेब्रुवारी २०१४**

मंगळवार दि. १८ फेब्रवारी शिक्षण विकास मंचची विशेष बैठक डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. या बैठकीत प्रामुख्याने २५ नोव्हेंबर २०१३ रोजी ''शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग'' या विषयावर जी राज्यस्तरीय परिषद झाली त्याच्या फलनिष्पतीबद्दल चर्चा करण्यात आली.

राज्यस्तरीय परिषदेत उपस्थित तज्ञ, मान्यवर, शिक्षक, पालक यांच्याकडून ज्या सूचना आल्या आहेत त्याचा अहवाल तयार करुन शासन स्तरावर यांच्या अंमलबजावणीबाबत चर्चा करावी असे ठरले.

आगामी शैक्षणिक वर्षात या विषयावर आपणांस आणखी काय करता येईल याचीही चर्चा झाली. शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या मार्फत ज्या शाळा दत्तक घेण्यात आल्या आहेत. त्यांना भेट देण्याबाबत चर्चा यावेळी करण्यात आली. मुंबई, पुणे येथे शिक्षण कट्ट्याचे अतिशय प्रभावीपणे सध्या आयोजन करण्यात येत आहे. याप्रमाणे महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागात कट्ट्याचे आयोजन कशारितीने करता येईल याबाबतची चर्चा करण्यात आली, ई–लर्निंग कार्यशाळा एप्रिल २०१४ मध्ये रयत शिक्षण संस्था आणि शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विदयमाने सातारा येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस रॉय मॅडम, दत्ता बाळसराफ, सुरेश पाटील, माधव सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

**दि. २६, २७, २८ एप्रिल २०१४ सातारा**

एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवडयात तीन दिवसीय ९ लर्निंग परिषद रयत शिक्षण संस्था आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या संयुक्त विदयमाने सातारा येथे पार पडली. या परिषदेला राज्यभरातून निवडक असे १५० प्रतिनिधी उपस्थित होते. शालेय शिक्षणात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षण हे अधिक रंजक आणि आनंदी कसे करता येईल यावर या परिषदेत प्रात्यक्षिकसह चर्चा घडवून आणण्यात आली.

माध्यम तज्ञ डॉ. केशव साठे यांनी मल्टीमिडीयाचा वापर करुन शालेय शिक्षण कसे दर्जेदार रंजक, कल्पक, प्रोत्साहनात्कम होते हे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञान हाताशी घेऊन शिक्षकाने त्याचा वापर करावा मात्र तंत्रज्ञानाचे गुलाम होऊ नयेत असे आव्हानही त्यांनी केले. त्याचबरोबर ई–लर्निंगचे महत्त्व विशद केले.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया यांनी परिषदेला भेट देऊन परिषदेतील कामकाजात सहभाग घेतला. अनेक शिक्षकांशी त्यांनी संवाद साधला. शिक्षकांनी सदयस्थितीत आपण माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन विविध उपक्रम कशारितीने शाळेत राबवित आहोत याबद्दलची माहिती दिली. रयत शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. अरविंद बुंरुगुले यांनी रयत शिक्षण संस्थेच्या

समुहातील शाळेत शिक्षण प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग कसा केला जातो यांचे निवेदन केले.

या परिषदेच्या समारोप सत्रात डॉ. वंसत काळपांडे यांनी तीन दिवसीय परिषदेचा अहवाल सादर केला आणि उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

**दि. १२ जून २०१४ विशेष बैठक –** दिनांक १२ जून २०१४ रोजी शिक्षण विकास मंचची विशेष आढावा बैठक डॉ. वसंत काळपांडे यांच्या उपस्थित यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे झाली. सन २०१४–१५ या वर्षात कोणकोणते कार्यक्रम घ्यायचे व त्यासाठी लागणारा खर्च एकूणच या वर्षाचे अंदाजपत्रक व त्याची अंमलबजावणी याबाबतची प्रमुख चर्चा या बैठकीत झाली. या वर्षात जी राज्यस्तरीय शिक्षण परिषद होणार आहे. यासाठी कोणता विषय ठेवण्यात यावा ? त्याचं नियोजन काय असावे ? याचीही चर्चा या बैठकीत झाली.

## शिक्षणकट्टा – दि. १९ जुलै २०१४ मुंबई

शिक्षणावरील चर्चेचा शिक्षणकट्टा दि. १९ जुलै २०१४ रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये घेण्यात आला. यावेळी 'सरकारी शाळांसमोरील आव्हाने' हा विषय ठेवण्यात आला होता. या कट्टयावर मुंबईबरोबर राज्यातील विविध भागातील शिक्षकतज्ञ, शिक्षक, पत्रकार, पालक, संख्याचालक, आदिंनी सक्रीयपणे आपला सहभाग नोंदविला व चर्चेत भाग घेतला.

राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त होणाऱ्या राज्यस्तरीय परिषदेत यावर्षी शिक्षण विकास मंचाकडून माहिती व तंत्रज्ञान या विषयावरील पुस्तक काढण्याबाबत चर्चा झाली. या पुस्तकातील लेख, लेखक याबाबतीत सखोल चर्चा व मंथन करण्यात आले. राष्ट्रीय तंत्रज्ञान धोरण, वैशिष्टये अंमलबजावणी त्याचे परिणाम याबाबत सखोल चर्चा झाली.

या शैक्षणिक वर्षातील पहिला 'शिक्षण कट्टा' १९ जुलै रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने घेण्याचे ठरले. या कट्टयावरील चर्चा कोणत्या विषया संदर्भात घ्यावी याबाबतीत विचार विनिमय झाला आणि शेवटी 'सरकारी शाळां समोरील आव्हाने' या विषय कट्टयावर घेण्याचे ठरले.

या विशेष बैठकीस श्रीमती बसंती रॉय, शुभदा चौकर, माधव सूर्यवंशी, विकास कांबळे, याची उपस्थिती होती.

## शिक्षण कट्टा दि. ९ ऑगस्ट २०१४ – पुणे

गंभीरपणे पण तितक्याच हसत खेळत पद्धतीने काहीशी अनौपचारिक आणि काहीशा औपचारिक चर्चा करण्याचे ठिकाण म्हणजे 'शिक्षण कट्टा' होय. गेल्या काही वर्षापासून शिक्षणावरील ही चर्चा राज्यातील शिक्षणतज्ञ व त्याचबरोबर शिक्षणात काम करणारे शिक्षक, पत्रकार, पालक, विदयार्थी यांना सोबत घेऊन ही चर्चा अविरतपणे आहे. यावेळी हा शिक्षण कट्टा पुणे येथे पार पडला.

राज्यातील निवडक अशा २० तज्ञ अधिकाऱ्यांने सिंगापूरचा अभ्यास दौरा केला. या अभ्यास दौऱ्यात सिंगापूरची शिक्षणपद्धती त्यांनी समजून घेतली. सिंगापूरची शिक्षणपद्धती आणि महाराष्ट्रातील शिक्षण पद्धतीचा तुलनात्मक अभ्यास करुन आगामी काळात महाराष्ट्रातील शिक्षण पद्धतीत याचा उपयोग होईल असे मत महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक श्री. मम्हाणे यांनी मांडले. या शिक्षण कट्ट्याची सुरुवात श्रीमती बसंती रॉय यांच्या प्रास्ताविकाने झाली. रॉय मॅडम यांनी शिक्षण कट्ट्यामागील भूमिका विशद करून शिक्षण कट्ट्यावरील चर्चेचे महत्त्व अधोरेखित केले. आजच्या कट्ट्यावरील प्रमुख वक्ते जे आपल्या अभ्यास दौऱ्याचे अनुभव कथन करणार होते. त्यांचा परिचय डॉ. वसंत काळपांडे यांनी करुन दिला.

आपले अनुभव सांगताना श्री. म्हमाणे म्हणाले की, सिंगापूरची शिक्षण पद्धती नक्कीच आपल्यापेक्षा जास्त चांगली आहे. महाराष्ट्रातील शिक्षणपद्धतीला त्यात चांगले शिकण्यासारखे खूप आहे. त्याच्या अनुभव कथनानंतर उपस्थित असलेल्या शिक्षकांनी त्यांना विविध प्रश्न विचारले व आपल्या शंकेचे निरसन केले.

चर्चेचा प्रारंभ डॉ. वसंत काळपांडे आणि बसंती रॉय यांच्या प्रास्तविकाने झाला. सरकारी शाळांसमोरील आव्हाने सांगताना उपस्थितांनी पुढील मुद्दयावर प्रामुख्याने चर्चा केली. शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशिक्षण आणि मुख्याध्यापक निवडीची प्रक्रिया त्यातील सुधारणा आदीबाबतीत अतिशय टोकदार चर्चा यावेळी कट्टयावर झाली. अनुदानित शाळांचे देय अनुदान या धगधगत्या विषयावर वादग्रस्त चर्चा यावेळी कट्टयावर झाली.

सरकारी शाळेत सुधारणा होण्यासाठी उपाययोजना यावेळी अनेकांनी मांडल्या. मराठी शाळांना सेमी इंग्रजी पर्याय दयावा यावर असे सुचविण्यात आले. मुंबई बोर्डाचे चेअरमन लक्ष्मीकांत पांडे यांनी काही नवीन उपक्रम सांगितले. सरकारी शाळांसमोर सध्या खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे आव्हान आहे. हे आव्हान मोठे आहे. यासाठी सरकारी शाळांना स्पर्धेत राहणे आवश्यक आहे असे मत मांडण्यात आले.

या कट्टयावर डॉ. अय्यर मॅडम, सुचिता भवाळकर, नजमा काझी, राज अलोनी, श्रीधर पाटील, विकास कांबळे, अर्चना घारे, गिरीश दिवाण, बाळासाहेब होडे, निलेश बोराळे, नंदकिशोर जाध यांनी आपआपले मत मांडले.

## ''सुयश शैक्षणिक गुणवत्ता विकास प्रकल्प'' आयोजित कृतिसत्र संपन्न

पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी विज्ञान केंद्र, माळेगाव, बारामती येथे दौंड, बारामती, इंदापूर, पुरंदर या तालुक्यातील निवडक प्राथमिक व माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक, शिक्षकांचे **२० व २१ सप्टेंबर** रोजी दोन दिवसीय कृतिसत्र संपन्न झाले. या कृतिसत्राचे प्रास्ताविक डॉ. वसंत काळपांडे, मुख्य संयोजक, शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांनी केले, तर या कृतिसत्रामागीत भूमिका बसंती रॉय, विशेष सल्लागार शिक्षण विकास मंच यांनी विशद केली.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन आणि कृतियुक्त शिक्षण या विषयावर सदरील सर्व शिक्षकांचे उद्‌बोधन श्री. शिवाजी तांबे, श्री. प्रकाश परब, श्री. संदीप वाकचौरे यांनी केले. कृतियुक्त शिक्षण देत असताना मुलांना याचा आनंद कसा देता येईल याबद्दल सर्व सहभागी शिक्षकांनी स्वतःचे अनुभव या ठिकाणी सांगितले.

शालेय जीवनात दहावीच्या परीक्षेचे महत्त्व ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांना असते त्याप्रमाणे शाळेलाही असते. आपल्या शाळेचा निकाल १००% कसा लागेल याबद्दल जेष्ठ शिक्षण तज्ञ डॉ. श्री. अ. ल. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. श्रीमती बसंती रॉय आणि डॉ. जयश्री करंबे यांनी विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे विविध पैलू आणि त्याबाबत काय करता येईल यांचे मार्गदर्शन केले.

आपल्या शाळेचा परिसर हा पर्यावरणीय दृष्ट्या कसा सुशोभित करता येईल; आपल्या शाळेतच औषधी वनस्पतींची बाग कशी फुलवता येईल या बाबतची चर्चा श्री. प्रशांत शिंदे, सायली जगताप आणि पर्यावरणात काम करणाऱ्या तज्ञांनी केली. यातून सर्वांना पर्यावरणीय संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

मुलांच्या शालेय जीवनात शिष्यवृत्ती परीक्षा आणि राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेला अनन्य साधारण महत्व असते हे ओळखून या कृतिसत्रात महाराष्ट्र शासनाचे शिक्षण सहसंचालक डॉ. सुनील मगर यांच्या उपस्थित चर्चा झाली. मुख्याध्यापक व शिक्षक यांनी ह्या परीक्षेची तयारी करत असताना त्यांना जे अनुभव येतात ते कथन करुन आपल्या अडचणी युक्त समस्या मांडल्या यातून कसा मार्ग काढावा याबाबतचे मार्गदर्शन डॉ. सुनील मगर यांनी केले.

इंग्रजी भाषेला आजच्या व्यवहारी व व्यावसायिक जगात असलेले महत्व लक्षात घेवून इंग्रजी भाषेतील विविध कौशल्य अवगत करावी. याबद्दलची चर्चा डॉ. प्रशांत गावंडे आणि डॉ. श्रुती चौधरी, सदस्य इंग्रजी भाषा समिती, बालभारती यांच्या

प्रमुख उपस्थितीत झाली. प्रामुख्याने शिक्षकास इंग्रजी भाषेचे अध्यापन करीत असताना येणाऱ्या ज्या अडचणी आहेत यांचे कथन सर्वांनी केले. यावर काय मार्ग आहेत याबद्दलची चर्चा दोन्ही तज्ञांनी केली. इंग्रजीबद्दल शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनात जी न्यूनगंडाची भावना आज आहे ती दूर करण्यास या चर्चेचा उपयोग होईल असे सर्वांनी नमूद केले.

दोन दिवस अतिशय महत्त्वाच्या विषयावर झालेल्या चर्चेच्या आधारावर आगामी काळातील कृतिकार्यक्रम या ठिकाणी सादर करण्यात आला व त्याचे भविष्यकालीन नियोजनात्मक स्वरूप कसे राहील यांचे विवेचन डॉ. वसंत काळपांडे यांनी समारोपाच्या सत्रात केले. समारोपाच्या प्रसंगी मुख्याध्यापक, शिक्षक यांनी कृषिविज्ञान केंद्र निसर्गरम्य परिसरात झालेले हे प्रशिक्षण नक्कीच वेगळा अनुभव देणारे आहे अशा भावना व्यक्त करुन याचा उपयोग नक्कीच विद्यार्थ्यांनच्या गुणवत्ता विकासास होईल असे सांगितले.

❑❑❑

### श्रद्धा आणि निष्ठा

श्रद्धा ही एक शक्ती आहे. सत्य धारण करते, ती श्रद्धा. सत्याचा पाठपुरावा हा त्या अर्थाने श्रद्धेचाच पाठपुरावा असतो. अढळ आणि निस्सीम श्रद्धा सत्याच्या आचरणातून, तशा आचरणामुळेच वाढते आणि स्थिर बनते. अढळ आणि निस्सीम श्रद्धा मानवाला सर्वस्वाचा स्वाहाकार आनंदाने करण्यास सिद्ध बनवते. स्वातंत्र्याविषयीची श्रद्धा ज्यांनी जोपासली, त्यांच्या सर्वस्वाच्या स्वाहाकाराची उदाहरणे आपल्यासमोर आहेत. इतिहासाने त्यांची नोंद घेतलेली आहे. माझ्या व्यक्तिगत, सार्वजनिक आणि राजकीय जीवनात संघर्षाचे, श्रद्धा दोलायमान करणारे, जीवननिष्ठा दोलायमान करणारे प्रसंग निर्माण झाले. घटना शिजल्या. त्या प्रत्येक वेळी जीवननिष्ठा आणि श्रद्धा अधिक मजबूत, बळकट करण्याची ती एक संधी मी मानली. लोकांवरील, लोकशाहीवरील श्रद्धेच्या बळावर राष्ट्रनिष्ठा, समूहनिष्ठा, मानवतेवरील निष्ठा जीवननिष्ठेपासून अलग होऊ दिल्या नाहीत. एरवी हे जीवन निर्माल्य बनले असते !

*– यशवंतराव चव्हाण*

# सृजन
## कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या, रंगस्वर, सृजन विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि विविध कलांची तोडओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृद्ध व्हावे या करीता सृजन 'हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना व संयोजन सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहे.

- **२ फेब्रुवारी २०१४** 'कास विज्ञानाची' या विषयावर टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च सेंटरचे श्री. सुरेश चांदवणकर यांनी विद्यार्थ्यांना वैज्ञनिक खेळणी तयार करण्याकरीता आपल्या परिसरात उपलब्ध गोष्टीचा उपयोग करुन खेळणी तयार करावी हे शिकवले. विविध खेळण्याचे स्लाईड शोचे प्रात्यक्षिक दाखवून मुलांकडून वैज्ञनिक खेळणी तयार करुन घेतली.
- **२ मार्च २०१४** रोजी श्रीमती उषा बोरसे, समुपदेशक यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास बद्दल मार्गदर्शनामध्ये अवघड विषयांच्या तयारी कशी कराल त्याचबरोबर नावडत्या विषयाबद्दल आपणास आवड निर्माण करण्याकरीता आपण काय उपाययोजना करावी. मार्क मिळण्याबरोबर आपल्या पुढील आयुष्यात यशस्वी वाटचाल करण्याकरीता वेगवेगळ्या विषयाचा अभ्यास करण्याची तयारी कशी करावी या विषयावर मुलांशी स्लाईड शोद्वारे संवाद साधला विद्यार्थ्यांनी त्यांचा अभ्यास करत असताना येणाऱ्या समस्या आणि परिक्षेच्या अनुषंगाने अनेक प्रश्न विचारुन शंखासमाधान करुन घेतले.
- **७ जुलै २०१४** रोजी श्री आशुतोष आपटे यांनी 'नेपथ्य' या विषयाच्या कार्यशाळेत नाटकातील आशय लोकांपर्यंत पोचविण्याकरीता नेपथ्याची भूमिका काय असते. तसेच कुठल्याही प्रकारे साधनांचा वापर न करता मुलांच्या वेगवेगळ्या गटांमधून नेपथ्याची मानवनिमित्त मांडणी करण्याचे कौशल्य व समन्वयाचे महत्व मुलांना पटवून दिले.
- **३ ऑगस्ट २०१४** 'मातीला पाय फुटतात' समक्या आहिरे यांनी मुलांना मातीपासून विविध प्रकारची वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले. मुलांनी या कार्यशाळेत मातीच्या छोटया वस्तू आणि गणपती इ. प्रकारे बनविले.

एप्रिल ते जुन या महिन्यात मुलांच्या वार्षिक परिक्षा आणि उन्हाळाची सुट्टी यामुळे तीन महिने सर्जन कार्यशाळा आयोजित करण्यात येत नाही.

सृजनाच्या कार्यशाळेत प्रत्येक सत्रात १०० ते १५० च्या आसपास विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

❑❑❑

# वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान हे पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणासाठी उभारलेले व्यासपीठ आहे. माननीय खासदार, सुप्रियाताई सुळे याच्या निमंत्रक आहेत. हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीची समस्या आज संपूर्ण जगाला भेडसावत आहे. त्याच्या दुष्परीणामांना मुंबईलाही सामोरे जावे लागणार आहे. म्हणूनच हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीची समस्या नीट समजून घेण्यासाठी आणि त्यांचा एकूणच पर्यावरण व मानवी जीवनावर होणार परिणाम याबद्दल शालेय विद्यार्थ्यांमध्ये जाणीवजागृती व्हावी या उद्देशाने हवामान बदल विषयक शिक्षण व कृती प्रकल्पाची आखणी करण्यात आली होती. या प्रकल्पामध्ये विद्यार्थ्यांबरोबर स्थानिक पातळीवरील पर्यावरणीय उपाययोजना करण्याकरीता विद्यार्थी, शिक्षक आणि शाळांची तयारी करुन घेणे, स्थानिक प्रजातींच्या वनस्पतींचे संवर्धन करणे, वीज-पाण्याच्या अपव्ययाचे ऑडीट करणे, देशी बियाणांची बँक स्थापन करणे, टाकाऊ कागदापासून नवा कागद निर्माण करणे, स्थानिक बाग-जंगल-सागरकिनारा अशा नैसर्गिक स्थळांच्या क्षेत्रभेटी आयोजित करणे, यासारखे विविध कृतीशील उपक्रम वर्षभर राबविण्यात आले.

दिनांक २० फेब्रुवारी २०१४ रोजी शैक्षणिक वर्ष जून २०१३ ते जानेवारी २०१४ या कालावधीमध्ये राबवलेल्या या प्रकल्पाचा समारोप समारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभागृहात सकाळी ९.३० ते १२.३० या वेळात पार पडला. या कार्यक्रमासाठी महानंद डेअरीच्या अध्यक्षा श्रीम. वैशालीताई नागवडे व बालसाहित्यिक श्री. अनंत भावे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले होते. प्रथम त्यांनी शाळांनी मांडलेल्या प्रकल्पांची पाहाणी केली. त्यानंतर सहभागी आणि विजेत्या शाळांना प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. अनुक्रमे अनुदत्त विद्यालय, कांदिवली प्रथम क्रमांक; साने गुरुजी विद्यालय, दादर द्वितीय क्रमांक; आणि आय. इ. एस. दिगंबर पाटकर विद्यालय, दादर तृतीय क्रमांक या सर्वोत्कृष्ट शाळा ठरल्या.

शैक्षणिक वर्ष जून २०१४ ते जानेवारी २०१४ या कालवधीमध्ये हवामान बदलास उत्तर म्हणून यशवंत औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्पाची सुरुवात शिक्षकांसाठी एक दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेने झाली. मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट २०१४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेस मुंबईतील निवडक दहा शाळांमधील प्रत्येकी २ शिक्षक उपस्थित राहिले होते. पृथ्वीच्या वाढत्या तापमानावर सर्वात प्रभावी उपाय म्हणजे वृक्षसंवर्धन होय. एक वृक्ष प्रति वर्ष जवळजवळ १० किलो कार्बनडाय ऑक्साईड वायू शोषून घेतो. वातावरणात असह्य उष्णता निर्माण करणाऱ्या कार्बनडाय ऑक्साईड, नायट्रस ऑक्साईड आणि मिथेनसारख्या वायूंना आटोक्यात ठेवण्यासाठी जास्तीत जास्त जमीन वृक्षलागवडीखाली आणणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या मातीत वाढणाऱ्या आणि बदलत्या तापमानात टिकून राहतील अशा वनस्पतींची लागवड आणि संवर्धन मोठया प्रमाणात घडवून आणणे हे वाढत्या तापमानाला आवर घालण्याचे थेट उत्तर आहे. औषधी वनस्पतींचे आपल्या जीवनातील स्थान कालातीत आहे. या सर्व गोष्टींचा समग्र विचार करुन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने यशवंत औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प राबविण्याचा संकल्प केला आहे. शाळा परिसरात सावली देणाऱ्या आणि औषधी गुणधर्म असणाऱ्या वनस्पतींची लागवड करण्यात येणार आहे. महाराष्ट्राचे भवितव्य घडविणारी विद्यार्थी पिढी निसर्गरम्य आणि निरोगी वातावरणात वाढावी हे या प्रकल्पाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन स्टेप बाय स्टेप या

आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या व पायाभूत शिक्षणावर कार्य करणाऱ्या संस्थेच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झाले. स्टेप बाय स्टेप संस्थेच्या स्वीडन देशातील प्रतिनिधी श्रीम. जॅनेट रेनब्रांड व इंग्लंड मधील प्रतिनिधी श्रीम. आरती पंड्या यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. या दोघींनी कार्यशाळेचे उद्घाटन करुन तेथे उपस्थित असलेल्या शाळांना इंग्रजी भाषा तसेच वर्ग नियमनावर शिक्षकांचे प्रशिक्षण हवे असल्यास मोफत उपलब्ध करुन दिले जाईल असे आश्वासन दिले. यानंतर श्रीम. संगीता खरात यांनी औषधी वनस्पतींचे महत्त्व या विषयावर स्लाईड शो घेतला. त्यानंतर स्लाईड शो वर आधारीत प्रश्नमंजुषा घेण्यात आली ज्या शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. विजेत्या शिक्षकांना लागलीच औषधी वनस्पती हे पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात आली. यानंतर औषधी वनस्पतींच्या विविध उपयोगाची प्रात्यक्षिके उदा. अडुळशाचा काढा, कोरफडीचे सरबत, कुंडीत झाड कसे लावावे यासारखे उपक्रम घेतले गेले. हे सारे उपक्रम श्रीम. ज्योती खोपकर यांच्या मार्गदर्शनाखाली महर्षी दयानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी जागृती गुरव, योगिता बासुतकर, अजय गुरव व श्रेयस खारकर यांनी करुन दाखविले.

भोजन विश्रामानंतर औषधी वनस्पतींबद्दल माहिती सांगणारा ''**चला शोधू या गुप्त खजिना**'' हा खेळ घेण्यात आला व त्यांनतर नक्षत्र वनाची संकल्पना शिक्षकांना समजावून सांगण्यात आली. या प्रकल्पाची ध्येय व उद्दीष्टे काय आहेत, प्रकल्प कसा राबविला जाईल, तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीत प्रकल्पात सहभागी होणाऱ्या शाळांच्या काय जबाबदाऱ्या असतील याची मांडणी श्रीम. संगीता खरात यांनी केली. समारोपाच्या सत्राला पाहुणे म्हणून बदलापूरचे नगरसेवक श्री. श्रीधर पाटील हे लाभले होते. त्यांनी या प्रकल्पाचे कौतुक करुन त्यांच्या वतीने विविध प्रकारच्या औषधी वनस्पती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले. श्री. प्रशांत शिंदे यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यशाळेचा समारोप केला.

❑❑❑

### विज्ञाननिष्ठ समाज

विज्ञानसेवेचा किंवा प्रसाराचा विचार करताना माझ्या मते त्याच्या दोन प्रमुख अंगांचा विचार केला पाहिजे : एक तर मानवजातीसमोर आज जी संकटांची परंपरा उभी आहे, ती नाहीशी करण्यासाठी, निसर्गाचे गूढ उकलून, मानवाला जास्तीत जास्त शक्ती प्राप्त करुन देणारे संशोधन करणे आणि अशा प्रकारच्या संशोधनास प्रोत्साहन देणे. दूसरे, जे माझ्या मते जास्त व्यापक कार्य आहे, समाजात विज्ञानविचाराचा प्रसार व प्रचार करुन समाजच विज्ञाननिष्ठ बनविणे. हे काम करण्यासाठी मात्र आपणांस जास्त कष्ट घ्यावे लागतील, प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल. विज्ञानाचे मूळ स्वरूपच तर्कसंगत, बुद्धिसंमत विचार असे आहे. हा विचार जनतेच्या मनात दृढमूल झाल्यावरच आपण एक आधुनिक समाज निर्माण करु शकतो. जुन्या सनातन कल्पना समाजातून काढून टाकण्याचा हाच एक कार्यक्षम उपाय आहे. या दिशेने जितक्या जलद वाटचाल होईल, तितक्या लवकर आपला देश व समाज प्रगतिशील राष्ट्रांच्या मालिकेत जाऊन बसेल.

*– यशंवतराव चव्हाण*

# कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम
# कार्यवृत्त

• समाजातील गोरगरीब, दीनदुबळे व मागास वर्गाच्या लोकांना त्यांच्या आर्थिक अपात्रतेमुळे किंवा मागासलेपणामुळे अन्याय सहन करण्याची पाळी येऊ नये यासाठी उपाय योजावेत अशा प्रकारचे मार्गदर्शन आपल्या संविधानामध्ये करण्यात आले आहे. या तरतुदीला अनुसरुन संसदेने १९८७ मध्ये विधी सेवा प्राधिकरण अधिनियम पारित केला आहे. त्या अधिनियमानुसार संपूर्ण देशामध्ये गरीब व तळागाळातील लोकांना मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला पुरविला जातो.

• १९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमात अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

• **फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारची कामे केली जातात:–**

१. समाजातील गोरगरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.

२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

३. काही वेळा पत्रव्यवहारद्वारे गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.

४. पक्षकारांच्या तंट्यामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.

५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सूचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैद्यानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

६. कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

७. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी राज्याच्या वेगवेगळ्या ठिकाणी वेळोवेळी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.

८. संबंधित न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या सहकार्याने लोकन्यायालयाचे आयोजन करणे.

९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मुट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे, तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नितिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.

त्यानुसार गेल्या सात महिन्यात म्हणजेच १ फेब्रुवारी २०१४ ते ३१ ऑगस्ट २०१४ या अवधीमध्ये फोरमकडून करण्यात आलेल्या कामांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

• **फोरमच्या बैठका :–** कायदेविषय सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमल बजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुसऱ्या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. त्यानुसार गेल्या सात महिन्यांमध्ये एकूण सात बैठका झाल्या. सरासरी ११ सदस्य प्रत्येक बैठकीला उपस्थित होते. एकूण १२१ बाबीसंबंधी निर्णय घेण्यात आले. तसेच या बैठकांची एकूण उपस्थिती ७७ इतकी होती.

• **उपसमितीच्या बैठका:–** एखाद्या विषयांसंबंधी सखोल अभ्यास करुन प्रस्ताव तयार करण्यासाठी वेळोवेळी फोरमच्या वेगवेगळ्या उपसमित्या नेमल्या जातात व आवश्यकतेनुसार त्यांच्या बैठका घेतल्या जातात.

• **कायदेविषयक सल्ला केंद्र:–** गोरगरीब व सामान्य लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजता चव्हाण केंद्राच्या दुसऱ्या मजल्यावरील प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या सात महिन्यांमध्ये या केंद्राच्या २८ बैठका झाल्या. अंदाजे ४३ लोकांनी या केंद्रामध्ये येऊन मोफत सल्ल्याचा लाभ घेतला आहे. या केंद्राचे काम सर्वश्री म.बा. पवार, भूपेश सामंत, निलेश पावसकर, प्रकाश देशमुख व श्रीमती प्रीतींदर सिंग इत्यादी वकिलांनी पाहिले.

• **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र:–** दर मंगळवारी आवश्यकतेनुसार सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत समुपदेशन व तडजोड केंद्राचे आयोजन करण्यात येते.

• **आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या व्याख्यानमाला (know your Law Lecture Series) :–** या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यातून एकदा कायदेपंडितांचे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते.

• **विधी साक्षरता कार्यशाळा :–** लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ – पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यायाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या सात महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये खालील कार्यक्रमांचा समावेश आहे.

१. फोरम व बोधिसत्व प्रतिष्ठान, नालासोपारा (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १६.२.२०१४ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) शंकरराव जाधव महाविद्यालय, नालासोपारा (पूर्व) येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुलगे व मुली) कार्यक्रमाला उपस्थित होते. सर्वसाधरण विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यात आली.

२. फोरम व रोटरी क्लब ऑफ लिंक रोड, ऐरोली, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. २३.२.२०१४ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सुशिलाबाई देशमुख विद्यालय, ऐरोली येथे एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते. श्री. दिप कपाडीया हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

३. फोरम व मैत्री संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक ९ मार्च २०१४ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) डॉ. शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई येथे महिला व पुरुषांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. सुरज भोईर उपस्थित होते.

४. फोरम व मैत्रेय फाऊंडेशन व केशव गोरे स्मारक ट्रस्ट, गोरेगांव पश्चिम यांच्या संयुक्त विद्यमाने गोरेगांव येथे रविवार दिनांक २३ मार्च २०१४ रोजी (सकाळी १०.००

ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) महिला व पुरुषांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त स्त्री–पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते.

• **शपथ कार्यक्रम** :– सर्व विधी साक्षरता कार्यशाळांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात येते. तसेच संविधानातील मूलभूत कर्तव्य पालनासंबंधी शपथा घेण्यात येतात. त्याचप्रमाणे अविवाहित मुले व मुली यांच्याकडून हुंडाबंदीसंबंधी शपथा घेण्यात येतात. वरील सर्व कार्यक्रमांमध्ये हे सर्व काम करण्यात आले व शपथा घेण्यात आल्या.

• **कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे** :– विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात येते त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश असतो. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्रधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६०, (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छा पत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी Maharashtra Housing Authorities Act, 2012, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995, (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद, व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॉपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रँगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (Bye-Laws of the Housing Societies) (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व

मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०, (५३) कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा, २०१४

- **आगामी कार्यक्रम** :– पोलीसांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा विचार चालू आहे.

❑❑❑

## ग्रंथप्रसार

केवळ उत्कृष्ट साहित्य निर्माण करुन भागणार नाही, तर त्याचे सुबक प्रकाशन व स्वस्त पुस्तक योजनांद्वारे त्याचा प्रसार करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात आता औद्योगिक विस्तार झाल्यामुळे काहीसा सुस्थितीत असलेला नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे. तो वर्ग टेलिव्हिजन जितकी प्रतिष्ठेची वस्तू मानतो, तितकेच त्या वर्गाने स्वतःचे ग्रंथालय असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले पाहिजे. मला असे वाटते, की एक प्रकारची ग्रंथशून्यता आता येत आहे. त्यामुळे पुस्तके खपत नाहीत. हे घातक आहे. ग्रंथालयांना पुस्तकांची आवड निर्माण करता येईल. 'चिंतनशील साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य' असे समीकरण झाले आहे. हे अपुरे आहे. नवे पदवीधर, नवी विद्यालये नव्या चिंतनशील साहित्याची गिऱ्हाइके आहेत. पण महाराष्ट्रात नवी विद्यापीठे निघूनही ग्रंथांचा प्रसार कां होत नाही, याचा विचार करावयास पाहिजे.

*– यशवंतराव चव्हाण*

# महाराष्ट्र महिला व्यासपीठ
# कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, व सामाजिक या विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. संयोजिका रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका ममता रमेशचंद्र कानडे महिला व्यासपीठाचे काम पाहतात. त्यांना संजना पवार आणि मनिषा खिल्लारे यांचे सहकार्य असते.

मुंबई मध्ये २० ते ४० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थाचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे आणि उपविधी लोकांना माहित असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे २०१० सालापासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई मध्ये **''सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण''** दिले जाते. या कार्यशाळेला मा. प्रभाकर चुरी, मा. प्रशांत कानविंदे, अॅड प्रमोद कुमार मा. देवयानी गोरे, मा. विजय सामंत, व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ / अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करु शकतात, व आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करु शकतात. तसेच सामाजिक ज्ञान / भान याची जाणीव होते. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षाच्या व ४५० च्या वर प्रशिक्षणार्थिनी हे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. या प्रशिक्षणाचा ११ वा वर्ग दिनांक ९ जून २०१४ ते १० जुलै २०१४ या कालावधीत घेण्यात आला, या कार्यशाळेला एकूण २७ प्रशिक्षणार्थीचा सहभाग होता. या कार्यशाळेच्या प्रमाणपत्र वितरणाला प्रमुख अतिथी म्हणून भा.प्र. से. निवृत्त अधिकारी मा. करुण श्रीवास्तव लाभले होते.

## मधुबनी

मधुबनी रंगकला हि एक बिहारी कला असून ती कागद व कापडावर रंगकला कृती करुन त्याची फ्रेम म्हणजे चौकटीमध्ये शोभेच्या वस्तूसाठी उपयोगात आणली जाते. ह्या कलेचे मार्गदर्शन मा. वंदना पवार याच्याकडून लाभले. दिनांक १७ फेब्रु. २०१४ ते ०३ मार्च २०१४ या कालावधीत महाराष्ट्र महिला व्यासपीठा कडून ह्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला एकूण १२ प्रशिक्षणार्थींची उपस्थिती होती.

## इकेबाना

इकेबाना म्हणजे जपानी पद्धतीची फुलांची रचना या कार्यशाळेचा हा दुसरा वर्ग असून दिनांक २४ मार्च २०१४ ते २८ मार्च २०१४ या कालावधीत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये एकूण ११ प्रशिक्षिणार्थीचा सहभाग होता. IKEBANA FLOWER ARRANGEMENT, Yashwantrao Chavan Pratishthan व Bombay Chapter Ohara School of Ikebana Japan, यांच्या संयुक्त विद्यमाने इकेबाना हि कार्यशाळा महाराष्ट्र महिला व्यासपीठाकडून सतत राबवली जाते. ह्या कार्यशाळेचा तिसरा वर्ग दिनांक २१ जुलै २०१४ ते २५ जुलै २०१४ या कालावधीत घेण्यात आला, या कार्यशाळेला १५ महिला व २ पुरुष अशा एकूण १७ प्रशिक्षणार्थीचा सहभाग होता. वेगवेगळी फुले व इतर साहित्य वापरुन सजावट कशी करावी व इकेबाना या प्रशिक्षणाचे संपूर्ण मार्गदर्शन **Bombay Chapter Ohara School of Ikebana** च्या अध्यक्षा मा. नलिनी डुंगरसी याच्याकडून प्रशिक्षणार्थीना मिळाले.

## रांगोळी

दिनांक ०५/०४/२०१४ रोजी 'मंजिरीची झटपट रांगोळी' हि कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत ४० महिलांचा

सहभाग होता. महिलांची आवड लक्षात घेता, महाराष्ट्र महिला व्यासपीठाकडून हिच कार्यशाळा पुन्हा दिनांक २५ एप्रिल २०१४ रोजी घेण्यात आली, या कार्यशाळेला २८ महिलांचा सहभाग होता.

रांगोळी म्हणजे प्रसन्नता, सकारात्मकता व भारतीय संस्कृतीचे कलात्मक प्रतिबिंब म्हणूनच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे ''मंजिरीच्या झटपट रांगोळ्या व रांगोळी काढायच्या सोप्या व विविध पद्धती'' या कार्यशाळेच्या दोन वर्गाला मिळालेला भरघोस प्रतिसाद व खास आग्रहास्तव पुन्हा एकदा एकदिवसीय कार्यशाळा दिनांक ०३ मे २०१४ रोजी, आयोजित करण्यात आली, या कार्यशाळेत महिलांचाच नव्हे तर पुरुषांचाही सहभाग होता. या कार्यशाळेला एकूण ३८ प्रशिक्षणार्थींचा उच्च प्रतिसाद मिळाला. दिनांक २२ ऑगस्ट २०१४ रोजी या कार्यशाळेचे पुन्हा आयोजन करण्यात आले, या कार्यशाळेला एकूण १७ प्रशिक्षणार्थींचा सहभाग होता.

## इतर प्रशिक्षण

### विद्युत सुरक्षा आणि उद्वाहक व्यवस्थापन

शॉर्ट सर्किट मुळे लागणाऱ्या आगीचे व उद्वाहक मधील अपघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेता, त्यांना पायबंद कसा घालता येईल, तसेच अपघात घडल्यास विद्युत नियमाप्रमाणे कारवाई कशी करता येईल, या विषयासंदर्भात मा. श्री. प्रकाश कुलकर्णी यांनी २६ फेब्रुवारी २०१४ रोजी विद्युत सुरक्षा व उद्वाहक वापरा संबधी च्या प्रशिक्षणात आपले अमुल्य मार्गदर्शन केस स्टडीच्या माध्यमातून मांडले. ७० ते ७५ लोकांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

## काव्य संमेलन

दिनांक १८ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व रंगस्वर यांच्या संयुक्त विद्यमाने संध्याकाळी ६.०० ते ८.०० या वेळेत काव्यसंमेलन आयोजित केले होते, या कार्यक्रमाचे आयोजन मा. रेखा नार्वेकर यांनी केले होते, रूढी, परंपरा, निसर्ग आणि अध्यात्म, याच प्रमाणे भावविश्वातील पाउस या विषयावर कविता सादर करण्यात आल्या, कार्यक्रमाची प्रस्तावना व कवयित्रीचे स्वागत मा. ममता रमेशचंद्र कानडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवयित्री मा. प्रतिभा सराफ यांनी, तसेच या संमेलनाला कवयित्री म्हणून, अनुपमा उजगरे, गौरी कुलकर्णी, अनुराधा नेरुळकर, ज्योती कपिले, फरझाना डांगे, संगीता अरबुने, रेखा नार्वेकर, प्रतिभा सराफ, यांचा सहभाग लाभला होता. या कार्यक्रमाला श्रोत्यांची उत्तम दाद मिळाली.

❑❑❑

### खरा पुरुषार्थ

मला वाटते, आपण समस्यांनी उत्तेजित व उद्विग्न होतो. पण मनुष्य जोपर्यंत सुधारणेसाठी झगडतो आहे तोपर्यंत प्रश्न राहणारच. ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणे हे राज्यकर्त्यांचे काम आहे. जगातील कोणत्याही प्रगत वा अप्रगत देशापुढे आज समस्या नाहीत, असे झालेले नाही. भारत तर एका अभूतपूर्व प्रयोगात गुंतला आहे. अनेक संकटे कोसळत आहेत. नवीन समस्या पुढे येत आहेत. पण वांछित नियतीसाठी झुंज देण्यातच खरा पुरुषार्थ आहे.

*– यशवंतराव चव्हाण*

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय, मुंबई
# कार्यवृत्त

**प्रस्तावना** – आज तंत्रज्ञानाने प्रत्येक क्षेत्रात महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. त्यामुळे दैनंदिन जीवनातील प्रत्येक घडामोडी तंत्रज्ञानावर अवलंबू लागल्या आहेत. (उदा. इंटरनेट, भ्रमणध्वनी, वाहन) अशी बरीचशी उपकरणे आहेत ज्याशिवाय माणसाचे जीवन विस्कळीत होऊ शकते. तंत्रज्ञान ही आजच्या काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या बाबतीत ग्रंथालय कसे मागे राहू शकते, कारण प्रत्येक क्षेत्रात आज संगणकावर कार्यप्रणाली केल्या जातात त्याच प्रमाणे ग्रंथालय क्षेत्रात सुद्धा संगणकाचा वापर होऊ लागला आहे.

**ग्रंथालयाचे महत्त्व** – संगणकीय तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयाचे महत्त्वही मोठ्या प्रमाणात वाढत आहे ग्रंथालय फक्त ग्रंथांचेच ही संकल्पना तंत्रज्ञानाने मोडीत काढली आहे. ''ग्रंथालयामध्ये ग्रंथासोबत आणखी माहितीचे स्त्रोत, संदर्भ सेवा अशा अनेक सुविधांनी परिपूर्ण असे आजचे ग्रंथालय आहे. वाचकांना एका छताखाली त्यांच्या आवडीचे तसेच अभ्यासाचे ग्रंथ व चालू घडामोडीची (current awareness service), वैशिष्ठपूर्ण माहिती (selective dissemination of information) अशा ग्रंथालयातील महत्वाच्या सेवा त्वरीत तसेच विनामूल्य उपलब्ध करुन दिल्या जातात.''

**ग्रंथालय व्यवस्थापनप्रणाली (Library management Software)** – ग्रंथालय व्यवस्थापन प्रणालीमुळे ग्रंथालय कर्मचारी कमी वेळेत जास्तीत जास्त वाचकांना ग्रंथालयाच्या सोयी सुविधांबद्दल तसेच सेवाबद्दल माहिती देऊन वाचकांच्या गरजा भागवू शकतो.

**ग्रंथालय संगणकीकरण** – ग्रंथालय ही आज काळची गरज आहे. प्रत्येक क्षेत्रात संगणकांचा वापर वाढला आहे. त्याच प्रमाणे ग्रंथालयात संगणकाचा वापर होत आहे. पूर्वीच्या काळी ग्रंथालयातील सर्व प्रक्रिया हाताने केल्या जात असत, ग्रंथालयातील देवघेव (Issue, Returning) तथा तालिकीकरण, (Cataloguing) साठी पडताळताना (Stock Verfication) अशा मोठ्या प्रक्रिया ह्या ग्रंथपालास हाताने कराव्या लागत व ह्यासाठी मोठयाया प्रमाणात मनुष्यबळ तसेच वेळ लागत असे. परंतु आज संगणक तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथ देवघेव, तालिकीकरण व साठा पडताळणी अवघ्या १ मिनिटात होते व ह्यामुळे मनुष्यबळ कमी लागते तसेच वेळेची बचत होते. त्यामुळे ग्रंथालयाचा दर्जा व वापर वाढतो.

खाजगी अज्ञावली, मुक्तद्वार अज्ञावली, मोफत अज्ञावली

तीन प्रकारची अज्ञावली ग्रंथालय व्यवस्थापनेसाठी उपलब्ध आहे.

१. **खाजगी अज्ञावली (Commercial Software)** :– ही अज्ञावली एका विशिष्ठ कंपनीने व्यवसायासाठी तयार केलेली अज्ञावली असते. ही अज्ञावली घेताना आपणांस कंपनीला संपर्क साधून मग त्यांच्या व्यक्तीकडून त्याचे प्रशिक्षण घेऊन आपल्या ग्रंथालयात घ्यावे लागते. व ह्याची किंमत साधारण लाखांमध्ये असते. त्यामुळे प्रत्येक शालेय तसेच महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये आपणास अशी अज्ञावली दिसत नाही अशी अज्ञावली जास्त करुन मोठ मोठ्या खाजगी संस्था, विद्यापीठे अशा ठिकाणी वापरली जाते.

२. **मुक्तद्वारे अज्ञावली (Open Source Software)**:– ही अज्ञावली जास्त करुन परदेशांमध्ये तयार होते. तयार झाल्यावर इंटरनेटवर मोफत स्वरुपात ठेवली जाते जेणे करुन कोणीही ही अज्ञावली कधीही कोठूनही इंटरनेटच्या सहाय्याने आपल्या संगणकावर घेऊ शकतो. तिचा वापर करु शकतो. (GNU GPL) License च्या सहाय्याने तिच्या

मध्ये हवे तसे बदल करु शकतो. तिचे प्रशिक्षण, कार्यशाळा तसेच वाटप करु शकतो. परंतु हे सर्व करण्यासाठी ग्रंथपाल संगणक शास्त्राचा पदवीधर अथवा त्यात प्राविण्य असला पाहिजे.

३. **मोफत अज्ञावली (Free Ware Software) :–** मोफत अज्ञावली ही एक विशिष्ठ संस्थेद्वारे ना नफा ना तोटा या स्वरुपावर तयार केली जाते. त्यावर संस्थेचे बंधन असते. त्यामध्ये कोणीही बदल अथवा वाटप करु शकत नाही. ही अज्ञावली सुद्धा मोफत इंटरनेटवर संस्थेच्या संकेतस्थळावर ठेवण्यात येते. जेणे करुन कोणीही तिचा वापर करु शकेल. परंतु या अज्ञावलीचे प्रशिक्षण आपणांस त्याच संस्थेकडून घ्यावी लागते.

या सर्व वर्णनांवरुन असे दिसून येते की, खाजगी अज्ञावली घेण्यासाठी शैक्षणिक संस्था, शाळा महाविद्यालय हे आर्थिक दृष्ट्या सक्षम पाहिजेत. जेणे करुन त्यांचा वार्षिक देखभाल खर्च सोसता येईल जर मुक्तद्वार अज्ञावली घेतली तर त्यामध्ये तांत्रिक दृष्ट्या ग्रंथपाल सक्षम असला पाहिजे परंतु ग्रंथपाल संगणक शास्त्र क्षेत्रातून येत नसल्यामुळे त्यांना मुक्तद्वार अज्ञावलीमध्ये काम करणे अवघड जाते त्यामुळे ग्रंथपाल त्याकडे पण वळत नाही. त्यामुळे शेवटचा पर्याय जर ग्रंथपालाने निवडला तर तो आर्थिक ना तांत्रिक दृष्ट्या मागे पडतो मोफत अज्ञावली ही मोफत स्वरुपात असून ती समजण्यास सोपी व स्थानिक भाषेमध्ये उपलब्ध असते. त्यामुळे ग्रंथपाल हिचीच निवड करतो त्यामुळे ग्रंथालयाच्या जगात ग्रंथालय अज्ञावलीचे महत्व वाढत चालले आहे.

**ग्रंथालयातील मोड्युल्स (Modules) :–**

**Administration :–** सर्वात महत्वाचे आणि सुरुवातीचे मोड्यूल्स हे यामध्ये अज्ञावलीचे व्यवस्थापन केले जाते यामध्ये जसे की ग्रंथालयातील पात्रांचे नमुने, ग्रंथ विक्रेते, ग्रंथालय समिती, ग्रंथालय डेटा बॅकप अशी काही महत्वाची आणि एकाच वेळा भरणारी माहितीची या ठिकाणी संचय करुन ठेवली जाते. जेणे करुन ज्या वेळेस आपण संबंधीत माहितीसंबंधी कृती करुन त्यावेळेस ती माहिती आपणास त्वरित त्या त्या ठिकाणी भरता यावी.

**Book Acquistion :–** या मोड्यूल्समध्ये ग्रंथ खरेदीसाठी करण्यात येणारी जी पारंपारिक प्रक्रिया आहे. त्या संबंधी माहिती असते. ग्रंथाची मागणी जेव्हा ग्रंथालयात होते त्यावेळेस ग्रंथपाल त्या मागणीतील ग्रंथासाठी एक मागणी पत्र तयार करुन वरिष्ठांकडून परवानगी घेतो. वरिष्ठांनी त्या मागणीसाठी परवानगी दिल्यानंतर ग्रंथपाल त्याची मागणी ग्रंथविक्रेत्याकडे करतो. त्या नंतर ग्रंथ विक्रेत्याकडून प्राप्त झाल्यानंतर ग्रंथपाल त्याची नोंद दाखलनोंद वहीमध्ये करतो. त्याचे बिल तयार करुन ग्रंथ विक्रेत्याला देतो. ही सर्व प्रक्रिया आधी ग्रंथपाल हाताने करत असत पण आता ग्रंथालयाच्या या मोड्यूल्समुळे हे काम संगणकीकृत झाले व ह्यासाठी अवघे १० मिनिटे लागतात.

**Cataloguing :–** या मोड्यूल्समध्ये ग्रंथ खरेदी केल्यानंतर ग्रंथांची नोंद सरळरीत्या केली जाते कोणतीही खरेदी केल्यानंतर ग्रंथांची नोंद सरळरीत्या केली जाते कोणतीही खरेदी पद्धत न वापरता त्यानंतर ह्यामधून बारकोडिंग (bar coding) केली जाते साठा पडताळणी (stock verification) या सारखी वेळखाऊ व जास्त मनुष्यबळाचे काम ह्या अज्ञावलीमुळे अवघ्या मिनिटांमध्ये होऊ लागली आहे. ग्रंथालयातील काही हरवलेले ग्रंथ, ग्रंथालयातून काढून टाकलेली, तसेच बायंडीग केलेले ग्रंथाची यादी आपणास येथे मिळू शकते.

**Circulation :–** ह्या मोड्यूल्समध्ये ग्रंथालयातील सभासदांची वर्गवारी तसेच नोंद केली जाते. प्रत्येक वाचकांना त्यांचे बारकोडसहित ओळखपत्र अज्ञावलीद्वारे निर्मित केले जातात. ज्या वेळेस वाचक ग्रंथालयात येतो त्यावेळेस तो ते ओळखपत्र ग्रंथपालास देतो ग्रंथपाल त्यास बारकोड मशीन (barcode scanner) द्वारे पडताळणी करुन नवीन ग्रंथ त्यास देतो अथवा घेतो व ही सर्व माहिती अज्ञावली लगेच समोर दाखवते व त्यानंतर गेट पास तयार होतो व वाचकाला ग्रंथ दिला जातो.

# क्षणचित्रे





विभागीय केंद्र, कराड





विभागीय केंद्र, लातूर





विभागीय केंद्र, नागपूर





विभागीय केंद्र, रत्नागिरी






अपंक हक्क विकास मंच





सृजन






वसुंधरा पर्यावरण
संवर्धन अभियान

शिक्षण विकास मंच





पिर्नॅकल क्लब





महाराष्ट्र महिला व्यासपीठ





विभागीय केंद्र, नाशिक



विभागीय केंद्र, नाशिक



नवमहाराष्ट्र युवा अभियान





नवमहाराष्ट्र युवा अभियान

**Serials :–** या मोड्यूल्समध्ये वार्षिक मासिके खरेदी संदर्भात जी प्रक्रिया केली जाते ती ह्या अज्ञावली द्वारे करावी लागते. त्यामुळे वर्षानुवर्षाची माहिती यात कायम राहते. मागच्या वर्षी कोणते मासिक घेतले यावर्षी कोणते हवे आहे. असे आपणांस त्वरित बघता येते अन्यथा मागील वर्षाची नस्ती शोधावी लागते तीपण जीर्ण झालेली असते. त्यामुळे ग्रंथालय अज्ञावलीमधील हे मोड्यूल अत्यंत गरजेचे आणि उपयुक्त असे आहे.

**New Paper Chipping :–** ग्रंथालयात वृत्तपत्र कात्रण करणे हे ग्रंथपालाचे एक महत्वाचे काम असते. ती कात्रणे काढून कोऱ्या कागदावर चिटकवून ती जपून ठेवणे या सर्व प्रक्रियेमध्ये भरपूर वेळ वाया जातो. त्यामुळे या अज्ञावलीत वृत्तपत्र कापून ते स्कॅन (scan) करुन त्याचा असंख्य इतका संचय तयार करता येतो. त्यानंतर कार्यशाळेचा आढावा (worshop report) (article) असे काही महत्वाचे कागदपत्र येथे साठवली जातात. व गरजेनुसार त्यांचा संदर्भासाठी उपयोग केला जातो.

**WEBOPAC/OPAC :–** या मोड्यूल्समुळे ग्रंथालयात उपलब्ध असलेली सर्व ग्रंथ, मासिके, वृत्तपत्र कात्रणे, याचा शोध ग्रंथालयात न जाता घेऊ शकता. यामुळे वाचकांचा वेळ तसेच ग्रंथपालाचा वेळ वाचतो. अज्ञावली नसलेल्या ग्रंथालयात ग्रंथपालास स्वतः कपाटाजवळ जाऊन  ग्रंथ काढून द्यावे लागतात. परंतु या अज्ञावलीतील या मोड्यूल्समुळे वाचक स्वतः ग्रंथ, कपाट नंबर व जागा संगणकावर शोधून ग्रंथ काढून ग्रंथपालाकडे आणून देतात. त्यामुळे वाचकाला ग्रंथालयाची आवड निर्माण होते.

**काही महत्वाच्या सेवा (Special Features)**

१. **बारकोडिंग (Bar Coding) :–** बारकोडिंग तंत्रज्ञानाचा वापर ग्रंथालयातील प्रत्येक ग्रंथावर केला जातो तसेच वाचकांच्या ओळखपत्रावर याचा उपयोग होतो. जेणे करुन ज्यावेळेस वाचक ग्रंथालयात येतो त्यावेळेस ग्रंथपाल बारकोड मशीन ने कार्ड स्कॅन करताच वाचकांची सर्व माहिती संगणकावर येते. त्यानंतर वाचक ग्रंथ पसंत करुन ग्रंथपालास दिल्यास ग्रंथपाल त्यास स्कॅन करतो व वाचकाला ग्रंथ अवघ्या ५ सेंकदात मिळतो बऱ्याचशा ग्रंथलयात बारकोड तयार करण्यासाठी वेगळी मशीन खरेदी करावी लागते. ही मशीन महाग असते परंतु ई–ग्रंथालयात बारकोड सुविधा विनामूल्य आहे.

२. **आय कार्डस (I-Cards) :–** प्रत्येक ग्रंथालयात वाचकांना ओळखपत्र हे दिलेच जाते. परंतु प्रत्येक ग्रंथालयात काड्‌र्स सदस्य नोंदणी झाल्यानंतर दिले जाते. अज्ञावलीमुळे सदस्य नोंदणी झाल्याबरोबर ५ सेंकदात कार्ड तयार होतात व ते त्वरित वाचकांना दिले जातात. त्यामुळे वाचकांचा वेळ वाचून ग्रंथालयाचा प्रिंटिगचा खर्च वाचतो.

३. **दाखल नोंदवही (Accession Register) :–** प्रत्येक ग्रंथालयात नवीन ग्रंथाची नोंद दाखल नोंदवहीमध्ये करावीच लागते. परंतु काही वेळेस ग्रंथालयात ग्रंथ मोठया संख्येत येतात. त्यावेळेस ग्रंथपालास त्याकामासाठी काही शिकाऊ विद्यार्थी नेमून हे काम करुन घ्यावे लागते. परंतु ग्रंथालय अज्ञावली च्या सहाय्याने ग्रंथालयात दाखल होणाऱ्या प्रत्येक ग्रंथाची नोंद सरळ ग्रंथालय अज्ञावलीत केली जाते. त्यानंतर ई–ग्रंथालय कार्यप्रणालीतून दाखलनोंद वही तयार होते व आपले लिहिण्याचे काम वाचते.

४. **सारांश (Conclusion) :–** ग्रंथालय फक्त ग्रंथाचे राहिले नसून ग्रंथपाल फक्त ग्रंथाचे पालक न राहता तो तंत्रज्ञानासोबत वाटचाल करतोय. आज ग्रंथपाल (Information Scientist, Information Officer, Documentalist Cataloguer, Classiffer, Liberary Consultant) अशा पदावर कार्यरत आहे. हे सर्व शक्य झाले ते तंत्रज्ञानामुळे, प्रत्येक जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय सूचना केंद्राची (NIC) शाखा असल्यामुळे कोणत्याही अडचणी असल्यास आपणास त्वरित उत्तर मिळते. सध्या अनेक शासकीय निशासकीय तसेच खाजगी संस्थांच्या ग्रंथालयात याचा यशस्वी वापर होत आहे. ग्रंथालयाचे सर्व कामकाज संगणकाद्वारे करणे शक्य झाले आहे. त्यामुळे वाचक व ग्रंथालय यांच्यातील संबंध सुधारुन ग्रंथालय

कामाची कार्यतत्परता वाढली आहे.

५. **ग्रंथालयाविषयी माहिती:–**

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादी विषयांवरील पुस्तके, चरित्रे व आत्मचरित्रे, धर्मकोष, विश्वकोष, मराठी विश्वकोष, गॅझेटियर ॲटलॉस इअर बुक, डिक्शनरीज' इत्यादी संदर्भ ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध आहेत. तसेच वेळोवेळी संबंधित विषयाला अनुसरुन नवीन पुस्तके ग्रंथालयासाठी घेण्यात येतात. ग्रंथालयामध्ये एकंदरीत २२००० इतका ग्रंथसंग्रह उपलब्ध करण्यात आला. ग्रंथालयामध्ये असलेली पुस्तके आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचताना सहज उपलब्ध व्हावी याकरिता ओपॅक, कॅटलॉग सुरु केला आहे. यामध्ये लेखक, ग्रंथनाम, प्रकाशन, विषय वर्गांक या संज्ञेच्या सहाय्याने वाचताना माहिती मिळविता येते आणि पाहिजे त्या ग्रंथाचा शोध घेता येतो.

**ग्रंथालयाचे नियम :–** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरुन त्यासबोत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहे.

अ) **सर्वसाधारण सभासद**

सर्वसाधारण सभासदाकरिता रु ५०० /– वार्षिक वर्गणी तसेच रूपये ५००/– अनामत रक्कम (१९९६ पासून)

ब) **विद्यार्थी सभासद**

महाविद्यालयीन / उच्चशिक्षण / संशोधक विद्यार्थ्याकरिता वार्षिक रु. ५०/– नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रु. १००/– दि. (१.०८.०८ पासून)

क) यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये संदर्भकरिता काही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्यांकडून रु. ५०/– एका आठवड्याला फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डवर त्यांची वैयक्तिक माहिती भरुन घेण्यात येते.

ड) माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात, त्या करिता ग्रंथालय वेगळी फी आकारत नाही.

इ) **१) संयुक्त संस्था सभासदत्व**

कार्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल एकावेळची वर्गणी रु. ५०,०००/–, ५ वर्षासाठी

**अनामत रक्कम:–** सर्वसाधरणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ व किमंती पुस्तकासाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल.

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके :–** एका वेळी जास्तीत जास्त १० पुस्ते देता येतील.

इ) **२) संस्था सभासदत्व :–**

यासाठी शिक्षण व संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी आय.सी.एस.एस.आर., आय.सी.सी.आर. किंवा आय. सी.एच.आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभासदत्वासाठी :–** प्रवेश फी रु. १०००/– ना परतावा

**वार्षिक वर्गणी :–** रु. ५,०००/–

**दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद :–** एकावेळी ५ वर्षाकरिता वर्गणी रु. २०,०००/–

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके :–** एका वेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील.

इ–१ व इ–२ येथील सभासदत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्या वतीने पुस्तके घेण्यास/परत करण्यास नामनिर्देशित करु शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे याची जबाबदारी संस्था प्रमुखांची असेल.

वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहिल.

३. **सर्वसाधारण सभासदः–** सभासदांना एकावेळी एक पुस्तक/ग्रंथ देण्यात येईल ते आठ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अमानत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमतीएवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल.

४. महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी / संशोधक यांना ग्रंथ, संदर्भ ग्रंथ नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही.

❑❑❑

## आशा–निराशा

तशी माझी प्रवृत्ती व प्रकृती आशावादी आहे. स्वभावाने मी संकटकाळी दबून जाणारा नाही. कठीण काळ येतो, तेव्हा सहन करीत वाट पाहावी लागते आणि ते करण्यासाठी एक प्रकारचा आत्मविश्वास व त्यावर आधारलेला आशावादी दृष्टिकोन असावा लागतो. पण याचा अर्थ असा नाही, की दैनंदिन जीवनात आशा–निराशेचा पाठशिवणीचा खेळ मी अनुभवलेला नाही. मला वाटते, हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात येणारा नित्य अनुभव आहे. प्रासंगिक कारणासाठी का होईना, पण दैनंदिन जीवनात कधी आशावादी, तर कधी निराश व्हावे लागते. परंतु ते किंचित काळ टिकणारे प्रसंग असतात.

*– यशवंतराव चव्हाण*

# विभागीय केंद्र, कोकण
# कार्यवृत्त

## फेब्रुवारी

● 'सृजन'

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. १० फेब्रुवारी २०१४ रोजी दापोली येथील वराडकर बेलोसे महाविद्यालयात 'सृजन' हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये इ. ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोलीचे प्राचार्य मा. डॉ. सुरेश निंबाळकर हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. यावेळी विभागीय समितीच्या सदस्या मा. सौ. जानकी बेलोसे, रत्नागिरी जिल्हा समिती अध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे, जिल्हा समिती सदस्य मा. श्री. प्रकाश उर्फ बापू काणे, श्री. विश्वंभर कमळकर तसेच कार्यक्रमामध्ये सहभागी शाळांचे शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

'सृजन' म्हणजे निर्मिती. निसर्ग सतत निर्मिती करीत असतो. निसर्गाचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. यापुढे निसर्गात एखादा जरी कीटक उडताना दिसला तरी तुम्हांला आजच्या कार्यक्रमाची आठवण होईल. हा कार्यक्रम तुमच्या बालमनाला चालना देणारा आहे, असे विभागीय समिती सदस्या मा. सौ. जानकी बेलोसे यांनी प्रस्ताविकामध्ये सांगितले.

जिल्हा समिती सदस्य मा. श्री. बापू काणे यांनी, 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे वतीने नेहमीच कार्यक्रम होत असतात. नेहमीच्या कार्यक्रमांपेक्षा आजचा कार्यक्रम वेगळा आहे. आपल्या प्रत्येक कृतीमध्ये सृजनशीलता पाहिजे हे आजचा कार्यक्रम पाहिल्यानंतर निश्चितच समजेल' असे आपल्या मनोगतात सांगितले.

'जे निसर्गात उपलब्ध आहे ते जपण्याचे काम केले पाहिजे. आपण त्याचे निरीक्षण केले पाहिजे, या कार्यक्रमातून आपल्या अभिरुचीला वाव मिळणार आहे. आजच्या कार्यक्रमातील तुम्हाला जे आवडेल ते तुम्ही लिहून काढा. तुम्हाला कसली आवड आहे ते लिहा. म्हणजे आम्हाला तसे पुढे नियोजन करता येईल. प्रत्येक शाळेत आपण निसर्ग मंडळ स्थापन करुया, असे रत्नागिरी जिल्हा समिती अध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. सुरेश निंबाळकर यांनी आपण निसर्गाशी समरस झालो तरच आपली चांगली निर्मिती होईल. आजच्या 'सृजन' या कार्यक्रमाचा उद्देश हा आहे असे विद्यार्थ्यांना सांगितले.

जिल्हा समिती सदस्य मा. श्री. विश्वंभर कमळकर यांनी कार्यक्रम सादरकर्ते मा. श्री. प्रशांत निजसुरे व सौ. जिल्पा निजसुरे यांची ओळख करुन दिली.

सौ. जिल्पा निजसुरे यांनी कार्यक्रमाची माहिती देताना सांगितले की, मुलांच्या मनातील दिशेला चालना देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. एखादया गोष्टीत मन रमवले तर त्याला चालना मिळते. निसर्ग हा मुख्य स्त्रोत आहे. ऋतूप्रमाणे वेगवेगळे बदल त्यात होत असतात. मात्र आपण त्याच्याकडे कधी डोळे भरून पहातच नाही. आज होणारी पर्यावरणाची हानी थांबवली पाहिजे. यासाठी प्रत्येकाने निसर्ग संवर्धनासाठी खारीचा वाटा उचलला पाहिजे.

यानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. प्रथम विद्यार्थ्यांना निसर्गातील विविध वृक्ष, फुलं, पक्षी यांचा स्लाईड शो दाखविण्यात आला. फोटोमार्फत वृक्षांची, फुलांची व पक्षांची ओळख करुन देण्यात आली. निसर्गातील विविध गोष्टींचे महत्व सांगितले. प्रत्येक वृक्ष, फुलांच्या रचनेत व रंगात किती

वेगळेपण आहे. तसेच कीटक, पक्षी यांचे काम कसे चालते ? ते काय करतात ? याची माहिती दिली. आपल्याला निसर्गाबाबत आणखी माहिती हवी असल्यास आपण कोणत्या वेबसाइटवर माहिती मिळवू शकतो व पर्यावरणासाठी कोणते दिवस साजरे करु शकतो हेही सांगितले.

विद्यार्थ्यांना निसर्गाबाबत किती माहिती आहे हे पाहण्यासाठी त्यांच्याकडून एक माहितीपत्रक भरुन घेण्यात आले. तसेच विविध झाडांची नावं असलेले शाब्दीक कोडं सोडविण्यासाठी व एक निसर्ग चित्र रंगविण्यासाठी देण्यात आले.

कार्यक्रमाचे शेवटी सहभागी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. असे कार्यक्रम आम्ही टी. व्ही. वर पहात असतो. आज प्रत्यक्ष पहायला मिळाल्याबद्दल आम्ही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे आभारी आहोत. हा कार्यक्रम आम्हांला खूप आवडला. या कार्यक्रमामुळे आमची निसर्गाबाबतची ओढ आणखी वाढली आहे. असेच कार्यक्रम पुनः पुनः आयोजित करावेत, असे त्यांनी सांगितले.

आपण आयुष्य जगत असताना निसर्गाशी नाते कसे जपायचे ? हे या कार्यक्रमाच्या निमित्ताने समजले. यासाठी आम्ही यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नेहमीच ऋणी राहू, असे उपस्थित शिक्षक श्री. काणेसर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे शेवटी श्री. विश्वंभर कमळकर यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. सौ. थोरात मॅडम यांनी केले.

## मार्च

- **जागतिक महिलादिन कार्यक्रम**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरी व फिनोलेक्स इंड. लि. गोळप, रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. ७ मार्च २०१४ ते १० मार्च २०१४ या कालावधीत बचतगटातील महिलांनी व इतर उद्योगिनी महिलांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री स्टॉल्स आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन अभिनेते मा. श्री. मनोज कोल्हटकर यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी सह्याद्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा मा. श्रीम. अनुराधाताई निकम, विभागीय समितीचे उपाध्याक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हाध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे, माजी जिल्हाध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के, मौजमा पेठकर तसेच जिल्हा समिती सदस्य ॲड. वासुदेव तुळसणकर, मा. श्री. प्रकाश काणे, श्री. अविनाश काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

दि. ७ मार्च ते १० मार्च या चार दिवसांमध्ये महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यामध्ये ॲड. संध्या सुखटणकर यांचे महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. तर 'दैनंदिन स्वास्थासाठी उपयुक्त योगिक क्रिया' याविषयावर माजी जिल्हाध्यक्षा मा. सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. 'महिलांचे सुरक्षिततेविषयी माझी अपेक्षा' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. तसेच पाककृती व रांगोळी स्पर्धा ही घेण्यात आली. महिलांसाठी विविध फनी गेम्स ठेवण्यात आले. दि. १० मार्च रोजी एम.डी.नाईक इंग्लिश मिडीयम स्कुलच्या मुलांनी 'लेक वाचवा' हे पथनाट्य सादर केले. कर्ला येथील महिलांनी महाराष्ट्रातील पारंपारिक सण उत्सवांवर आधारीत सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

कार्यक्रमाचा समारोप दि. १० मार्च २०१४ रोजी करण्यात आला. यावेळी समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये व फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी मा. श्री. अशोक तातुगडे यांचे हस्ते विजयी स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली. या चार दिवसात संपन्न झालेल्या कार्यक्रमाला बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

- **स्व. यशवंतराव चव्हाण जयंती**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचेवतीने

स्व. यशवंतराव चव्हाण यांची १०१ वी जयंती प्रतिष्ठानचे कार्यालयात चव्हाण साहेबांच्या प्रतिमेला माजी नगराध्यक्ष मा. श्री. रविंद्र सुर्वे यांचे हस्ते पुष्पहार घालून साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे, जिल्हा समिती सदस्य व कर्मचारी उपस्थित होते.

- **नारी महोत्सव**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरी व सह्याद्री कृषि परिवार सावर्डे यांचे संयुक्त विद्यमाने दि. २७ मार्च ते ३० मार्च २०१४ या कालावधीत नारी महोत्सव संपन्न झाला.

जिल्हा परिषद अध्यक्षा मा. सौ. मनिषा जाधव, चिपळूण पंचायत समिती सभापती मा. सौ दिप्ती माटे यांचे हस्ते तसेच चिपळून नगर परिषदेच्या नगर सेविका यांचे उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी सह्याद्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा मा. श्रीम. अनुराधाताई निकम, जिल्हाध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे, जिल्हा समिती सदस्या मा. सौ. युगंधरा राजेशिर्के आदी मान्यवर उपस्थित होते. महिलांना विविध विषयांवर उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या महोत्सवाच्या चार दिवसांच्या कालावधीत रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, पाककला स्पर्धा, पुष्परचना, मेहंदी काढणे अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी विधवा, परित्यक्ता महिला ज्यांनी कठीण प्रसंगातही स्वतः कष्ट करुन समर्थपणे मुलांचे शिक्षण करुन समाजापुढे आदर्श घालून स्त्रीसक्षमीकरणाचा आदर्श तयार केला अशा महिलांचा सत्कार करण्यात आला. सुप्रसिद्ध अंध मुलगी कु. मंजूश्री सोमण हीच्या आईचे अनुभव व मंजूश्री सोमण हीचा छोटासा कार्यक्रम सादर करण्यात आला. सदरचा कार्यक्रम हा महिलांच्या दृष्टीने खूपच प्रेरणादायी ठरला. या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाबाबत महिलांनी कौतुक करुन कृतज्ञता व्यक्त केली.

शेवटच्या दिवशी महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रमात दशावतारतील विविध प्रकार सादर करुन शिमग्यातील पालखी नाचवण्याचे विविध प्रकार दाखवून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या महोत्सवामध्ये विविध प्रकारचे ३२ स्टॉल्स् होते. या स्टॉल्स्नां ग्राहकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.

## एप्रिल

- **वसुंधरा दिन कार्यक्रम**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने दि. ३० एप्रिल २०१४ रोजी 'वसुंधरा दिनाचे' औचित्य साधून प्रतिष्ठानचे मारुती मंदिर येथील कार्यालयात चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचेवेळी 'पश्चिम घाटाचे संरक्षण व संवर्धन' या विषयावरील सौ. आरती कुलकर्णी यांनी तयार केलेली एक तासाची चित्रफित दाखवून लांजा महाविद्यालयाचे प्रा. मा. डॉ. विकांत बेर्डे यांनी चर्चा घडवून आणली.

यावेळी कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे, जिल्हा समिती सदस्य मा. डॉ. दिलीप नागवेकर, श्री. प्रकाश काणे, डॉ. अनिल जोशी, श्री. सतिश चिकणे, श्री. रविंद्र सुर्वे, श्री. अविनाश काळे, फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी मा. श्री अशोक तातुगडे, नवनिर्माण कॉलेजचे संस्थापक मा. श्री. अभिजित हेगशेट्ये, माहेर संस्थेचे श्री. सुनिल कांबळे, प्रा. उल्हास सप्रे, रत्नदुर्ग माऊंटचे श्री. संजीव लिमये, श्री. जयवंतभाई विचारे, श्री. वासुदेव वाघे, सौ. स्वाती सोनार, मधुरांगनच्या सौ. यशश्री पुरोहित यांनी या चर्चासत्रामध्ये सहभाग घेतला.

पर्यावरणाकडे केलेले दुर्लक्ष व त्याकडे पहाण्याची उदासिनता यामुळे निसर्गाची होणारी हानी याचा विचार करता पृथ्वीवरील तापमान वाढण्याच्या दृष्टीने भयानक परिणाम सर्व प्राणीमात्रांना भोगावे लागत आहेत. यावर विचार करुन जंगलतोड ज्या प्रमाणात झाली आहे त्या मानाने वृक्ष लागवड झालेली नाही. त्यामुळे जंगलातील पशुपक्षांच्या अनेक प्रजाती नष्ट

व्हायच्या मार्गावर आहेत. प्रत्येक प्राणी मात्राच्या संरक्षणाच्या दृष्टीने आपण सर्व संस्थांनी मिळून प्रयत्न करुया व त्यादृष्टीने कार्यक्रम आखणी करुन विविध ठिकाणी पर्यावरण विषयक कार्यक्रम यशस्वी करुया असे मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी विचार व्यक्त केले.

पुज्य नानाधर्माधिकारी यांच्या प्रबोधनाच्या बैठका ठिकठिकाणी होत असतात. या बैठकांना लाखो अनुयायी असतात. वृक्ष लागवड करण्याचे दृष्टीने यांना सहभागी करुन घेतले तर वृक्षलागवडीसाठी मोठा लाभ होईल असे मा. उपाध्यक्ष डॉ. कद्रेकर यांनी सांगितले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे जनसंपर्क अधिकारी मा. श्री. अशोक तातुगडे यांनी आपले विचार व्यक्त करताना, फिनोलेक्स इंडस्ट्रीज दरवर्षी मोठया प्रमाणावर रोपे खरेदी करुन ती शाळा, कॉलेज, अनेक संस्थांना लागवडीसाठी देते व पर्यावरणाचे दृष्टीने कार्यक्रम राबवित आहे. तसेच समाजभान मध्ये अनेक संस्थांची लोक आहेत. प्रत्येकजण आपापल्या संस्थेत कार्यरत आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व समाजभान ग्रुप यापुढेही कार्यक्रमासाठी एकत्र येवून अनेक कार्यक्रम यशस्वीपणे राबवू शकतो असा विश्वास व्यक्त केला.

## जून

- **'पर्यावरण दिन'**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरी, समाजभान ग्रुप – रत्नागिरी व ट्रीज् फॉर द फ्युचर इंडिया – लांजा या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ जून 'जागतिक पर्यावरण दिन' रत्नागिरी येथे विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी भाट्ये समुद्र किनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली तसेच जनजागृतीपर पथनाट्यांतून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

शहरातील कचराकुंडया, नालेसफाई, गटारांची दुरावस्था तसेच रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या झाडांवर लावण्यात आलेले फलक यामुळे एक प्रकारे पर्यावरणाचा ऱ्हास होत असतो. यावेळी या संस्थांनी पर्यावरणाचा होणारा ऱ्हास रोखण्यासाठी जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी. यांना निवेदन दिले.

पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण जागृती बाबतचे पथनाट्य लांजा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केले. रत्नागिरी बसस्थानक, रेल्वेस्टेशन व भाट्ये बीच या ठिकाणी दु. ३.०० वा. पासून हे पथनाट्य सादर करण्यात आले. शहरामध्ये विविध ठिकाणी पर्यावरण जागृतीचे फलक प्रदर्शित केले होते.

पथनाट्यातील सहभागी मुलांचा व डॉ. मराठे यांचा सत्कार यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, भाट्ये गावच्या सरपंच मा. सौ. श्रद्धा सुर्वे, उपसरपंच श्री. जावेद होडेकर यांचे हस्ते करण्यात आला.

यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई जिल्हा समिती रत्नागिरीच्या अध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे, फिनोलेक्स कंपनीचे जनसंपर्क अधिकारी मा. श्री. अशोक तातुगडे, समाजभान गुपचे सदस्य प्रा. उल्हास सप्रे, प्रा. केतन चौधरी, श्री. संजीव लिमये, श्री. संतोष पुरोहित, श्री. वासुदेव वाघे, श्री. दत्तप्रसाद कुळकर्णी, लांजा कॉलेजचे प्रा. बेर्डे, सौ. यशश्री पुरोहित आदी मान्यवर उपस्थित होते.

## जुलै

- **कृषी दिन कार्यक्रम अहवाल**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने १ जुलै कृषी दिन कार्यक्रम चिपळूण येथील ब्राम्हण सहाय्यक संघाच्या सभागृहात संपन्न झाला. यावेळी विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्याक्ष मा. डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हाध्यक्षा मा. श्रीम. प्राची शिंदे, कृषीभूषण मा. श्री. चंद्रशेखर भडसावळे, उपविभागीय कृषीअधिकारी मा. अे.जी.शहा, जिल्हासमिती सदस्य मा. श्री. बापू काणे, मा. श्री.

सुचयअण्णा रेडीज, मा. सौ. युंगधरा राजेशिर्के, मा. डॉ. अनिल जोशी, मा. श्री, सिद्धेश लाड, मा. श्री. संदीप लवेकर, मा. श्री. कृ. आ. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

स्व. वसंतराव नाईक व स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. जिल्हा समिती सदस्य श्री. सुचयअण्णा रेडीज यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

मा. श्री. सुचयअण्णा रेडीज यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. यावेळी त्यांनी प्रतिष्ठानचे वतीने होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली. तसेच आज होणाऱ्या व्याख्यानाचा लाभ शेतकऱ्यांनी शेतीसाठी करुन आपली प्रगती करावी असे उपस्थितांना सांगितले.

मा. जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे यांनी मनोगतामध्ये सांगितले की, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राची स्थापना होवून ९ वर्ष झालीत आम्ही तळागाळातील लोकांपर्यंत पाहोचून कार्यक्रम करीत असतो. आजच्या कृषी दिनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन व्हावे याकरिता कृषीतज्ञ मा. श्री चंद्रशेखर भडसावळे तसेच उपविभागीय अधिकारी मा. श्री. अे.जी.शहा यांना आमंत्रित करण्यात आल्याचे सांगितले.

यावेळी कृषीतज्ञ मा. श्री. चंद्रशेखर भडसावळे व उपविभागीय अधिकारी मा. श्री. अे.पी.शहा यांचा प्रतिष्ठानचे वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन्न विभागीय अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

मा. श्री. चंद्रशेखर भडसावळे यांनी उपस्थितांना स्लाईड शोच्या माध्यमातून क्रांतीकारी भातलागवड व कृषीपर्यटन या विषयावर मार्गदर्शन केले. कृषी पर्यटन म्हणजे काय व त्याचे ध्येय कोणते त्यांनी समजून सांगितले. शेतकऱ्यांच्या अंगी अनोळखी पाहुण्यांची सेवा करण्याची वृत्ती असेल तरच कृषी पर्यटनाचा हेतू साध्य होईल असेही सांगितले. कृषी पर्यटनाची व्याख्या करताना आपल्या शेतावर आयोजित केलेले आनंददायी शिक्षण व मौज म्हणजे कृषी पर्यटन. अन्न निर्मिती करण्यासाठी शेतावर कुणीतरी येवून प्रोत्साहन देणे, मित्र मिळवणे हे कृषी पर्यटनाचे मुख्य ध्येय आहे. भविष्यात अन्नाचा तुटवडा निर्माण होणार आहे. अन्नाला सोन्याचा भाव मिळणार आहे म्हणून शेतकऱ्याने अन्न निर्मिताचे काम थांबवता कामा नये असेही सांगितले.

क्रांतीकारी भात लागवड याविषयी मार्गदर्शन करताना त्यांनी पारंपारिक चिखलणी व लावणी न करता भातशेती करण्याचे एस.आर.टी. या बहुगुणी तंत्राची माहिती दिली.

एस. आर. टी. म्हणजे सगुणा राईस तंत्र हे भातशेतीशी संबंधीत उखळणी, चिखलणी व लावणी न करता कायमस्वरूपी गादीवाफ्यावर टोकणणी करुन उत्तम भात पिकवण्याचे नवे तंत्र असल्याचे सांगितले या तंत्राचे फायदे कोणते व वेगळेपण काय आहे हेही विषद केले.

उपविभागीय अधिकारी मा. श्री. अे. जी. शहा यांनी उपस्थित शेतकऱ्यांना त्याच्यांसाठी असणाऱ्या शासकीय योजना या विषयावर मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी एकत्रितपणे शेतीचा कायापालट केला पाहिजे यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे याला मिशन असे म्हटले जाते. शेतीचे उत्पन्न वाढावे यासाठी सरकारने शेतकऱ्यांचे मदतीसाठी काही योजना राबविल्या आहेत. कोणतीही योजना राबविताना प्रथम उद्देश ठरविला पाहिजे. गरजू शेतकऱ्यांना लाभ मिळणे महत्वाचे आहे.

बचतगटासाठी असणाऱ्या आयआरडीए च्या योजना, फुलशेती व फळबाग करण्यासाठी असणाऱ्या योजना तसेच एम.आय.डी.एच. मध्ये नारळ बोर्डाच्या असणाऱ्या सर्व योजनांची माहिती त्यांनी दिली.

अध्यक्षीय भाषणामध्ये विभागीय समितीचे अध्यक्ष मा. श्री. राजाभाऊ लिमये यांनी सांगितले की श्री. शहा साहेबांनी आपल्या योजना तुमच्या पर्यंत पोहचवल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी केलीत तर खऱ्या अर्थाने वसंतराव नाईक यांची जयंती साजरी झाल्याचे व विचाराला कृतीची जोड दिलीत असे

म्हणता येईल.

उपस्थित शेतकऱ्यांना मान्यवरांचे हस्ते आवळ्याची रोपे वाटप करण्यात आली. शेवटी जिल्हा समिती सदस्य श्री. संदीप लवेकर यांनी उपस्थित मान्यवरांचे व शेतकऱ्यांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

## ऑगस्ट

- **वक्तृत्व स्पर्धा**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. १ ऑगस्ट २०१४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त पूर्ण प्राथमिक शाळा गोळप सडा, जिल्हा परिषद, रत्नागिरी येथे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. इ. १ ते ४ थी च्या सुमारे २५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. यावेळी जिल्हाध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे, जिल्हा समिती सदस्य श्री. अविनाश काळे व शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

- **रक्षाबंधन कार्यक्रम**

विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने गतवर्षी प्रमाणे यावर्षीही दि. १२ ऑगस्ट २०१४ रोजी क्षत्रिय मराठा मंडळाचे मजगाव रोड येथील सभागृहात रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. महिलांनी महिलांना राख्या बांधून एकमेकींबद्दलचा स्नेह, विश्वासार्हता जपणे या भावनेने एकमेकींना राख्या बांधल्या. प्रसंगाच्या वेळी एकमेकींच्या मदतीसाठी धावून जाणे, एकजूट दाखविणे हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे.

आजच्या सामाजिक परिस्थीतीमध्ये महिलांनीच एकमेकींच्या मदतीला धावणे आवश्यक आहे म्हणूनच प्रतिष्ठानचे वतीने महिलांनीच महिलांना राख्या बांधण्याचा कार्यक्रम घेतला जातो. यावेळी बचतगटातील व इतर महिला उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाला जिल्हा समिती अध्यक्षा श्रीम. प्राची शिंदे, गुरुकुल प्रतिष्ठानच्या पल्लवी राणे, सौ. स्वाती सोनार, सौ. शकुंतला झोरे, सौ. प्रभावती मगदूम, सौ. मनिषा वानखेडे, सौ. प्रतिक्षा सरगर वगैरे महिला उपस्थित होत्या.

❑❑❑

### स्त्री व समाज

जेव्हा स्त्रीत बदल होत जातो, तेव्हा समाजातही बदल होणं अटळ असतं. समाजबदलाची प्रक्रिया ही स्त्रीच्या बदलात प्रतिबिंबित होत असते. समाजबदलाची ती इंडेक्स असते. कोणत्याही समाजात बदल होत आहे की नाही, होत असेल, तो किती, कसा होतो आहे, हे जर अभ्यासायचं असेल, तर स्त्रीमधील बदल लक्षात घेतला, तरी कळू शकतं. म्हणून म्हणावंसं वाटतं, भारतीय समाजात निश्चितपणे बदल घडू पाहताहेत, कारण भारतीय स्त्री बदलते आहे. हुंडाविरोधी, बलात्काराविरोधी आंदोलन करायला घरातील स्त्री आता रस्त्यावर येत आहे. समाज बदल घडवायला, समाजातील दीनदुबळ्यांना प्रेम द्यायला ती हिरिरीनं पुढं सरसावली आहे. स्त्रीनं पुरुषाला संसारात सुखदुःखांत साथ दिली. आता पुरुषानं तिलाही साथ देण्यासाठी आपणहून पुढं यायला हवं.

*— यशवंतराव चव्हाण*

# विभागीय केंद्र, औरंगाबाद
# कार्यवृत्त

## यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळा – २०१४

दरवर्षी नवमहाराष्ट्र युवा अभियान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या वतीने राज्यस्तरीय सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कार दिले जातात. सामाजिक व क्रीडा विभागात एक युवक व एक युवती यांना विशेष कामगिरीसाठी हा पुरस्कार दिला जातो. 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार' (युवक व युवती) व 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार' (युवक व युवती) तसेच क्रीडा क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल एक विशेष क्रीडा पुरस्कार असे एकूण पाच पुरस्कार दिले जातात. महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे, हे या क्रीडा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व भरीव कार्य करणाऱ्या युवक–युवतींना हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्काराचे हे पंधरावे वर्ष असून यापूर्वी पल्लवी रेणके, लतिका माने, वीरधवल खाडे, कविता राऊत, कृष्णा पाटील, सागर बडवे यांना हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. क्रीडा व सामाजिक क्षेत्रात भरीव कामगिरी करुन इतर युवांसमोर एक आदर्श ठेवणाऱ्या युवा वर्गाच्या कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना सन्मानित करण्याचा यामागे उद्देश आहे.

२०१४ सालचा यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार आंतरराष्ट्रीय पॅराबॅडमिंटन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल आंतरराष्ट्रीय अपंग बॅडमिंटनपटू मार्क धरमाये यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप ५१ हजार रु. रोख, स्मृतीचिन्ह व मानपत्र  असे या पुरसकाराचे स्वरुप आहे. यावर्षीचा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल अमोल बराटे (कुस्ती, हिंदकेसरी) व तेजस्विनी मुळे (नेमबाजी – रायफल शुटींग) यांना तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. प्रियदर्श विजय तुरे (आरोग्य सेवक, मेळघाट) व श्रद्धा शृंगारपुरे आदिवासी हक्क व विकास यांना यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक व क्रीडा पुरस्कारांचे स्वरुप प्रत्येकी २१ हजार रु. रोख, स्मृतीचिन्ह व मानपत्र असे आहे.

सदर पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २ मार्च २०१४ रोजी सायं. ४.०० वा. महागामी सभागृह, एम.जी.एम. परिसर येथे नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ, प्रसिद्ध अभिनेता मा. किशोर कदम, फॅन्ड्री या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक मा. नागराज मंजुळे, महानंदा दूध संघाच्या अध्यक्षा मा. वैशाली नागवडे, मा. मधुकरराव मुळे, मा. भालचंद्र कांगो, मा. अजित दळवी, मा. नीलेश राऊत, मा. अपर्णा कक्कड, मा. रेखा शेळके, मा. विजय कान्हेकर, मा. सुहास तेंडूलकर मा. दिनेश शिंदे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

## अभिनेता किशोर कदम उर्फ सौमित्र व फॅन्ड्री सिनेमाचे दिग्दर्शक नागराज मंजुळे यांची प्रकट मुलाखत

पुरस्कार वितरणानंतर अभिनेता किशोर कदम व दिग्दर्शक नागराज मंजुळे यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ व प्रसिद्ध नाट्यलेखक मा. अजित दळवी यांनी सदर मुलाखत घेतली. यावेळी बोलताना ''उपेक्षितांसाठी शिक्षणाची अवस्था केविलवाणी झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघर्ष करा व संघटित व्हा, असे म्हटले आहे. मात्र दलित, भटक्यांच्या जीवनात आधी संघर्ष असतो. जमले तर चारदोन जण संघटित होतात आणि जमलेच तर शिक्षण घेतात'', अशी खंत फॅन्ड्री सिनेमाचे दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी व्यक्त केली.

माझे बालपण कोळीवाड्यात गेले. खारदांड्यातील जीवन, चेतना महाविद्यालयातील जीवन आणि सत्यदेव दुबे यांच्या सहवास आल्यानंतरचे जीवन असे माझ्या जीवनाचे तीन टप्पे असल्याचे किशोर कदम उर्फ सौमित्र यांनी सांगितले.

मुंबईच्या कोळीवाड्यात, समुद्राच्या गाजेने भरलेल्या परिसरात राहिल्याने माझ्या जीवनात बेधडकपणा निर्माण केला आहे. मी रंगरुपाने चारचौघात उठून दिसण्यासारखा नसलयाने सतत मनात बोच रहायची.

यावेळी महानंदा दूध संघाच्या अध्यक्षा मा. वैशाली नागवडे, मा. मधुकरराव मुळे, मा. भालचंद्र कांगो, मा. अजित दळवी, मा. नीलेश राऊत्त, मा. अपर्णा कक्कड, मा. रेखा शेळके, मा. विजय कान्हेकर, मा. सुहास तेंडूलकर, मा. दिनेश शिंदे, मा. श्रीधर पाटील, उमाकांत जगदाळे, नीलेश पुराडकर, सुबोध जाधव, अभिजित खानविलकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

## 'यशवंतराव चव्हाण.... बखर एका वादळाची' चित्रपटाचे विशेष प्रदर्शन

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, व्यासंगी नेते, अभ्यासू व्यक्तिमत्व, दूरदृष्टी असलेलं कार्यकुशल नेतृत्व अशा अनेक बिरुदावल्या लाभलेले व्यक्तिमत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण. वैयक्तिक आयुष्यासोबतच सामाजिक आणि राजकीय जीवनातही अतिशय आव्हानात्मक परिस्थितीवर त्यांनी यशस्वीपणे मात केली. यशवंतरावांच्या जीवनावर आधारित 'यशवंतराव चव्हाण... बखर एका वादळाची' हा प्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेला व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांची निर्मिती असलेला चित्रपट नुकताच महाराष्ट्रभर प्रदर्शित झाला. या चित्रपटाचा विशेष 'शो' चे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्या वतीने शुक्रवार, दि. २१ मार्च २०१४ रोजी, प्रोझोन मॉल येथील सत्यम सिनेमागृहात दु. २.३० वा. आयोजित करण्यात आले होते. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक जब्बार पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवाय यावेळी रसिकांनी जब्बार पटेल, यशवंतरावांची भूमिका साकारलेले अभिनेते अशोक लोखंडे, अभिनेत्री वैशाली दाभाडे यांच्यासमवेत मुक्तसंवादही साधला.

सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्रे गावात एका गरीब कुटुंबात जन्माला आलेला मुलगा पुढे महाराष्ट्राबरोबर देशाचेही भविष्य घडवतो हा इतिहास भूतकाळ सांगणारा असला, तरी तो वर्तमानाशी निगडित आहे; महान व्यक्ती या काळानुसार लोप पावत नाहीत, तर त्या स्वतः एक विचार असतात. त्यांचे जीवनकार्य प्रेरणादायी व आदर्शवत असते. उपपंतप्रधान, संरक्षण मंत्री, मुख्यमंत्री अशी विविध मानाची व जबाबदारीची पदे भूषविलेले लोकाभिमुख नेते यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाचा रोमहर्षक प्रवास सर्वदूर पोहचविण्याचा प्रयत्न या चित्रपटाद्वारे करण्यात आला आहे.

चित्रपट सर्वांना मोफत दाखविण्यात आला. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, सचिव मुकुंद भोगले, कोषाध्यक्ष सचिन मुळे, राज्य संघटक नीलेश राऊत्त, अपर्णा कक्कड, विजय कान्हेकर, सुहास तेंडूलकर, सुबोध जाधव, रेखा शेळके, मंगेश निरंतर, उमेश राऊत्त, दिपक जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## चित्रपट चावडी 'पथेर पंचाली'

सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रे यांचा १९५५ साली प्रदर्शित झालेला 'पथेर पंचाली' हा चित्रपट दाखविण्यात आला. हा चित्रपट बिभूतिभूषण बंडोपाध्याय यांच्या 'पथेर पंचाली' या बंगाली कादंबरीवर आधारित आहे. या चित्रपटाची निर्मिती पश्चिम बंगाल सरकारने केली आहे.

निश्चिंतदीपूर गावात राहणारा हरीहर रॉय नावाचा पुजारी शहरात जाऊन्न कवी व नाटककार बनण्याचे स्वप्न बघतो. ह्या त्याच्या जीवनप्रवासावर हा चित्रपट आधारित आहे. या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. २ मे हा सत्यजित रे यांचा जन्मदिवस असतो. याचे औचित्य साधून सदरील चित्रपट दाखविण्यात आला. यावेळी सुबोध जाधव, मंगेश निरंतर, उमेश राऊत्त, दिपक जाधव, राजेंद्र वाळके, बाबू स्वामी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## 'द टर्मिनल'

हॉलिवूडचे सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक स्टिव्हन स्पीलबर्ग यांचा २००४ साली प्रदर्शित झालेला 'द टर्मिनल' हा चित्रपट दाखविण्यात आला. या चित्रपटाची कथा ही मेहरान करीमी नसेरी यांच्या जीवनातील सत्य घटनेशी प्रेरीत आहे. टॉम हँक्स आणि कॅथेरीन झीटा जोन्स यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत.

पूर्व युरोपातील क्राकोझेनिया या देशात राहणारा विक्टर नैव्होंक्सी हा अमेरीकेतील जॉन एफ केनेडी विमानतळावर येतो व त्याला कळते की त्याच्या देशात गृहयुद्ध सुरु झाले असून त्याची नागरीकता संपुष्टात आली आहे. त्यानंतर ९ महिने तो विमानतळावरच घालवतो यादरम्यान त्याच्यासोबत घडणाऱ्या प्रसंगावर व त्याच्या अमेरीकेत येण्याच्या उद्देशावर हा चित्रपट आधारित आहे. यावेळी सुबोध जाधव, उमेश राऊत, राजेंद्र वाळके आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### 'ब्लड डायमंड'

सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक एडवर्ड झ्वीक यांचा २००६ साली प्रदर्शित झालेला 'ब्लड डायमंड' हा चित्रपट दाखविण्यात आला. या चित्रपटाला अॅकॅडमी अवार्डचे पाच नॉमिनेशन मिळाले आहेत.

या चित्रपटाची कथा आफ्रिकेतील युद्धग्रस्त क्षेत्रातील खाणींमधुन उत्खनन केलेले हिरे कशा प्रकारे जगभर प्रवास करतात व त्यावरील अर्थकारण यावर हा चित्रपट आधारित आहे. अभिनेता लिओनार्दो दि कॅप्रिओ याने या चित्रपटात प्रमुख भूमिका केली आहे. या चित्रपटाला रसिकांनी मोठया संख्येने हजेरी लावली. यावेळी मंगेश निरंतर, दिपक जाधव, उमेश राऊत, राजेंद्र वाळके, रुपेश मोरे, बाबू स्वामी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## 'युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली – २००४'

भारतीय स्वातंत्र्यासाठी असंख्य समाजसेवकांनी लढा उभारला तर अनेक हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांना वंदन करण्यासाठी, राष्ट्रभक्तीची चेतना मनामनात जागविण्यासाठी मंगळवार, दि. १४ ऑगस्ट २०१४ रोजी सायं. ठिक ७ वा. विभागीय केंद्र, औरंगाबादच्या वतीने दरवर्षीप्रमाणे युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्रतिष्ठाच्या कार्याध्यक्ष मा. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी आपण राज्यातील मुंबई, पुणे, नाशिक, बुलढाणा, नागपूर, अहमदनगर, सातारा, जालना, यवतमाळ, गडचिरोली, अकोला, रत्नागिरी यासह ४३ ठिकाणी या रॅलीचे आयोजन करण्यात आले.

औरंगाबाद येथील आयोजित रॅलीत विविध महाविद्यालयांच्या तरुण व तरुणींनी उत्स्फूर्तपणे या रॅलीत सहभाग नोंदविला तसेच विविध सामाजिक संघटनाही या रॅलीत सहभाग नोंदवत स्वातंत्र्यदिन साजरा केला. रॅलीचा मार्ग क्रांतीचौक ते पैठणगेट असा होता. रॅलीचे उद्घाटन सरस्वती भुवन महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. आनंद चौधरी सर यांच्या हस्ते मशाल पेटवून करण्यात आले. यावेळी विभागीय संघटक सुबोध जाधव, मंगेश निरंतर, दिपक जाधव, राहूल तायडे, अमोल दांडगे, उमेश राऊत, बाबू स्वामी, त्रिशूल कुलकर्णी, राजेंद्र वाळके आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँ 'शहनाई संगीत महोत्सव – २०१४'

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई – विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँन यांच्या पुण्यतिथीनिमित्त तापडिया नाट्य मंदीर, निराला बाजार येथे शनिवार, दि. २३ व रविवार दि. २४ ऑगस्ट २०१४ रोजी दोन दिवसीय शहनाई संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. महोत्सवाचे हे दुसरे वर्ष आहे. या दोन दिवसीय शहनाई संगीत महोत्सवाचे उद्घाटन मा. पं. विश्वनाथ ओक व सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सरचिटणीस मा. डॉ. श्रीरंग देशपांडे यांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र औरंगाबादचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल, औरंगाबाद विमानतळाचे संचालक मा.डी.जी. साळवे, अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळाचे संचालक मा. सुहास तेंडूलकर, विभागीय केंद्राचे संघटक सुबोध जाधव, रेणूका कड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांचे रोप, शाल, श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्याच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल मा. सुहास तेंडूलकर यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. सुहास तेंडूलकर यांनी केले, त्यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई – विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या चित्रपट चावडी, शहनाई संगीत महोत्सव, लोसंवाद अभियान, अभिसरण, शिक्षण

कट्टा, युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली, स्त्री भ्रूण हत्येविरोधी 'जागर' रॅली, युवा नेतृत्व शिबीरे अशा विविध उपक्रमांचा आढावा घेतला व आगामी उपक्रमांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल यांनी उद्घाटनपर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करत कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मुख्य सांगितिक कार्यक्रमास सुरुवात केली.

महोत्सवाच्या पहिल्या दिवसाची सुरुवात पुण्याचे प्रसिद्ध शहनाईवादक मा. डॉ. प्रमोद गायकवाड व त्यांची कन्या नम्रता गायकवाड यांच्या शहनाईवादनाने झाली. त्यांनी राग 'रागेश्री' व 'बे गुणको गुण दे' ही बंदीश सादर करत रसिकांची मने जिंकली. त्यांना तबल्यावर संजय अपार तर सीमा गायकवाड यांनी शहनाईवर साथसंगत केली. यानंतर जगमित्र लिंगाडे या बाल तबलावादकाचा स्पेशल सोलो सत्राची सुरुवात झाली. यात त्याने कायदा, रेले, तोडे आणि पेशकार सादर करत रसिकांची दाद मिळविली. त्याने तबल्यावर मिळविलेली हुकूमत त्याचे वेगळेपण सिद्ध करणारी आहे. जगमित्र लिंगाडे हा औरंगाबाद येथील अनंत भालेराव प्राथमिक शाळेत इ. ७ वी शिकतो आहे. महोत्सावाच्या पहिल्या दिवसाचा समारोप मुंबईचे प्रसिद्ध बासरीवादक व पं. हरीप्रसाद चौरसियांचे शिष्य पं. विवेक सोनार यांच्या बासरीवादनाने झाला. त्यांनी यावेळी बासरीवर राग मेघमल्हार सादर केला तसेच आलाप, जोड व नवमंत्र रचना सादर करुन राग दूर्गामध्ये एक ताल, दुत तीन ताल सादर करत रसिकांना चिंब भिजविले.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात औरंगाबादचे प्रसिद्ध बासरीवादक व औरंगाबाद पोलिस शस्त्रागार विभागाचे प्रमुख मा. प्राल्हाद शेळके यांच्या बासरीवादनाने झाली. त्यांनी 'राग हंसध्वनी' तसेच 'हिरो' या प्रसिद्ध हिंदी चित्रपटात गाजलेली धुन वाजवत त्यांनी उपस्थितांना उल्हसित केले. त्यांना संजय अपार यांनी तबल्यावर साथ-संगत केली. यानंतर औरंगाबादचे प्रसिद्ध शहनाई वादक व उस्ताद बिस्मिल्ला खाँन यांचे शिष्य मा. कल्याण अपार व प्रसिद्ध व्हायोलिन वादक इक्बाल खाँन यांची शहनाई व व्हायोलिन अशी जुगलबंदी सादर केली. तसेच मा. कल्याण अपार यांनी राग 'हेमंत' चे सादरीकरण केले. त्यांना तबल्यावर शोण पाटील यांनी साथसंगत केली. यानंतर महोत्सवाची सांगता बडोद्याचे (गुजरात) ज्येष्ठ कलावंत पं. विजयकुमार संत व त्यांचे पुत्र विश्वास संत यांनी सितार वादनाने केले. त्यांनी सितारवर छेडलेल्या प्रत्येक तारेतून त्यांनी स्वरांचे अलौकिक सौंदर्य प्रकट केले. राग 'बागेश्री' ने त्यांनी वादनाला सुरुवात केली. यामध्ये त्यांनी आलाप, जोड, झाला या पारंपारिक वादन शैलीनंतर विलंबित तीनतालांचा सुरेख नजराणा पेश केला. यानंतर घेतलेली पहाडी धून हृदयाचा ताबा घेणारी ठरली. सितारीच्या जुगलबंदीचा कळस चढवत बाप-लेकाच्या जोडीने रसिकांचा निरोप घेतला. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. महेश अचिंतलवार यांनी केले.

यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ, राज्य संघटक मा. नीलेश राऊत्त, अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळाचे संचालक मा. सुहास तेंडूलकर, विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल, राकेश कामटे, सुरज चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच महोत्सवाच्या यशस्वितेसाठी सुबोध जाधव, दिपक जाधव, मंगेश निरंतर, उमेश राऊत्त, रेणूका कड, त्रिशूल कुलकर्णी, बाबू स्वामी, राजेंद्र वाळके, प्रथमेश सामंत, मयुर देशपांडे आदींनी परिश्रम घेतले.

❑❑❑

# विभागीय केंद्र, पुणे
# कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे पुणे कार्यालयातील कामकाज मा. अजित निबांळकर अध्यक्ष, सचिव मा. अंकुश काकडे व खजिनदार मा. शांतिलाल सुरतवाला यांचे मार्गदर्शनाखाली चालते. कार्यालयीन कामकंाज संयोजक श्री. शं. त्रिं. भिडे तसेच अकाऊंटन श्री. सुनिल कदम व श्री. रवि सरनाईक पाहतात.

- **सहकारी गृहनिर्माण संस्था मॅन्युअल :**

सहकारी हौसिंग सोसायटीज मॅन्युअल मध्ये ९७ व्या घटना दुरुस्तीचे अनुषंगाने काय सुधारणा कराव्यात यासाठी ८ सदस्यांच्या समितीस कृषी व सहकार व्यासपीठाने आपल्या शिफारशी पाठवाव्यात अशी विनंती सदर समितीचे सदस्य अॅडव्होकेट जयंत कुलकर्णी यांनी केली. त्यास अनुसरुन व्यासपीठाची सभा बुधवार दि. १६ एप्रिल २०१४ रोजी घेण्यात आली. सदर सभेस नागपूर, नवी मुंबई, सातारा, ठाणे तसेच स्थानिक पुणे जिल्हा फेडरेशनचे पदाधिकारी, सहकार खात्याचे माजी अधिकारी, अतिरिक्त आयुक्त श्री. शेळके, अतिरिक्त निबंधक श्री. हजारे, विभागीय सहनिबंधक श्री. कोकरे, प्रतिष्ठानचे संयोजक श्री. भिडे, पंडित अन्य प्रथम व द्वितीय वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य युनियन अधिकारी इत्यादी हजर होते. ठाणे जिल्हा सहकारी हौसिंग फेडरेशननेही चर्चा सत्रासाठी आपले टिपण सादर केले होते. त्यावर चर्चासत्रात विचारविनिमय करुन मॅन्युअलमध्ये करण्याच्या दुरुस्त्या / शिफारशी या बाबतचा प्रस्ताव मा. सहकार आयुक्तांना तसेच या विषयासाठी गठीत केलेल्या समितीचे अध्यक्ष श्री. रसाळ, विभागीय सहनिबंधक, इंडिया हाऊस मुंबई याना श्री. अंकुशराव काकडे यांच्या सहीने दि. २६ एप्रिल १४ रोजी सादर केला.

या चर्चेच्या वेळी सातारा जिल्ह्यातील काही संस्थांच्या काही मोकळ्या जागेचा ताबा महसूल खात्याने ७/१२ वर महसूल खात्याचे नावावर परस्पर चढवलेचे तक्रार केली त्याबाबत माजी आयुक्त मा. रत्नाकर कुलकर्णी यांचा सल्ला घेऊन योग्य त्या कारवाईसाठी सातारा जिल्हा हौसिंग सोसायटी फेडरेशन यांना कळविले. त्याबाबत सातारा जिल्हा उपनिबंधकाशी श्री कटके फोनवर चर्चा करुन त्यांना पत्रही पाठविले आहे. त्यांनी हा प्रश्न महसूल अधिकाऱ्याशी घेण्याचे मान्य केले आहे.

- **सहकारी ई निवडणूका:**

सहकारी संस्थांच्या निवडणुकामध्ये व्होटींग मशिन्सचा उपयोग करण्याचे दृष्टीने दि. २७ ऑगस्ट १४ चे पत्राने शासकीय इंजनिअरींग कॉलेज पुणे यानी तयार केलेल्या व्होटींग मशिन्सचा उपयोग करण्यासंबंधीचा एक प्रस्ताव मा. मधुकरराव चौधरी सहकार निवडणूक आयुक्त यांना प्रतिष्ठानतर्फे सादर करण्यात आला आहे. त्यास अनुसुरुन डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, संचालक शासकीय इंजनिअरींग कॉलेज पुणे यांचे वतीने डॉ. ओहोळ, सहकार निवडणूक आयुक्त, सचिव सहकार निवडणूक प्राधिकरण, श्री. जोगदंड सहनिबंधक सहकारी संस्था श्री. वाडेकर, प्रतिष्ठानचे श्री. भिडे व ५ संबंधित विद्यार्थी यांची एक बैठक शासकीय इंजनिअरींग कॉलेज पुणे यांच्या कॉन्फरन्स रुममध्ये दि. ११.९.१४ रोजी भरली होती. ज्या विद्यार्थ्यांनी व्होटींग मशिन्स तयार केली आहे त्यांनी व्होटींग मशिन्सचे बैठकीतील सदस्यांना प्रात्यक्षिक दाखवून सदर मशिन्समध्ये शासनाचे जनरल इलेक्शनमध्ये वापरण्यात येणाऱ्या मशिन्सपेक्षा जास्त कोणत्या सुविधा आहेत त्या दाखविल्या. सहकार निवडणूक आयुक्त यानी आता त्यामध्ये काही सुधारणा सुचविल्या असून सहकार निवडणूक कार्यक्रमात सदर

यंत्राचे प्रात्यक्षिक घेण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. श्री. भिडे यानीही सदर मशिन्समध्ये आधार कार्डाची माहिती भरुन मतदाराची ओळख सदर यंत्रे स्वतःच तपासू शकतील अशी व्यवस्था दीर्घ मुदतीचे यंत्रातील सुधारणा करण्याचे दृष्टीने विचार करणेस सुचविले आहे. जेणेकरुन निवडणूक यंत्रणेसाठीचे मनुष्यबळ मोठया प्रमाणात कमी होऊ शकेल आणि निवडणूकीतील गैरप्रकारांना मोठया प्रमाणात आळा बसू शकेल. तसेच निवडणूक खर्चही मोठा प्रमाणात कमी होण्यास मदत मिळू शकेल.

- **सहकारी संस्था निवडणूक नियम २०१३ :**

शासनाने ९७ व्या घटना दुरुस्तीचे अनुषंगाने सहकारी निवडणूक प्राधिकरणाची तरतूद सहकारी संस्था कायदा दुरुस्ती दि. १४.२.२०१३ ने करण्यात आली. त्या अनुषंगाने सहकारी संस्था निवडणूक नियम दि. २६.८.२०१३ चे राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आले होते. मा. सहकार आयुक्तांनी दि. २७ मे २०१४ चे दैनिक महाराष्ट्र टाईम्स पुणे आवृतीमध्ये सदर निवडणूक नियम अंतिम करण्याचे काम हाती घेतल्याचे म्हटले होते. त्या अनुषंगाने शासनास अलहिदा सादर केलेल्या त्याबाबत दुरुस्तीच्या प्रस्तावाची एक प्रत दि. २७.५.२०१४ चे मा. अंकुशराव काकडे सचिव यांचे सहीचे पत्रासोबत मा. सहकार निवडणूक आयुक्ताना पाठविण्यात आली होती. त्यामध्ये निवडणूक नियमात ८२ सुधारणा दुरुस्त्या सुचविल्या आहेत.

त्या पत्राचे अनुषंगाने मा. सहकारी संस्था निवडणूक आयुक्त मधुकरराव चौधरी यांनी प्रतिष्ठानचे कृषी व सहकार व्यासपीठाचे संयोजक श्री. भिडे यांना चर्चेसाठी निमंत्रित केले होते. (जून २०१४) त्यावेळी प्रभारी आयुक्त ओउलकर सहनिबंधक (निवडणूक प्राधिकरण) श्री. वाडेकर, श्री. आनंद कटके, जिल्हा उपनिबंधक, सहसंस्था सातारा श्री. कुलगोड, उपनिबंधक इत्यादी हजर होते. प्रतिष्ठानचे वतीने सादर केलेल्या शिफारशीवर श्री भिडे यांनी व्यासपीठाची बाजू मांडली. सहकारी निवडणूक नियम अंतिम करण्याचे काम विधी व न्याय खाते महाराष्ट्र शासन यामधील उपसचिव श्री. भागवत व सहाकर खात्याचे अधिकारी श्री. वाघ यांचे चर्चेतून अंतिम करण्याचे काम चालू आहे. हे समजल्यावरुन श्री. भागवत यांना प्रतिष्ठानने दिलेल्या निवडणूक नियमामधील सुधारणांचीप्रतही पाठविण्यात आली आहे.

- **सहयोगी सभासद आणि सहसभासद :**

वरील विषयाबाबत शासनाने सहयोगी सभासद (associate member) आणि सहसभासद (joint member) याबाबत शासनाचा आणि मा. सहकार आयुक्त कार्यालयाचा गैरसमज झाल्यामुळे सहकारी हौसिंग संस्थांना येणाऱ्या अडचणीचा पाढा हौसिंग म्यॅन्युअलसाठी प्रतिष्ठानने घेतलेल्या सभेत जिल्हा सहकारी हौसिंग फेडरेशन नवी मुंबई व अन्य फेडरेशन यांनी दि. १६.४.१४ मध्ये वाचला.

त्याचे अडचणीचा आढावा मा. सहकार आयुक्तांनी काढलेले परिपत्रक क्र. गृह / डी३ / हौसिंग म्यॅन्युअल / तरतूद वगळणे / २०१३ दि. २४.१२.१३ यातील सहसभासदांची तरतूद सहकारी कायदा कानून मध्ये ९७ व्या घटना दुरूस्ती नंतर कोठेच नाही अशा प्रकारचा शासनाचा चुकीचा समज आणि प्रत्यक्षतः सहकारी संस्था नियम १६५ (२) चा (९) मधील त्याबाबत स्पष्टपणे असलेली तरतूद व त्याचा सहकारी संस्था नियम क्र. २० शी असलेला संबंध इत्यादी बाबतचा व्यासपीठाचा दृष्टीकोन, मा. सहकार आयुक्त श्री. मधुकरराव चौधरी यांना पत्र क्र. १९.४.२०१४ ने सादर करण्यात आला आहे. मा. श्री. चौधरीसाहेब यांचे निरोप समारंभाच्या दिवशी मा. सचिव सहकार यांच्याशी झालेल्या भेटीत याबाबत संदर्भ देण्यात आला. आणि नंतर मा. मधुकरराव चौधरी यांच्याशी इलेक्शन रूल्सचे चर्चेचे वेळी हा विषय इन्चार्ज सहकार आयुक्त श्री. ओउळकर यांच्याशीही प्रतिष्ठानचे संयोजक श्री. भिडे यांनी

उपस्थित केला असता मंत्रालयात घाई घाई मध्ये कोणा एका ॲडव्होकेटचे झालेल्या चर्चेचे अनुषंगाने सदर आदेश निघाल्याचे दिसते, असे माजी सहकार आयुक्त म्हणाले. त्या चुकीच्या आदेशाबाबत सहकारी बँकाच्याही अडचणी दिसतात. मात्र शासनाचे याबाबतचे धोरण बोटचेपे वाटते. आता असे समजते की प्रतिष्ठानने केलेल्या सूचनांवर विचार करुन सहयोगी सभासदांवर सहकारी गृह निर्माण संस्था उपविधीमध्ये जादा निर्बंध घालणेस आले असून त्याला संयुक्त सभासदाचे निकष लागू करण्यात आले आहेत. अशा प्रकारे एका चुकीचे परिमार्जन करण्यासाठी दुसरी चूक करण्यात आली आहे असे दिसते.

- **बॉटल गार्डनिंग स्पर्धा :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, वनराई व नित्यूंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान यांचे संयुक्त विद्यमाने वरील स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक वर्ष २०१३ – १४ मध्ये करणेत आले होते. यासाठी रेणुकास्वरूप प्रशालेच्या शिक्षिका सौ. प्रज्ञा पवार यांनी शिक्षक व शिक्षिकांना मार्गदर्शन केले. दि. १८.३.१४ रोजी वनराईचे एको हॉलमध्ये या स्पर्धा पार पडल्या. परिक्षक म्हणून वनराईचे सचिव श्री. गोमरकर व आनंद कृषी विद्यापीठाचे पहिले गोल्ड मेडॉलिस्ट प्रा. प्र.त्र्य. पंडीत यांनी परिक्षक म्हणून काम केले. या स्पर्धेमध्ये ३४ शाळातील ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यशस्वी शाळांना भिडे प्रतिष्ठानतर्फे उत्तम संस्कार कथा भाग २ आणि रुपये ४२५० रुपयाची रोख पारितोषिके वाटण्यात आली.

यंदाचे शैक्षणिक वर्ष २०१४.१५ साठीही इ. ८ वी व ९ वीचे विद्यार्थ्यासाठी सौ. प्रज्ञा पवार या पर्यावरण वाहिनी शिक्षिका रेणुकास्वरुप मुलींची शाळा, पुणे ३०. यांचे व वनराईचे मार्गदर्शनाखाली बॉटल गार्डनिंग स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. त्यासाठी बक्षिसाच्या रकमेचे आयोजन नित्यूंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे करण्यात येते. यंदा २२ ऑगस्ट १४ रोजी वनराई इको हॉल पुणे येथे पर्यावरण वाहिनी शिक्षकांसाठी मार्गदर्शन आयोजण्यात आले होते. त्याचप्रमाणे भिडे प्रतिष्ठानतर्फे १०० शाळांसाठी बियाणांचे वाटपाचाही कार्यक्रम घेण्यात आला. वनराईचे आग्रहावरुन गेल्यावर्षीचे रोख बक्षिसामध्ये रुपये २५००/– ची वाढ करुन एकूण रुपये ७५००/– बक्षिसे वाटण्यात भिडे प्रतिष्ठानने मान्यता दिली असून त्यापैकी रुपये ५०००/– अगोदरच वनराईकडे जमा केले आहेत.

- **कृषी व्याख्याने व चर्चासत्रे :**

बळीराजा शेतकरी मंडळाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी कृषी विषयावरील व्याख्याने प्रतिष्ठानचे पुणे कार्यालयात आयोजित करण्यात येतात.

| तारीख | विषय | वक्ता |
| --- | --- | --- |
| १.२.१४ | गुजरातेतील कृषी विकास दरात झालेली वाढ | प्रा. वार्ष्णेय, माजी कुलगुरु, आनंद विद्यापीठ |
| १.३.१४ | सेंद्रिय शेती व गांडूळ व्यवस्थापन | श्रीमती मंजूषा तडवळकर |
| ५.४.१४ | बदलत्या हवामानाचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम | डॉ. साबळे, माजी हवामान शास्त्रज्ञ |
| ३.५.१४ | आंबा व्यापारी लागवडीची अडचणी व त्यावरील उपाय | डॉ. भुजबळ |
| ७.६.१४ | औषधी वनस्पती | डॉ. खासेराव गलांडे |
| ५.७.१४ | जल शुद्धीकरणाचे नवे तंत्रज्ञान व जल जागृती | श्री. गोपाळ जोशी |
| २.८.१४ | ब्राझीलचे शेतकरी | श्री. प्र.बा. भोसले |

## पुणे केंद्र

- **राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य :**

दरवर्षी प्रतिष्ठानतर्फे एखाद्या नामांकित स्वच्छ

चारित्र्याचे व्यक्ती व कार्य या संबंधाने विद्यार्थ्यामध्ये जागृती करून त्याबात इयता ८ वी व ९ वी चे विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या स्पर्धा भरवत असतो. या कामी प्रतिष्ठानला वनराईचे सहकार्य मोठया प्रमाणात लाभत असते. यापूर्वी महात्मा गांधी, यशवंतराव चव्हाण, लाल बहादूर शास्त्री यांच्या वरील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य हा विषय घेण्यात आलेला आहे. त्यासाठी भिडे प्रतिष्ठानने विद्यार्थी व शाळा यांना पुस्तकांचे वाटप केले. यंदा प्रतिष्ठानने दि. २५ जुलै १४ रोजी शिक्षक, शिक्षिकांसाठी कथा कथनाची एक कार्यशाळा आयोजित करुन त्यासाठी साने गुरुजी संस्कार साधना या संस्थेची मदत घेतली. मुलांवर मनोरंजनातून ज्ञान आणि संस्कार करता यावेत हा या कार्यशाळेचा हेतू होता. सेवा ग्राम वर्धा येथील प्रमुख श्री. मठकर यांनी कार्यशाळेचे उद्घाटन करुन पर्यावरण व पाण्याबाबत आपण किती जागृत असणे गरजेचे आहे हे पोटतिडकीने सांगितले. प्रा. गरुड यांचे कथा कथन तंत्र व मंत्र या विषयावर सखोल व्याख्यान झाले. शाळांनी विद्यार्थ्यांसाठी राजर्षी शाहू महाराज जीवन व कार्य या विषयाबाबत महाराजांचे पुरोगामी विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्याचे दृष्टीने १७ शाळांमध्ये इ. ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी अंदाजे ३४०० विद्यार्थ्यांपुढे प्रा. गरुड यांचे व्याख्यानाचे आयोजन केले. याच विषयावर विद्यार्थ्यांसाठी प्रश्न मंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून ४० शाळांकडून २५४० उत्तर पत्रिका आल्या आहेत. यापैकी निवडक १२५ विद्यार्थी व ५० निवडक शिक्षक/पालक यासाठी २२ नोव्हेंबर १४ रोजी कै. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन येथे एक दिवशीय शिबीर घेणार आहोत. शिबिराचे आयोजन चालू आहे. याशिवाय विद्यार्थ्यांचे याच विषयावर शिक्षकांचे / विद्यार्थ्यांचे निबंध आले आहेत. उत्तर पत्रिका व निबंध तपासणीचे काम सुरु करण्यात येत आहे एक दोन महिन्यात त्याचे निकाल उपलब्ध होतील. त्यासाठी दि. २२ नोव्हेंबर रोजी बक्षिस समारंभाचे नियोजन करण्यात येईल. मुलांच्यामध्ये सभाधिटपणा व नेतृत्व गुण विकसित होण्याच्या दृष्टीने दरवर्षी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येतात. यंदाही राजर्षी शाहू महाराज या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजण्यात येणार आहे.

- **दुसरी हरित क्रांती :**

दि. २ ऑगस्ट २०१४ रोजी माजी केंद्रीय मंत्री (कृषी) शरद पवार साहेब यांच्या सदर मंत्री पदाचे कारकिर्दीमध्ये झालेल्या भाषणाचा मराठी अनुवाद ग्रंथाचा प्रकाशन समारंभ अमेय प्रकाशन तर्फे मा. पवार साहेब यांचे उपस्थितीत व डॉ. रघुनाथ माशेळकर यांचे हस्ते बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे दिमाखात पार पडला.

- **वारकरी अल्पोपहार, चष्मे व औषधे वाटप :**

दरवर्षी प्रमाणे दि. २२ जून रोजी पंढरपूरला जाणाऱ्या पालख्यांचा व त्या बरोबर असलेल्या वारकऱ्यांचा मुक्काम पुणे येथे असतांना प्रतिष्ठानतर्फे वारकऱ्यासाठी शिरा/ उपमा/बिस्कीटे व स्पेशल चहाचे वाटप सकाळी ५.०० वाजल्या पासून दुपारी १.०० वाजेपर्यंत करण्यात आले. त्याबरोबरच सुरतवाला ट्रस्टच्या पुढाकाराने वारकऱ्यासाठी चष्मे व औषधे वाटपाचा कार्यक्रमही पार पडला. तसेच वारकऱ्यांना न्याहरी ठेवता यावी म्हणून प्लॅस्टीकच्या टिफीन बॉक्सेसचेही वाटप करण्यात आले. या अल्पोपहारापोटी रु. ५९,४६१.०० खर्च प्रतिष्ठानला आला. येईल त्या प्रत्येक वारकऱ्याला अगत्य पूर्वक अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. बराचवेळ अल्पोपहारासाठीची रांग तिरंगा भवन ते सोन्या मारूती चौकापर्यंत फर्लांगापेक्षा जास्त लांब पसरली होती. या कार्यक्रमाचे आयोजन मा. अजित निबांळकर, अंकुश काकडे व शांतीलाल सुरतवाला यांनी केले. त्याला श्री. रवी सरनाईक, श्री. राशिवडेकर, जगमोहन सुरतवाला, गणेश चव्हाण, प्रल्हाद तापकीर, सुनिल खताळ,

रमेश भांड, शशिकांत सिन्नरकर, संजय राळे, अशोक जाधव, प्रशांत सुरतवाला इत्यादींनी सहाय्य केले.

- **अक्रोश अन्नदात्याचा :**

अक्रोश अन्नदात्याचा या वैदर्भिय लेखिका डॉ. प्रतिमा इंगोलो यांचे पुस्तकावर दि. ११.८.१४ रोजी कृषी व सहकार व्यासपीठाची चर्चा आयोजित केली होती. सदर पुस्तक म्हणजे वेळोवेळी लेखिकेने ग्रामिण जीवनातील वेगवेगळ्या अंगावर व संस्थांवर परखडपणे आपले अॅग्रोवनमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखांचा संग्रहच होय. त्यामध्ये शेतकऱ्याच्या हिताच्या अनेक योजना सुचविल्या आहेत. त्यांचा धांडोळा श्री. भिडे यानी घेतला. त्यावर झालेल्या चर्चेत सर्वश्री केकरे संचालक कॉसमॉस बँक, श्री. ढमाळ माजी व्यवस्थापकीय संचालक सहकारी साखर कारखाने आर्किटेक श्री पांडकर इत्यादी अनेकांनी सहभाग घेतला. समारोपाचे अध्यक्षीय भाषण प्रा. प्र. त्र्य. पंडीत यांनी केले. त्यात त्यांनी लेखिकेच्या विचाराचे जोरदार समर्थन केले. सदर पुस्तक त्याच दिवशी डॉ. बुधाजीराव मुळीक यांचे हस्ते प्रकाशित झाले. तर त्यावर साहित्य परिषदेचे सभागृहात डॉ. विवेक सावंत, मु. का. अधिकारी महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन यांचे प्रमुख वक्ते म्हणून तर डॉ. विजय भटकर (परम संगणक प्रवर्तक) यांचे अध्यक्षीय भाषणही झाले.

- **पुणे केंद्र प्रसिद्धी :**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कृषी व सहकार व्यासपीठाचे संयोजक श्री. शं. त्रिं. भिडे यांचे सहकार विषयावरील लेख खालील दर्शविलेल्या वार्तापत्रात प्रसिद्ध झाले आहेत.

| क्र. | लेखाचे शीर्षक | मासिकाचे नाव |
|---|---|---|
| १ | सहकारी संस्था निवडणुका | वास्तुदर्शन मासिक एप्रिल १४ |
| २ | कामावरील महिलांची शोषण मुक्ती | बँकींग आशय अभिप्राय एप्रिल १४ |
| ३ | महाराष्ट्र सहकारी संस्था नियम (दुरुस्ती) २०१३ | बँकींग आशय अभिप्राय फेब्रु. १४ |

❑❑❑

### मार्क्सवाद

मार्क्सवादाच्या मर्यादा या शतकाच्या उत्तरार्धात सुस्पष्ट होऊ लागल्या आहेत. तरीही ही गोष्ट कबूल केली पाहिजे, की मार्क्सवादाच्या आधाराने अनेक प्रश्नांची मीमांसा राजकीय दृष्ट्या स्पष्ट व्हायला मदत होते आणि त्यामुळे मार्क्सवाद हा आजच्या जगातील राजकीय विचार जीवनाचा बऱ्याच अंशी अंगभूत असा भाग झाला आहे. मार्क्सवादाचा अभ्यास माझ्या राजकीय जीवनात मला उपयोगी पडला आहे. मार्क्सवादाच्या अध्ययनामुळे आज त्याच्या मर्यादाही समजण्यास मदत होते. वर्गसंघर्षावर आधारित अशा विकासवादावर मार्क्सवाद आधारलेला आहे. या नजरेने परिशीलन केले, म्हणजे मानवजातीच्या इतिहासाच्या घडामोडींचे स्वरुप स्पष्ट होऊ लागते.

*– यशवंतराव चव्हाण*

# विभागीय केंद्र, नागपूर कार्यवृत्त

- **शनिवार, दि. १५ फेब्रुवारी, २०१४ – काव्यसादरीकरण**

विभागीय केंद्र, नागपूर व अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था, नागपूर यांच्या संयुक्त वतीने सुप्रसिद्ध कवयित्री सौ. स्वाती सुरंगळीकर यांच्या 'दिलखुलास' या रंगतदार एकपात्री काव्यसादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सध्या सोप्या शब्दात आशयघन कविता, माफक देहबोली आणि वाचिक अभिनय यांच्या माध्यमातून प्रसन्न व नाट्यपूर्ण शैलीत सादर करण्याची सौ. स्वाती सुरंगळीकर यांची हातोटी प्रशंसयनीय आहे. त्यांच्या या कार्यक्रमाचे अडीचशेच्या वर प्रयोग झाले असून त्यांनी विदेशातही याचे सादरीकरण केले आहे.

शनिवार, दि. १५ फेब्रुवारी, २०१४ रोजी सायं. ५.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मा. डॉ. गिरीश गांधी होते. सुप्रसिद्ध समीक्षक मा. डॉ. प्रज्ञा आपटे ह्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आसावरी इंगळे यांनी केले. याप्रसंगी अध्यक्षांच्या हस्ते मा. स्वाती सुरंगळीकर यांना लक्षवेधी कवयित्री म्हणून सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

- **यशवंतराव चव्हाण १०१ वी जयंती – बुधवार दि. १२ मार्च, २०१४**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या १०१ व्या जयंतीदिनानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने ''वाचन संस्कृतीचा लोप झाला आहे काय ?'' या विषयावरील व्याख्यानाचे बुधवार, दि. १२ मार्च, २०१४ रोजी दुपारी ४.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी सुप्रसिद्ध वक्ता मा. प्रा. हरी नरके, पुणे हे प्रमुख वक्ता म्हणून व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

- **पत्र परिषदेचे आयोजन – दि. १५ मार्च, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. १५ मार्च, २०१४ रोजी सायं. ५.०० वाजता राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथील ''संवादकक्षात'' यशवंतराव चव्हाण 'बखर एका वादळाची' या चित्रपटानिमित्त पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. पत्रपरिषदेला मा. डॉ. जब्बार पटेल, अभिनेते मा. श्री. अशोक लोखंडे यांनी संबोधित केले.

- **अमृत महोत्सवी सोहळा – दि. १६ मार्च,२०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर, दैनिक तरूण भारत व मित्र परिवाराच्या वतीने दै. तरूण भारतचे माजी मुख्य संपादक व विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष मा. श्री. वामनराव तेलंग यांच्या वयाची रविवार दि. १६ मार्च, २०१४ रोजी पंचाहत्तर वर्षे पूर्ण झालीत. या निमित्ताने त्यांचा अमृत महोत्सव समारंभ याच दिवशी सकाळी ९.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला. प्रसिद्ध कवी व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मा. श्री. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते, प्रसिद्ध कवी व विचारवंत

मा. डॉ. यशवंत मनोहर यांच्या प्रमुख उपस्थितीत व महापौर मा. श्री. अनिल सोले यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी लोकशाही वार्ताचे मुख्य संपादक मा. श्री. लक्ष्मणराव जोशी आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मा. डॉ. रुपाताई बोधी यांनी आपल्या मित्राच्या आठवणींना उजाळा दिला.

- **काव्यसंग्रह प्रकाशन समारंभ – दि. २२ मार्च, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने श्री. प्रसन्न शेंबेकर यांच्या 'प्राजक्त' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ शनिवार दि. २२ मार्च, २०१४ रोजी दुपारी ४.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला. हा प्रकाशन समारंभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत व विंग कमांडर मा. श्री. अशोक मोटे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी काव्य समीक्षक म्हणून मा. डॉ. सौ. संध्या अमृते उपस्थित होत्या.

- **रंगबावरी इंदिरा – काव्यमय नजराणा : बुधवार दि. २ एप्रिल, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने कवयित्री इंदिरा संत यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त इंदिरा संत यांच्या कवितांचा काव्यमय नजराणा ''रंगबावरी इंदिरा'' या कार्यक्रमाचे आयोजन बुधवार दि. २ एप्रिल, २०१४ रोजी सांय. ६.०० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यात आले.

हा कार्यक्रम प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरिश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मा. आशाताई बगे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची संकल्पना व लेखन मनीषा साधू यांचे होते तर शुभदा फडणवीस, पराग घोंगे व वैशाली उपाध्ये यांचा प्रामुख्याने सहभाग होता. कार्यक्रमाचे संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले.

- **कथासंग्रह प्रकाशन सोहळा : – शुक्रवार दि. १८ एप्रिल, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर व दिव्यम् प्रकाशन, नई दिल्लीच्या संयुक्त वतीने डॉ. दिनेश काळे यांच्या 'मन की तलाश' या हिंदी कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ व कथावाचन शुक्रवार दि. १८ एप्रिल, २०१४ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजन करण्यात आले.

हा प्रकाशन समारंभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व दै. लोकमतचे संपादक समन्वयक मा. श्री. कमलाकर धारप यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी दैनिक भास्करचे समुह संपादक मा. श्री. प्रकाश दुबे व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभाग प्रमुख मा. डॉ. वीणा दाढे हे वक्ते उपस्थित होते.

- **सत्कार समारंभ :– बुधवार दि. २१ मे, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु मा. डॉ. एस. एन. पठाण यांची भारत सरकारच्या भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद कमिटीच्या (I.C.C.R.) उपाध्यक्ष पदावर नेमणूक झाली यानिमित्ताने त्यांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले.

हा सत्कार समारंभ बुधवार दि. २१ मे, २०१४ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता श्री दत्ता मेघे वैद्यकीय अभिमत विद्यापीठाचे माजी कुलगुरु मा. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या शुभहस्ते व कविकुलगुरु

कालिदास संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरु मा. डॉ. पंकज चांदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

- **सभेचे आयोजन – बुधवार दि. २८ मे, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र, नागपूर येथील कार्याचा आढावा घेण्यासंदर्भात तसेच केंद्राच्या पुढील उपक्रमाच्या संदर्भात विचारविनीमय करण्यासाठी बुधवार दि. २८ मे, २१0४ रोजी सायं. ५.00 वाजता विभागीय केंद्राचे कार्यालय, राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक, नागपूर मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत कुठले कार्यक्रम व्हावेत (चर्चासत्र, व्याख्यान, स्पर्धा, प्रदर्शने, सहकार, ग्रामीण समस्या, साहित्य, संगीत इत्यादी) त्याचे स्वरूप, रुपरेषा, यावर विचार–विमर्श करण्यात आला. एकूण प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांचे नियोजन व आखणी हा चर्चेचा मुख्य उद्देश होता.

- **प्रकाशन समारंभ :- शुक्रवार, दि. ६ जून, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूर, संवेदना प्रकाशन, खापरखेडा, साहित्य विहार व मराठी बोली साहित्य मंडळ नागपूरच्या संयुक्त वतीने श्री. विठ्ठल लांजेवार यांच्या ''कागज की नाव'' या हिंदी बाल कविता–संग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम शुक्रवार, दि. ६ जून, २०१४ रोजी सायं. ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला.

हा प्रकाशन सोहळा साहित्य विहार नागपूरच्या मा. आशाताई पांडे यांच्या शुभहस्ते व प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी मा. श्री. पुष्पेंद्र फाल्गुन व मा. डॉ. गणेश चव्हाण हे वक्ते म्हणून उपस्थित होते.

- **कविसंमेलन :- मंगळवार, दि. २४ जून, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम मंगळवार दि. २४ जून, २०१४ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता मा. माधुरी अशिरगडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

याप्रसंगी मनीषा साधू, किरण मेश्राम, सुमती वानखेडे, वसंत वाहोकर, अविनाश महालक्ष्मे, गिरीश सपाटे, गणेश भाकरे, दीपक रंगारी, अरुणा देशमुख, शुभांगी रथकंठीवार, प्रसेनजीत गायकवाड, तिर्थराज कापगते, बळवंत भोयर, सुनीता झाडे, राजेश कुबडे, अमृता इंदूरकर, सुरुची नाईक यांचा सहभाग व सूत्रसंचालन मा. मेघना वाहोकर यांनी केले.

- **प्रकाशन समारंभ :- दि. ४ जुलै, २०१४**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नागपूर व नवदुर्गा प्रकाशन, कोल्हापूरच्या संयुक्त विद्यमाने डॉ. दिनेश काळे लिखित ''जावयाचं रामायण'' या नाटकाचा प्रकाशन समारंभ आणि नाट्यप्रवेश सोहळा शुक्रवार दि. ४ जुलै, २०१४ रोजी श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल शंकरनगर चौक, नागपूर येथे सायं. ५.३० वाजता प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष मा. डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. कमलाकर धारप समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून होते.

मा. श्री. किशोर आयलवार (ज्येष्ठ रंगकर्मी) मा. डॉ. सुनिल रामटेके (एस.एन.डी.डी. महिला विद्यापीठ, मुंबई) प्रा. संयुक्ता थोरात (ललितकला विभाग–नाटक) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ह्या याप्रसंगी पुस्तकावर आपले विचार व्यक्त केले.

❑❑❑

# विभागीय केंद्र, कराड
# कार्यवृत्त

### ❖ सौ. वेणूताई जयंती

सौ. वेणूताई भारतीय स्त्री जीवनाचा आदर्श होत्या. यशवंतरावजीच्या राजकीय जडण घडणामध्ये ति. विठामाता (मातोश्री) प्रमाणेच सौ. वेणूताईचा अग्रक्रमाने वाटा होता. स्व. कस्तुरबा गांधी, स्व. कमला नेहरु, स्व. लक्ष्मीबाई टिळक यांच्या मालिकेत सौ. वेणूताई होत्या. यशवंतरावजीनी त्यांच्या स्मारकाची योजना आखली. आदरणीय शरदचंद्र पवार साहेबानी ती पूर्णत्वाला नेली. सौभाग्यवती वेणूताई यांच्या पुतळ्याला हार घालून स्मरण केले जाते. आदरांजली वाहिली जाते.

स्व. यशवंतरावजीच्या जीवनात सौ. वेणूताईचे स्थान अत्यंत महत्वाचे होते. सौ. वेणूताई या साहेबांच्या जीवनातल्या फार मोठ्या जीवनसाथी त्यांच्या जाण्याने साहेबांच्या जीवनातील रसच संपला होता. सौ. ताईच्या प्रथम पुण्यतिथीला साहेब होते. सौ. वेणूताईच्या स्मरणार्थ सौ. वेणूताई ट्रस्टची स्थापना खुद्द साहेबानीच केली. स्व. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्रीच्या हस्ते या स्मारकाचे भूमिपूजन झाले. सन्माननीय शरदचंद्र पवार साहेबांच्या अथक परिश्रमाने हे पूर्णत्वाला नेण्यात आले. सौ. वेणूताई चव्हाण स्मारक उद्घाटन समारंभ ११ नोव्हेंबर २००१ ला स्व. गानसम्राट भीमसेन यांच्या हस्ते व सन्माननीय शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते झाले.

### ❖ यशवंतरावजी चव्हाण जयंती १२ मार्च २०१४

श्री. शिवाजी शिक्षण संस्थेच्या सर्व माध्यमिक शाळा, यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स व सौ. वेणूताई चव्हाण कलावाणिज्य महाविद्यालय तसेच शिक्षण मंडळ कराडचे टिळक हायस्कूल व रामविलास लाहोटी कन्या शाळा या सर्व शिक्षण संस्थातील मान्यवर प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यपिका, शिक्षक, शिक्षिका व सन्माननीय व्यक्ति यांच्यासह सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चेरिटेबल ट्रस्ट पासून स्व. यशवंतरावजींच्या प्रीतिसंगमावरील समाधीपर्यंत पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेच्या मध्यभागी स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेबाची भव्य प्रतिमा ठेवण्यात आली होती. 'यशवंतराव चव्हाण अमर रहे' या घोषणेने सर्व परिसर रोमांचित झाला होता. ही भव्य पदयात्रा प्रीतिसंगम बँकेच्या समाधीस्थळी पोहचल्यानंतर स्व. यशवंतरावजी चव्हाणांना श्रद्धांजली वाहण्याचा भावपूर्ण कार्यक्रम झाला. सन्माननीयांची अत्यंत भावपूर्ण भाषणे झाली. साहेबांच्या आठवणी सांगितल्या गेल्या.

'स्व. पी.डी. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने सकाळी ७.३० ते १०.३० वाजेपर्यंत कराड शहरातील शाळांत शिकणाऱ्या १२००० विद्यार्थ्यांनी स्वरसुमनांची भावपूर्ण श्रद्धांजली – आदरांजली वाहिली. श्रद्धांजली वाहण्यासाठी तालुक्यातील व जिल्हयातील अनेक मान्यवर नेते मंडळी दिवसभर समाधीस्थळी येत होते.

### ❖ यशवंतरावजी चव्हाण १३ मार्च २०१४ 'बखर एका वादळाची'

यशवंतरावजी चव्हाण यांच्या जीवनावर सन्माननीय महान दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी अत्यंत परिश्रम पूर्वक काढलेल्या सिनेमा फिल्मचा लोकार्पण सोहळा दि. १३ मार्च २०१४ रोजी यशवंतरावजींच्या समाधीस्थळी झाला. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या महान जीवनातील घटनांचा फार चांगल्या प्रकारे आढावा या सिनेमात घेतला आहे. १००% सत्य घटनावर आणि वस्तूस्थिती निदर्शक साहेबांच्या संपूर्ण जीवनाचा आढावा या सिनेमात घेण्यात आला आहे.

या सिनेमातील सर्व कलाकारानी जीव ओतून व मनापासून आपापली कामे केली. खुद्द यशवंतरावांचे काम करणारे कलाकार खरोखरीचेच यशवंतराव वाटतात मी १९४८ पासून साहेबांच्या सेवेत आहे. मा. जब्बार पटेलांच्या या सिनेमाला पाहून अक्षरशः मी रडलो. हा लोकार्पण सोहळा यशस्वी करण्यासाठी मा. आमदार बाळासाहेब पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यानी खूप परिश्रम घेतले. या सिनेमातील बहुतेक घटना देवराष्ट्रे व कराड शहराशी सबंधात असल्याने

शुटिंगच्यावेळी मी आवर्जुन उपस्थित होतो. यशवंतरावांच्या भूमिकेशिवाय सौ. वेणूताई ति. विठामाता यांच्या भूमिका फारच चांगल्या केल्या आहेत. 'विरंगुळा' हे यशवंतरावजीचे १९७९ नंतरचे निवासस्थान होय या परिसरातील सुमारे २०० पेक्षा जास्त लोकानी सामुदायिकरित्या हा सिनेमा 'प्रभात' थिएटर मध्ये एकाच वेळी पाहिला.

'लोकार्पण सोहळा' फार चांगल्या प्रकारे पार पडला. सन्माननीय जब्बार पटेल यांना सर्व कराडकर बंधू भगिनीनी शुभेच्छा दिल्या.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. संजय बनसोडे यांनी कराडमध्ये राहून खूप मेहनत घेतली. आमदार मा. बाळासाहेब पाटील त्यांचे सर्व सहकारी यांनी खूप मेहनत घेतली. डॉ. जब्बार पटेल यांच्या कौशल्यामुळे प्रदीर्घ काळच्या परिश्रमाने सिनेमा फारच चांगला झाला.

### ❖ ''सौ. वेणूताई चव्हाण पुण्यतिथी'' – १ जून २०१४

सौ. वेणूताई चव्हाण यांच्या ३१ व्या पुण्यतिथी निमित्त संस्कृती मंच, कराड प्रस्तुत 'पंडित प्रभाकर कारेकर' याची अभंग व नाट्यसंगिताची सुरेल मैफल सौ. वेणूताई चव्हाण सभागृहात आयोजित केली.

साथसंगत : तबला – नीलेश जाधव, परववाज – संदीप जाधव, संवादिनी – अनंत जोशी, टाळ – मारुती टाकळकर, गायनसाथ – संदेश खेडेकर

या संगीतातल्या विशेष कार्यक्रमासाठी मा. आमदार बाळासाहेब पाटील, अध्यक्ष यशवंतराव चव्हाण मुंबई विभागीय केंद्र कराड संपूर्ण वेळ हजर होते. सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृह पूर्ण भरले होते. स्वताः स्व. यशवंतरावजी व सौ. वेणूताई याना संगीताची आवड असल्यामुळे संगीताचा असाच भावमधूर कार्यक्रम १ जून ला होत असतो. यावर्षी प्रेक्षकांचा विशेष सहभाग जाणवला.

### ❖ स्वातंत्र्यदिन १५/८/२०१४

स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचे घर म्हणजेच 'विरंगुळा' यशवंतरावजी या वास्तुत अखेरची किमान ५ वर्षे राहिले. आज यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे विभागीय केंद्र कराडचे ऑफिस आहे. सन्माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्यामुळे आज संपूर्ण भारतात यशवंतरावजीच्या स्मृति जपल्या गेल्या आहेत. यशवंतरावजीचे अत्यंत महत्वाच्या कागदपत्राची जपणूक विरंगुळयात केली जाते. भारताचे सुपुत्र महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावजी यांच्या या विरंगुळयावर स्वातंत्र्यदिनाला राष्ट्रध्वज फडकविला जातो.

प्रतिष्ठानचे सचिव मोहनराव डकडे यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. यशवंतराव प्रतिष्ठान विभागीय केंद्राचे सर्व कर्मचारी या प्रसंगी आवर्जुन उपस्थित राहतात. साहेबांच्यावर मनापासून प्रेम करणारी काही लोकं यावेळी हजर असतात.

### ❖ ति. विठामाता पुण्यतिथी १८ ऑगस्ट २०१४

'शिक्षण ही एक शक्ति आहे' या तिर्थस्वरुप विठामातांच्या विचारानुसार त्यांनी अत्यंत गरीबीत आपल्या मुलांचा सांभाळ केला. यशवंतरावजींच्या सारखे मृत्सदी नेतृत्वाची जडण घडण ति. विठामातानी केली. अतोनात काबाडकष्ट करुन आपल्या मुलांची शिक्षणे पूर्ण केली त्यांच्यात स्वाभिमान निर्माण केला. आपल्या आईवर साहेबांचे जीवापाड प्रेम होते.

यावर्षी यशवंत एज्युकेशन सोसायटी देवराष्ट्रे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कराड व देवराष्ट्र याशिवाय महाराष्ट्र साहित्य परिषद फलटण यांच्या संयुक्त विद्यमाने देवराष्ट्र येथे 'यशवंतराव चव्हाण विचारधन एक सुवर्णठेवा' या अमर शेंडे यांच्या या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ मोहनराव डकडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मा. रविंद्र बेडकीहाळ सातारा जिल्हा प्रतिनिधी म.सा. परिषद पुणे, मा. प्राचार्य येवले यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले. विठामातांच्या पुण्यतिथी निमित्त फलटण वरुन २० लोक आले होते. त्यात काहीजण साहेबांचे नातेवाईक होते. यशवंतराव प्रतिष्ठान विभागीय केंद्र कराड मार्फत मुलांना केळी वाटण्यात आली. ग्रामस्थानी आगत्याने पाहुण्यांच्या जेवणाची व्यवस्था केली होती. विठामाताच्या पुण्यस्मरणार्थ नामवंताची व्याख्याने झाली.

❑❑❑

# विभागीय केंद्र, नाशिक
# कार्यवृत्त

नाशिक विभागीय केंद्राच्या विविध कार्यक्रमांसाठी विश्वात को. ऑप. बँक लि. नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, नाशिक, विश्वास कम्युनिटी रेडिओ ९०.८ एफ.एम., दादासाहेब फाळके फिल्म सोसायटी, सृजन कन्सलटन्टस्, नाशिक या संस्थाचे व त्यांच्या प्रतिनिधींचे सहकार्य मिळाले.

## 'चित्रपट चावडी'

'चित्रपट चावडी' या उपक्रमांतर्गत चित्रपट रसिकांसाठी दर महिन्याला जागतिक व भारतीय भाषांतील अभिजात व कलात्मक चित्रपट दाखविण्यात येतो.

**शनिवार, दि. ०१/०२/२०१४**

या उपक्रमांतर्गत रसिकांसाठी सुप्रसिद्ध चित्रपट समीक्षक अशोक राणे यांच्या इंडियन फिल्म ॲकेडमी निर्मित 'पडद्यामागच्या कथा' हा दृकश्राव्य कार्यक्रमाचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते त्यावेळी त्यांनी चित्रपटांचा प्रवास उलगडून दाखविला.

यावेळी उद्योजक जयंत जोगळेकर म्हणाले की, अभिजात तसेच जागतिक दर्जाचे चित्रपट प्रतिष्ठानतर्फे सातत्याने दाखविण्यात येत असून त्याचबरोबर चित्रपटविषयक चर्चा, कार्यशाळांचे आयोजन हे प्रेक्षकांची अभिरुची वाढविण्यासाठी महत्त्वाचे आहे.

कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व परिचय प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. अशोक राणे यांचा सन्मान जयंत जोगळेकर यांनी केला तर जयंत जोगळेकर यांचा सन्मान रघुनाथ फडणीस यांनी केला. कार्यक्रमास विजय अहलुवालिया, संतोष पाटील, दिलीप पाटील, प्रकाश वैद्य, अतुल देशमुख व नाशिककर रसिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

**शनिवार, दि. १५/०२/२०१४**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक फ्रँकॉई त्रुफाँ (फ्रान्स) यांचा 'दि ४०० ब्लोज' हा फ्रेंच भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

तेरा वर्षांच्या अंतोन डॉइनेल म्हणजे थोड्या फार फरकाने फ्राँकॉई त्रुफाँची ही स्वतःचीच कथा. आई-वडिलांच्या प्रेमाला पारखा झालेला व सामाजिक अर्थाने वाया गेलेला अंतोन पळू जाऊ पाहतो. घरापासून, शाळेपासून, बालसुधारगृहापासून. अंतोनचे हे सामाजिक ढोंगीपणा विरुद्ध केलेले बंड होते. फ्रान्स हा अतिशय कलाप्रेमी व रसिक लोकांचा तसेच सिनेमाचा जन्मदाता देश. त्या देशाची ही चित्रपट भेट खास नाशिकच्या चित्रपटप्रेमींसाठी 'चित्रपट चावडी'ने आणली आहे. १९४९ मध्ये प्रदर्शित झालेल्या या कृष्णधवल चित्रपटाचा कालावधी १०० मिनिटांचा आहे.

**शनिवार, दि. १५/०३/२०१४**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक फ्रेडरिको फेलीनी (इटली) यांचा 'ला स्ट्राडा' हा इटालियन भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. या चित्रपटासाठी रसिकांचा उस्फूर्त सहभाग लाभला.

**शनिवार, दि. १९/०४/२०१४**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक व्हिक्टर इराईस (स्पेन) यांचा 'द स्पिरिट ऑफ द बिहाईव्ह' हा स्पॅनिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

ॲना नावाच्या सहा वर्षांच्या मुलीची ही गोष्ट आहे. या चित्रपटाला स्पॅनिश नागरी युद्धाची पार्श्वभूमी आहे. स्पेनमधील एका खेड्यात घडणारी ही गोष्ट आहे. एक दिवस ॲनाची गाठ युद्धात जखमी झालेल्या सैनिकाशी पडते. या पार्श्वभूमीवर तिच्या मनात तयार झालेल्या भावनिक कल्लोळाची तुलना मधमाश्यांच्या पोळ्याशी केली आहे.

स्पॅनिश सिनेमा परंपरेत मानाचे स्थान असलेला हा चित्रपट साध्या कथानकातून युद्धाची भीषणता आणि कोवळ्या पिढीवर झालेला परिणाम अधोरेखित करतो. १९७३ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी ९७ मिनिटांचा आहे.

**शनिवार, दि. १७/०५/२०१४**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक आंद्रे वायदा (पोलंड) यांचा 'ॲशेस ॲंड डायमंडस्' हा पोलीश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. चित्रपटानंतर रसिकांमध्ये चित्रपटाची चर्चा चांगलीच रंगली होती.

**शनिवार, दि. २१/०६/२०१४**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक टॉम हूपर (ब्रिटन) यांचा 'किंग्ज स्पीच' हा ब्रिटिश भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. या कार्यक्रमास रसिक नाशिककरांचा चांगलाच प्रतिसाद लाभला.

**शनिवार, दि. १२/०७/२०१४**

'समांतर सिनेमा आणि भारतीय चित्रपटसृष्टी' या विषयावरील गणेश मतकरी यांच्या दृकश्राव्य व्याख्यानाचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाले.

कार्यक्राचे स्वागत व प्रास्ताविक राजेश हिवरे यांनी केले. गणेश मतकरी यांचा परिचय रघुनाथ फडणीस यांनी केला तर सन्मान डॉ. श्याम अष्टेकर यांनी केला. चित्रपट कार्यक्रमास रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शनिवार, दि. २६/०७/२०१४**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक लुई फिलिप रोया (पोर्तुगाल) यांचा 'द पॅसेज ऑफ नाईट' हा पोर्तुगज भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला.

चित्रपटाचे कथानक सतरा वर्षीय मारियाना ह्या शहरी मध्यमवर्गीय मुलीभोवती गुंफले आहे. मारियानाचे वडील व विशेष करून आई तिच्या भविष्याबद्दल जागरूक, काळजी करणारे आहेत. मारियानावर बलात्कार होतो पण मी कमालीची शांत व स्थिर रहाते. तरीही एका सहृदयी पोलिस अधिकाऱ्याची मदत नाकारते. पुढे गुन्हेगार पकडला गेल्यावर व कोर्टात खटला उभा राहिल्यावरही ती भावनाविवश न होता निश्चयाने सर्व सोपस्करांना सामोरी जाते. आज आपल्याकडे बलात्काराच्या व महिलांवरील अत्याचाराच्या अनेक घटना माध्यमातून समोर येत आहे व त्यावर साधकबाधक चर्चाही अनेक व्यासपीठांवरून होत आहे. त्या पार्श्वभूमीवर पोर्तुगालसारख्या युरोपमधल्या थोड्या मागासलेल्या देशात पोलिस, न्यायव्यवस्था व समाज या घटनेकडे कसे पाहतो? हे पाहणे उद्बोधक ठरते. २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचा कालावधी ९० मिनिटांचा आहे.

**शनिवार, दि. ०२/०८/२०१४**

प्रतिष्ठानच्या सभागृहात तीन बहुचर्चित लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले व दिग्दर्शकांशी रसिकांनी संवाद साधला.

शॉर्ट फिल्म म्हणजे गंभीर काहीतरी, उपदेशाचे डोस वगैरे असा काहीसा अनेकांचा समज झालेला आहे. मात्र, जे काही सांगायचे आहे ते थोडक्यात आणि आटोपशीर सांगत रसिकांपर्यंतही ते व्यवस्थितपणे पोहोचवण्याचे हे उत्तम माध्यम असल्याचे तीनही लघुपटांनी दाखवून दिले. त्यातही 'डोह' हा लघुपट रसिकांच्या विशेष पसंतीस उतरला.

अक्षय इंडिक दिग्दर्शित 'डोह', जयेश आपटे दिग्दर्शित 'द मिथ' आणि विक्रांत बच्छाव दिग्दर्शित 'खानाबदोश' या लघुपटांचा यात समावेश होता. सुरुवातीला 'द मिथ' हा लघुपट दाखविण्यात आला. नाशिकचाच दिग्दर्शक आणि संपूर्ण शूटही नाशिकमध्येच झालेल्या या लघुपटाचे हे पहिलेच स्क्रीनिंग होते. यात संस्कृतीच्या जगण्यातील प्रयोजनाचा नेमका अर्थ, संस्कृती म्हणजे नेमके काय? आणि त्यातून आजच्या बदलणाऱ्या वास्तवाशी कितपत संबंध टिकून आहे यावर चित्रण आहे. तर दुसरीकडे उच्चभ्रू सुशिक्षितही आपल्या जगण्यात अंधश्रद्धेला किती स्थान देतात आणि त्याचे बळी पडतात याचे सुरेख चित्रण या लघुपटात आले आहे. सदर लघुपटाचा कालावधी पंधरा

मिनिटांचा आहे.

'डोह' या लघुपटात नुकत्याच तारुण्यात पदार्पण केलेल्या तरुणीची कथा असून, तारुण्यात पदार्पण केल्यानंतर तिच्या वेगाने बदलणाऱ्या भावविश्वाचा तरल वेध 'डोह' मध्ये घेण्यात आला आहे. पहिल्यांदाच आलेला शारीरिक संबंध, पण तो अर्धवट राहिल्याने तिच्या मनातील गुंता, तिची स्वतःची स्पेस शोधणे, विचारांचे वादळ, संभ्रम, द्वंद हे दाखविताना दिग्दर्शकाने या अवस्थेतील गूढपणाचे सौंदर्य टिपण्याचा चांगला प्रयत्न केला होता. टीनएजसाठी असलेला हा लघुपट पालकांच्याही विशेष पसंतीस उतरला. त्यामुळेच त्यांच्या मनातील काहूर दिग्दर्शकाने नंतर संवादाच्या माध्यमातून दूर करण्याचा प्रयत्न केला. कारण या लघुपटात तिचा आलेला तरुणाशी शरीर संबंध, लोकलमधील तिची स्पेस, घरी आईशी नाते, आरसा, पाणी अशा अनेक गोष्टींची वीण होती. ती उपस्थितांना आपलीशी वाटत होती. या लघुपटाचा कालावधी वीस मिनिटांचा आहे.

'खानाबदोश' हा माहितीपटही ससिकांना चांगलाच आवडला. कोलकाता येथील नाट्यसंस्थेच्या प्रयोगशील कलाविष्काराचा वेध घेण्यात आला आहे. नाटक हे आता पूर्णतः व्यावसायिक झाले आहे. त्याचे स्वरूप मूळात पैसे कमवणे झाले आहे. पण कोलकाता येथील ही नाट्यसंस्था जनजागृतीचे काम नाटकांच्या माध्यमातून करते तेही कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता. मग ते कलाकार हे सगळे करताना त्यांच्यात काय ऊर्जा असते, त्यांनी मानसिकता काय, ते विस्थापितांसाठी हे काम करत असताना येणाऱ्या अडचणी, केवळ कोलकाता येथेच नाही तर महाराष्ट्र, झारखंड, बिहार येथेही ही मंडळी नाटकांच्या माध्यमातून जनजागृती करतात. नाटकासाठी येणारा अवाढव्य खर्च वजा करुन काही तरुण नाटक या माध्यमाचा एवढा चांगला उपयोग करतात, यामुळेच यावर लघुपट तयार करण्याची प्रेरणा मिळाल्याचे दिग्दर्शक विक्रम बच्छाव यांनी यावेळी सांगितले. या लघुपटाचा कालावधी एकोणतीस मिनिटांचा आहे.

यानंतर या तीनही लघुपट दिग्दर्शकांनी रसिकांशी संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले. नाशिककर रसिक लघुपट बघण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शनिवार, दि. २३/०८/२०१४**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक यिलमाझ गुने (टर्की) यांचा 'योल' (द रोड) हा तुर्की भाषेतील चित्रपट दाखविण्यात आला. रसिकांची उपस्थिती लक्षणीय होती.

## 'शिक्षणकट्टा'

**शनिवार दि. ०८/०२/२०१४ व रविवार, दि. ०९/०२/२०१४**

विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी आवड निर्माण व्हावी, यासाठी त्याच्यातील व्यक्तिमत्व विकासाला पूरक अशा शिकवण्याच्या पद्धती निर्माण करण्याची गरज आहे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊन चौफेर ज्ञानालाही दिशा मिळेल, हेच खरे शिक्षणप्रणालीचे ध्येय असावे, असे प्रतिपादन पुणे येथील ज्ञान प्रबोधिनीच्या ज्योती केमकर यांनी केले.

या उपक्रमांतर्गत 'जागर अभ्यासाचा' व 'सृजनशील पालक' या विषयावरील दोन दिवशीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ज्योती केमकर बोलत होत्या. सदर कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली.

विद्यार्थ्यांमध्ये स्मरणशक्ती वाढीसाठीची कौशल्ये, क्रिएटीव्ह थिंकिंग प्रॉब्लेम्स सोल्वींग अशा विविध विषयांवर शंतनु गुणे, दीपक गुप्ते यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांच्या पालकांशी ''सृजनशील पालकत्व'' या विषयावर समुपदेशकांनी संवाद साधला. पालकांनी विद्यार्थ्यांवर अपेक्षांचे ओझे न लादता त्यांच्या कलाने घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा. मानसिक, शारीरिक व बौद्धीक विकास हे शिक्षणाचे मुलतत्त्व आहे. रचनात्मक शिक्षणप्रणालीविषयी त्यांनीही मार्गदर्शन केले.

**शनिवार, दि. ०५/०४/२०१४ व रविवार, दि. ०६/०४/२०१४**

विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यास करण्यातील क्षमतांचा योग्य विचार करून करिअर घडवण्यासाठी दिशा ठरवावी. आपल्याला ज्या विषयात गती, आवड व आत्मविश्वास आहे

त्यातून निश्चितच यशप्राप्ती होत असते. आजच्या स्पर्धेच्या काळात विविध क्षेत्रात संधी निर्माण झाल्या आहेत त्याची निवड करुन विद्याशाखा निवडावी. बहुतेकदा आपल्या सोबतचा मित्र इंजिनिअरिंगला जातो म्हणून आपणही जावे ही मानसिकता धोकादायक ठरू शकते असे प्रतिपादन सृजन कन्सलटन्टचे शंतनु गुणे यांनी केले.

'दिशा दहावी नंतरची' या विषयावरील दोन दिवशीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात ते बोलत होते. सदर कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली.

विद्यार्थ्यांमधील उपजत कौशल्याला दिशा मिळावी व त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सातत्याने अशा कार्यशाळा भविष्यातही आयोजित करण्याचा मानस आहे.

**बुधवार, दि. २८/०५/२०१४**

या उपक्रमांतर्गत 'करिअरच्या दिशा' या विषयावरील डॉ. अशोक चोपडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक उत्क्रांती प्रतिष्ठानच्या प्राची कोठावदे यांनी केले. याप्रसंगी भुजबळ नॉलेज अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य विजय वाणी, रवींद्र अमृतकार तसेच पालक व पाल्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शुक्रवार, दि. १३/०६/२०१४**

प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झालेल्या 'सॉफ्टवेअर क्षेत्रातील करिअर संधी' या विषयावरील व्याख्यानात संजीव भामरे यांनी मार्गदर्शन केले.

सॉफ्टवेअर क्षेत्रात इंजिनिअर, प्रोग्राम ॲनालिस्ट, सपोर्ट स्पेशालिस्ट, डाटाबेस प्रोग्रामर, ग्राफिक डिझायनर अशी अनेक स्वतंत्र क्षेत्र उपलब्ध आहेत त्यातून नवीन शोधातून सर्वसामान्यांपर्यंत माहिती तंत्रज्ञानाचे युग अवतरले आहे. संगणक साक्षरता ही मूलभूत गरज ठरली आहे त्यासाठी जास्तीत जास्त युवकांनी या क्षेत्रात यावे. परदेशात जाण्याची संधी उपलब्ध असण्याबरोबरच आर्थिक उलाढाल या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. शालेय व विद्यापीठीय पातळीवर जास्तीत जास्त व्यवसायाभिमुख शिक्षण अभ्यासक्रमाचा समावेश करावा असेही श्री. भामरे पुढे म्हणाले. यावेळी सॉफ्टवेअर इंजिनिअर महेश रसाळ यांनीही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राजेश हिवरे यांनी केले. याप्रसंगी गणेश ओतूरकर, ज्योत्स्ना रांगणेकर, धनंजय जोशी, देवांग गुंजाळ, नमिता वाणी, अनिल सानप तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सोमवार, दि. २६/०५/२०१४ ते रविवार, दि. ०१/०६/२०१४**

'क्षमता संवर्धन' या विषयावरील आयोजित कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली.

शालेय अभ्यासाबरोबरच अष्टपैलूत्व सिद्ध करण्यासाठी विविध स्पर्धामधील सहभाग दिशादर्शक असतो. प्रयोगशील वृत्तीतून ज्ञान ग्रहण करण्याची आवड निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत. आनंददायी शिक्षणातून विकासाची नवी वाट विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे शिक्षण प्रणालीत शक्य झाले आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे मुख्य वक्ते यांनी केले.

नियमित अभ्यास व सातत्य ह्या प्रमुख बाबींचा अंर्तभाव असणे गरजेचे आहे. शालेय स्तरावर विज्ञानविषयक अभिरुची निर्माण करण्यासाठी संशोधनात्मक बदलांची माहिती देणे महत्त्वाचे आहे. यासाठी साध्या सोप्या भाषेत विज्ञानविषयक लेखन प्रकाशित करावे. यावेळी शंतनु गुणे यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली.

विद्यार्थ्यांमधील उपजत कौशल्याला दिशा मिळावी व त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

**शनिवार, दि. २८/०६/२०१४**

प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झालेल्या 'इंजिनिअरिंगमधील करिअर संधी व करिअर निवडीची पद्धत' या

विषयावरील व्याख्यानात संजीव भामरे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक राजेश हिवरे यांनी केले. कार्यक्रमास दिडशेहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

**शनिवार, दि. ०५/०७/२०१४ ते रविवार, दि. ०६/०७/२०१४**

'क्षमता संवर्धन' या विषयावरील दोन दिवशीय कार्यशाळेत मार्गदर्शक शंतनु गुणे यांनी विद्यार्थ्यांनशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाली.

शिक्षणात प्रयोगशीलता येण्यासाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज आहे. एखादी भाषा येणे म्हणजे केवळ त्या भाषेतले शब्द, वाक्य समजणे आणि त्याचा वापर करता येणे एवढेच नाही तर मनातल्या कल्पना, भावना आणि विचार या स्वतःलाच पूर्ण करण्यासाठी देखील भाषेची गरज असते.

भाषा कशी वापरायची याचे रितीरिवाज देखील समाजाकडून मिळत असतात. मुलांचे सांस्कृतिकविश्व आणि शिकणे यांचा मेळ घालणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम, पाठ्यक्रम मूल्यमापन व लोक सहभाग या घटकांच्या एकत्रित प्रयत्नातून शिक्षणात अमुलाग्र बदल पडू शकतात. यावेळी शंतनु गुणे यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली.

विद्यार्थ्यांमधील उपजत कौशल्याला दिशा मिळावी व त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सातत्याने अशा कार्यशाळा भविष्यातही आयोजित करण्याचा मानस आहे.

**शनिवार, दि. १९/०७/२०१४**

मनातला आत्मविश्वास जागवणाऱ्या 'आपणही जिंकू शकतो' या प्रसाद कुलकर्णी यांचा लोकप्रिय प्रेरणादायी कार्यक्रम प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाला.

प्रसाद कुलकर्णी यांचा सन्मान विश्वास ठाकूर यांनी केला तर राजेश हिवरे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास नाशिककर श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शनिवार, दि. २३/०८/२०१४**

'व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा' संस्थेच्या गंगापूर रोड येथील सभागृहात संपन्न झाली.

सदर कार्यशाळेत व्यक्तिमत्व विकासाची संकल्पना स्पष्ट करताना तज्ज्ञ प्रशिक्षक राजेश हिवरे यांनी सांगितले की, चांगल्या मूल्यांचे संस्कार मनावर बिंबवत प्रत्यक्ष विचार आणि आचरणातून ते कृतीत आणले तर सुंदर व्यक्तिमत्व घडते. व्यक्तिमत्व विकासासाठी महत्त्वाचा गुण म्हणजे 'पुढाकार' हा आहे. कोणत्याही कठीण प्रसंगी पुढाकार घेण्याची व आव्हान पेलण्याची ताकद आपल्यात असली पाहिजे. यासोबतच आपण एक सृजनशील कलाकार, उत्तम विश्लेषक, कठोर परिश्रम व मैत्रीपूर्ण मदतगार असणे महत्त्वाचे आहे. हे गुण विकसित करुन सर्व प्रसंगांवर मात करता येते.

कार्यशाळेदरम्यान व्यक्तिमत्व विकासाची संकल्पना, व्यक्तिमत्व विकासाचे विविध पैलू, स्वतःच्या क्षमता ओळखणे व कमतरता जाणून घेऊन त्या भरुन काढण्यासाठी नियोजन करणे, स्वतःचा व्यक्तिमत्व विकास आराखडा कसा तयार करावा, प्रतिकुल परिस्थितीत जीवनात यशस्वी झालेल्या व्यक्तींचा प्रेरणादायी अभ्यास करणे या विषयांवर विविध सत्रे घेण्यात आली. फिल्मच्या माध्यमातून जीवनात यशस्वी झालेल्या लोकांचा अभ्यास करण्यात आला. प्रत्येक सहभागी प्रशिक्षणार्थीने स्वतःचा व्यक्तिमत्व विकासाचा आराखडा यावेळी तयार केला.

कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी विश्वस्त दीपाली मानकर उपस्थित होत्या. त्यांनी सर्व प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन करुन कार्यशाळेत मिळालेले ज्ञान, कौशल्य व दृष्टिकोण सामाजिक विकासासाठी वापरावे असे आवाहन केले. त्यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे वाटप करण्यात आले. कार्यशाळेत १५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.

## 'मला भेटलेले शिल्पकार-चित्रकार'

**व्याख्याते - सुप्रसिद्ध कलासमीक्षक श्रीराम खाडिलकर**

**शुक्रवार, दि. २८/०२/२०१४**

भारतीय चित्रकार-शिल्पकारांनी आपल्या कलाकृतीतून स्वतःतील कलेचे अस्सल सत्व कलारसिकांसमोर आणले आणि त्यातूनच भारतीय चित्रशिल्प परंपरेला नवा विचार दिला हेच नव्या पिढीतील कलावंतांसाठी व रसिकांसाठी संचित आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कलासमीक्षक श्रीराम खाडिलकर यांनी केले.

श्रीराम खाडिलकर यांच्या भारतीय शिल्पकार-चित्रकारांच्या वैशिष्ट्यपूर्ण कर्तृत्वाचा वेध घेणाऱ्या 'मला भेटलेले शिल्पकार-चित्रकार' या दृकश्राव्य व्याख्यानाचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते.

प्रयोगशीलता आणि संशोधनवृतीतून अभिजात कलाकृती निर्माण करता येते, या ध्यासातून त्यांनी कलानिर्मिती केली. साध्यासाध्या घटना व प्रसंगातून जीवनाचा अर्थ, सारांश या कलावंतांनी जगासमोर आणला. यावेळी श्रीराम खाडिलकर यांनी बाबुराव पेंटर, द.ग. गोडसे, शंकर पळशीकर, हरकिशनलाल, के. एच.अरा, एन.एस.बेंद्रे, गोपाळ देऊसकर, ए.ए.रायबा अशा महान कलावंतांच्या चित्रनिर्मितीचा वेध दृकश्राव्य माध्यमातून घेतला. यातून त्यांच्या कामातील वेगळेपण समोर आलेच त्याचबरोबर कलेची साधना म्हणजे काय असते याचीही प्रचिती आली. शिल्पकार नारायण सोनवडेकर, विनायक करमकर, गणपतराव म्हात्रे या शिल्पकारांचे शिल्पकलेतील योगदान अचंबित करणारे आहे. यावेळी मदन गर्गे, अरुण गर्गे, शिवाजी तुपे, केशव मोरे, रामदास महाले या नाशिककर कलावंतांविषयीही त्यांनी चित्रशैलीविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व परिचय प्रतिष्ठानचे सदस्य संजय नागरे यांनी केला. श्रीराम खाडिलकर यांचा सन्मान डॉ. मनोज शिंपी यांनी केला. डॉ. मनोज शिंपी यांचा सन्मान चित्रकार रामदास महाले यांनी केला. व्याख्यानास चित्रकार राजेश सावंत, प्रफुल्ल सावंत, कैलास ह्याळीज, पंडित खैरनार, मुक्ता बालिगा, भि.रा.सावंत व कलारसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'यशवंतराव चव्हाण आणि आजचा महाराष्ट्र'

**मंगळवार, दि. ११/३/२०१४**

आजची बदलती सामाजिक मानसिकता, राजकारणाची बदललेली परिभाषा आणि मूल्यांचा ऱ्हास यामुळे सामान्य माणसाचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोण नकारात्मक झाला आहे. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी दिलेले योगदान आदर्श विचारांची जोपासना हे संचित आहे. त्याचा स्वीकार आणि अंगीकार आजच्या राज्यकर्त्यांनी करावा, त्यातून समृद्ध महाराष्ट्राचे चित्र पुन्हा नव्याने समोर येईल असे प्रतिपादन दिव्य मराठी या दैनिकाचे संपादक अभिलाष खांडेकर यांनी केले.

महाराष्ट्राचे थोर शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या १०१व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला अभिलाष खांडेकर यांचे 'यशवंतराव चव्हाण आणि आजचा महाराष्ट्र' या विषयावर प्रतिष्ठानच्या सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व आभार प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले. अभिलाष खांडेकर यांचा परिचय डॉ. कैलास कमोद यांनी करुन दिला तर सन्मान विश्वस्त संजय नागरे यांनी केला. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायकदादा पाटील, विश्वस्त डॉ. शोभा बच्छाव तसेच दिव्य मराठीचे संपादक जयप्रकाश पवार, प्राचार्य हरिष आडके, रमेश देशमुख, शरद पुराणिक, सुरेश मेणे, श्रीधर देशपांडे व नाशिककर रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वातंत्र्य सैनिक श्री. शामराव बोधनकर स्मृती पुरस्कार

**शनिवार, दि. २९/०३/२०१४**

स्वातंत्र सैनिक श्री. शामराव बोधनकर स्मृती पुरस्काराचे

वितरण प्रतिष्ठानच्या सभागृहात संपन्न झाले.

सामाजिक लेखनाच्या या पुरस्काराचे स्वरुप रुपये अकरा हजार रोख, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र असे आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायक पाटील व कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांच्या शुभहस्ते सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला. विनायकदादा पाटील पुढे म्हणाले की, मराठवाड्याला संत व स्वातंत्र्य संग्रामाची परंपरा आहे. त्यातून सामाजिक लेखनासाठीचा पुरस्कार नवे सामाजिक भान देणारा आहे.

दैनिक गांवकरीचे वरिष्ठ उपसंपादक स्वानंद बेदरकर 'सफाई' कादंबरीविषयी बोलताना म्हणाले की, समाजाच्या बधीरतेवर, असंवेदनशीलतेवर ही कादंबरी प्रहार करते. उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्याबरोबर आत्मविश्वास देण्याचे बळ यातून पानापानावर मिळते. सशक्त आशयद्रव्य समाजमनाचा वेध ही कादंबरी घेते. यानंतर सुमेध वडावाला-रिसबुड यांची मुलाखत डॉ. उर्मिला चाकूरकर यांनी घेतली. यावेळेस श्री. वडावाला यांनी लेखनाची सुरुवात, जीवनात आलेले अनुभव, लेखनाची प्रक्रिया, लेखनाशी तादात्म्य असण्याविषयी आपले मनमोकळे विचार मांडले. समकालाचा संदर्भ आणि लेखकाची जबाबदारी याविषयीही त्यांनी भाष्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा क्षेमकल्याणी यांनी केले तर स्वागत व प्रास्ताविक डॉ. राघवेंद्र चाकूरकर यांनी केले. तसेच पुरस्काराविषयी प्रा. राजाराम वट्टमवार यांनी माहिती दिली. याप्रसंगी प्रा. दीपक कासाळीकर, शिवानंद राहेगीकर, कीर्तीकुमार शिंदे, शरद पुराणिक, प्रतिष्ठानचे विश्वस्त संजय नागरे, विनायक रानडे व नाशिककर रसिक मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

## कॅलिग्राफी (सुलेखन) कार्यशाळा

**गुरुवार, दि. २४/०४/२०१४ ते रविवार, दि. २७/०४/२०१४**

अक्षरांचा प्रवास हा भावना आणि मन यांच्या समन्वयातून होत असतो. अक्षरांतून व्यक्त होणारा भाव हा मनाशी निगडित अवस्थांचे प्रतिबिंब असते. चांगला विचार हा सकारात्मक जाणीवेतून निर्माण होतो तसेच सुंदर, वळणदार व शुद्ध हस्ताक्षर हे मनाचा आरसा असते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध चित्रकार व सुलेखनकार नंदू गवांदे यांनी केले.

सुप्रसिद्ध कॅलिग्राफर, चित्रकार नंदू गवांदे यांच्या कॅलिग्राफी (सुलेखन) कार्यशाळेचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले आहे. त्याप्रसंगी चित्रकार नंदू गवांदे बोलत होते.

कुठलेही अक्षर आकार व रूप घेऊन येत असते, प्रत्येक अक्षराला स्वभाव असतो त्यातूनच अक्षर चित्राचा जन्म होत असतो. यावेळी त्यांची अक्षरांचा उगम, आकार याविषयी तसेच रेषा/आकार व्यायाम, स्वरलेखन शुद्धलेखन टिप्स, व्यंजन लेखन, शब्द वाक्यलेखन, अक्षरसंहिता सादरीकरण, स्ट्रोक्स या विषयावर तसेच संगीत व अक्षर, चित्र व अक्षर, या विषयावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. कार्यशाळेस मोठ्या संख्येने शिबिरार्थी सहभागी झाले होते.

## संगीत कार्यशाळा

**शनिवार, दि. १०/५/२०१४ ते रविवार, दि. ११/०५/२०१४**

डॉ. सलील कुलकर्णी यांच्या संगीत कार्यशाळेचे आयोजन प्रतिष्ठानच्या सभागृहात करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत ६५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

प्रदीप पेशकार यांनी संयोजकांच्या उपक्रमाचे कौतुक करुन सहभागी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. विश्वास ठाकूर म्हणाले की संगीत क्षेत्रात कलाकारांना खूप मोठा वाव आहे व त्याकरिता अशा शिबिरांची नितांत आवश्यकता आहे. कुठल्याही शहराची ओळख ही तेथील सांस्कृतिक, सामाजिक चळवळींवर अवलंबून असते तीच ओळख नाशिक शहराने जपली आहे.

दैनिक सकाळचे अतुल बापट, गंगापूर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकरराव काळे, माऊली केटरर्सचे अतुल कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

संगीत कार्यशाळेला मिळालेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल ओंकार शौचे यांनी सर्व सहकार्य करणारे आणि प्रशिक्षणार्थी यांना

धन्यवाद दिले. पियुष देसाई यांनी उपस्थितांचे आभार मानले. पं. भूषण शुक्ल यांनी सूत्रसंचलन केले. डॉ. सलील कुलकर्णी यांचा परिचय गॅलेक्सी इव्हेंट ऑर्गनायझर्सच्या खजिनदार रुचा दीक्षित यांनी करून दिला. डॉ. सलील कुलकर्णी यांना स्मृतीचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ देऊन गॅलेक्सी इव्हेंट ऑर्गनायझर्सचे अध्यक्ष ओंकार शौचे, सचिव रसिका नातू, उपाध्यक्ष शौनक जाखडी, मुग्धा कुलकर्णी यांनी त्यांचे स्वागत व सत्कार केला.

### अभिनय व व्यक्तिमत्व विकास शिबीर

**सोमवार, दि. १२/०५/२०१४ ते गुरुवार, २२/०५/२०१४**

'सृजन' उपक्रमांतर्गत आयोजित 'अभिनय व व्यक्तिमत्व विकास शिबिराच्या' समारोपाप्रसंगी सुनील ढगे बोलत होते.

सुप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक डॉ. प्रशांत वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानच्या सभागृहात हे शिबीर संपन्न झाले. ९ ते १७ वर्षे वयोगटातील मुला-मुलींचा शिबिरास उदंड प्रतिसाद लाभला. लहान मुलांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा या मागचा उद्देश आहे.

यावेळी सहभागी शिबिरार्थींना सुनील ढगे यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांनी सई परांजपे लिखित 'झाली का गंमत' व धनंजय सरदेशपांडे लिखित 'चम चम चमको' या नाटिका सादर केल्या. यात कादंबिनी ठाकूर, दर्शना नागपुरे, समृद्धी अमृतकर, ओम वाणी, ऋषिकेश फुके, तन्मय कुलकर्णी, सानिका बेलपाठक, परी बिरार, दिशा कोठावदे, पार्थ भटमुळे, परिक्षित यादव, नयन भालेराव, तन्वी संकलेचा, उज्ज्वल उगले, अनुज जोशी, आयुषा पगारे, देवयानी मोरे, धनश्री चव्हाण, हर्षवर्धन चव्हाण यांनी भाग घेतला.

याप्रसंगी नाट्य कलावंत दत्ता नागपुरे, जयदेव ठाकूर तसेच पालक व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत वाघ यांनी केले.

### 'लोकसंवाद'

**मंगळवार, दि. ०१/०७/२०१४**

वसंतराव नाईक यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात ते बोलत होते. कृषि उत्पन्न बाजार समिती सभागृह, निफाड येथे सदर कार्यक्रम संपन्न झाला.

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात नवनवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनी सज्ज व व्हावे. शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार करून शेती उत्पादनात वाढ करावी असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी वसंतराव नाईक यांच्या सहवासातील आठवणी कथन केल्या.

नाफेडच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल नानासाहेब पाटील यांचा सत्कार विनायकदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक, सूत्रसंचालन प्रतिष्ठानचे विश्वस्त संजय नागरे यांनी केले. कार्यक्रमास निफाडचे सरपंच अनिल पाटील कुंदे, उपसरपंच दिलीप कापसे तसेच बबनराव सानप, शिवाजीराव ढेपले, प्रमोद शिंदे, मधुकर शेलार आदी मान्यवर तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अपंग व्यक्तींना मोफत कुत्रिम अवयव व साधने वाटप शिबीर

**शनिवार, दि. ०५/०७/२०१४ ते रविवार, दि. ०६/०७/२०१४**

अंपग हक्क विकास मंच, समाजकल्याण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय-भारत सरकार, महात्मा गांधी सेवा संघ, समाज कल्याण विभाग, मोफत कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिराचे आयोजन कुसुमाग्रज स्मारक येथे करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते.

स्वागत व प्रस्ताविक करताना विजय कान्हेकर म्हणाले की, अपंगांचे जीवनमान उंचावण्यासाठी, सक्षमीकरण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही चळवळ आहे.

कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर म्हणाले की, अपंगांचे पुनर्वसन ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे, त्यातून मूलभूत स्वरूपाचा विकास साध्य होईल. शासनाने चांगले काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या मागे खंबीरपणे उभे रहावे व आर्थिक बळ उपलब्ध करून द्यावे. यावेळी अपंग बांधवांना तीनचाकी सायकली, कॅलिपर्स, श्रवणयंत्रे, कुबड्या, व्हील चेअर्स इत्यादींचे वाटप करण्यात आले.

समाजकल्याण विभागाचे पी.यू.पाटील यांनी अपंगांच्या विविध अडीअडचणी सांगितल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायक रानडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुहास तेंडूलकर यांनी केले.

## फिल्म मेकिंग कार्यशाळा

**शनिवार, दि. २६/०७/२०१४ ते सोमवार, दि. ०४/०८/२०१४**

श्रीराज फिल्म्स व मॅजिक माऊस फिल्म यांच्या संयुक्त विद्यमाने सहावी राष्ट्रीय फिल्म मेकिंग कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

दिग्दर्शक समीर रावसाहेब म्हणाले की, सिनेमा तंत्राची बेसिक माहिती महत्त्वाची असते, त्यातून नवीन टॅलेंट असलेले कलावंत समोर येतील. लेखक देवेन कापडणीस म्हणाले की, कुठल्याही कलेची गरज ही अभिव्यक्त होण्यात असते, त्यातून आपल्यातील गुणांना दिशा मिळत असते तोच विचार कार्यशाळेत आहे. दिपक बैरागी यांनी नाशिकमधील कलावंतांना सिनेमातंत्राची माहिती होण्यासाठी कार्यशाळेचा उद्देश असल्याचे सांगितले.

सदर कार्यशाळेस दिग्दर्शक व लेखक समीर रावसाहेब, रोहन शिवलकर, सुनील देव, देवेन कापडणीस व निलेश घुमरे यांनी सहभागींना मार्गदर्शन केले.

## स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला

### 'युवा स्वातंत्र्य ज्योती रॅली' चे आयोजन

**गुरुवार, दि. १४/०८/२०१४**

देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण करून त्यांच्या कर्तृत्वाची ज्योत देशाच्या विकासासाठी प्रत्येकाने आपल्यात रुजवावी, त्यातून देश विकासासाठी निश्चित विधायक काम करण्याची प्रेरणा समाजाला द्यावी असे प्रतिपादन प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी केले.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला 'युवा स्वातंत्र्य ज्योती रॅली'चे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

युवकांमध्ये राष्ट्रभावना जागृत होण्यासाठी व स्वातंत्र्याविषयी आदराची भावना जागृत होण्यासाठी 'युवा स्वातंत्र्य रॅली'चे आयोजन करण्यात येते. रॅलीमध्ये नाशिक शहरातील सर्व महाविद्यालयातील युवक-युवती, स्थानिक संस्था, संघटना, राजकीय पक्ष, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, प्रशासकीय अधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिक सहभागी झाले होते. सजवलेल्या बग्गीत अक्षता वाघ ही भारतमातेच्या वेषभूषेत होती.

रॅलीचा प्रारंभ मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय, शिवाजी चौक, जुने सिडको, नाशिक येथून होऊन अशोकवन कॉलनी - गोपालकृष्ण चौक - सप्तश्रृंगी चौक - भाजी मंडई - शिवाजी चौक - महात्मा फुले चौक - औदुंबर कॉलनी - राणाप्रताप चौक - शिवाजी चौक मार्गे रॅलीचा समारोप मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय, शिवाजी चौक, जुने सिडको येथे करण्यात आला.

समारोपानंतर प्रतिष्ठानचे विश्वस्त विनायक रानडे यांनी उपस्थितांकडून संविधानाचे वाचन करुन घेतले. सूत्रसंचालन राजेश हिवरे यांनी केले. रॅलीच्या यशस्वितेसाठी प्रतिष्ठानच्या विश्वस्त दीपाली मानकर यांनी संयोजन केले.

❑❑❑

# विभागीय केंद्र, लातूर
# कार्यवृत्त

## हिंगोली

**सकाळचे सत्र** : बुधवार दि. ५/२/२०१४ रोजी सकाळच्या सत्रात ११.०० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने मा. डॉ. श्रीराम गुंडेकर (१२ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष) यांचे साहित्यिक यशवंतराव चव्हाण या विषयावर व्याख्यान झाले. साहित्य हे मन समृद्ध करण्यासाठी असते. वैचारिक पातळी उंचावण्याचे काम साहित्यातून होत असल्याने यातून मन समृद्ध करावे असे आवाहन डॉ. श्रीराम गुंडेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक प्रा. विलास वैद्य हे होते. यावेळी बोलताना डॉ. गुंडेकर यांनी विश्वाससाहित्याचे वाचन करुन यशवंतरावाचे मन समृद्ध होते हाच वारसा युवकांनी जोपासावा असे सांगितले.

**दुपारचे सत्र** : दुपारी विद्रोही साहित्य परिषदेच्या प्रदेश अध्यक्षा मा. प्रा. प्रतिमा परदेशी यांचे साहित्यिक यशवंतराव चव्हाण या विषयावर व्याख्यान झाले. आज समाजात मल्टीप्लेक्स संस्कृती रुढ होत चालली असून त्रिकोणी कुटुंबात विक एंड सारखा चंगळवाद बोकाळत चालला असून युवकात काळात बदल्याची ताकद असलेली शक्ती ओळखून युवकांनी आपली ताकद ओळखून परिवर्तनवादी लढाईत साथ द्यावी असे आवाहन विद्रोही साहित्य परिषदेचे प्रदेश अध्यक्षा प्रा. प्रतिमा परेदशी यांनी येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित व्याख्यानप्रसंगी बोलताना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य व विभागीय केंद्राचे हिंगोली जिल्हा प्रमुख प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे हे होते. याप्रसंगी प्रमुख पाहूणे प्रा. विलास वैद्य व इतर मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. प्रतिमा परदेशी पुढे म्हणाल्या की, काळाच्या चाकाला परिवर्तनाची गती देण्याची ताकद युवकात असून समाजाच्या विकासाचा ध्यास घेण्याची युवकात शक्ती असली पाहिजे. समाजातील जुन्या चुकीच्या परंपरा बाजूला सारून आपला देश कसा समृद्ध होईल याकडे स्व. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने येथील व हिंगोली जिल्हयातील दोन्ही युवक–युवतींचा सत्कार विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे व इतर मान्यवरांचा हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. इंगोले यांनी केले.

## शिवजयंती उत्सव

बुधवार दि. १९/०२/२०१४ रोजी विभागीय केंद्राच्या वतीने जागतिक किर्तीचे राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने लातूर येथील शिवाजी चौकातील अश्वारुढ पुतळ्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे व ज्येष्ठ संचालक ॲड. मनोहरराव गोमारे, मा. श्री. लक्ष्मीरमण लाहोटी व इतर यशवंतप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.

रविवार दि. २३ फेब्रुवारी २०१४ रोजी पुढील कार्यक्रमाच्या रुपरेषाकरिता बैठक घेउन्न खालीप्रमाणे कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यात आली. बुधवार दि. १२ मार्च २०१४ रोजी लोकनेते यशवंतराव चव्हाण यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त उत्साही असे कार्यक्रम लातूर, नांदेड, हिंगोली व उस्मानाबाद या चारही जिल्हयाच्या ठिकाणी घ्यावयाची पूर्वतयारी, कामाची विभागणी, खर्चाचा अंदाज त्याचबरोबर नांदेड येथे वरील कार्यक्रम सकाळी व दुपारी घेण्याच्या संदर्भात चर्चा तसेच दि. ८ मार्च रोजी उस्मानाबाद येथे जागतिक महिला दिन कार्यक्रम घ्यावयाचे ठरले.

**जागतिक महिला दिन**

८ मार्च २०१४ रोजी उस्मानाबाद येथे ग्लोबल टेक्नीकल कॉलेज उस्मानाबाद येथे विभागीय केंद्राचे संचालक प्राचार्य डॉ. रमेशराव दापके यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

**लोकनेते यशवंतराव चव्हाण जयंती उत्सव**

बुधवार १२ मार्च २०१४ रोजी लातूर येथे लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचा १०१ वा मोठ्या थाटात जयंती उत्सव विभागीय केंद्राच्या वतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ विधिज्ञ व विभागीय केंद्राचे संचालक ॲड. मनोहरराव गोमारे हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रसिद्ध लेखक श्याम आगळे हे होते. दूसरे पाहूणे ॲड. उदयजी गवारे इ.

या कार्यक्रमाचा विषय – यशवंतराव चव्हाण एक मातृभक्त नेता

याप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. श्याम आगळे यांनी आपले मौलिक विचार मांडले. आईचे लहानपणाचे संस्कार व स्वतः त्यावेळी घरच्या गरीबीमुळे भोगलेल्या यातनांची कायम जाण ठेवूनच यशवंतरावंनी आपल्या राजकीय जीवनात राज्याची व या विशाल देशाची मनोभावे सेवा केली. जसे जिजाऊन्ने शिवाजी घडविला तसा विठाईने यशवंत घडविला असे म्हणणे यात काहीच वावगे ठरणार नाही. यशवंतरावाच्या आई विठाई या महान माता अशिक्षित पण सुसंस्कारित होत्या. यशवंतरावाच्या राजकीय जीवनात त्यांना अनेक चढउतार आले पण त्यांनी आपल्या चांगुलपणास कधीही तडा जाऊ दिला नाही, असे मौलिक विचार सुप्रसिद्ध लेखक प्रा. श्याम आगळे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव हरिभाऊ जवळगे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. साबदे जी.पी. यांनी केले. आभार प्रा. चिडबोणे यांनी मानले.

**नांदेड**

१२ मार्च २०१४ रोजी नांदेड येथील शास्त्री सभागृहात यशवंतराव चव्हाण जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने डॉ. भगवान अंजनीकर यांचे यशवंतराव चव्हाण – चरित्र व कार्य हे बालकुमारासाठी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध समिक्षक प्रा. भुजंग नाडीकर हे होते. यावेळी प्रा. उत्तम सुर्यवंशी, प्रकाशक निर्मलकुमार सुर्यवंशी, डॉ. जगदीश कदम, कादंबरीकार मा. नारायण शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

रविवार दि. १६ मार्च व सोमवार दि. १७ मार्च या दोन दिवशी होळी व धुलिवंदन या दोन्ही सणानिमित्त महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मुलन समिती लातूर व विभागीय केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने या दोन्ही सणात नको त्या गोष्टी जनतेने करु नये. सण जरूर साजरा करावा पण तो चुकीच्या पद्धतीने होऊ नये असे मोलाचे मार्गदर्शन महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे राज्य प्रधान सचिव मा. माधवजी बावगे यांनी केले.

**सोमवार दि. ३१ मार्च**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने सर्व जातीधर्माच्या सर्वसामान्य जनतेच्या सुखदु:खात लोकनेते यशवंतराव चव्हाण सदैव सहभागी होत असत विशेषतः जनतेच्या सुखापेक्षा दुःखात ते मनोमन सहभागी होऊन्न संबंधिताच्या दुःखाचे सात्वंन ते स्वतः करीत असत. या त्यांच्या इच्छेखातर विभागीय केंद्र लातूर त्यांच्या या विचाराच्या प्रेरणेने यशवंत तुमच्या गावी या नियमावलीप्रमाणे विभागीय केंद्रांतर्गत येणाऱ्या लातूर, उस्मानाबाद, नांदेड व हिंगोली या जिल्ह्यात मार्च एप्रिल २०१४ ला जी भयानक गारपीट होऊन्न शेतकऱ्यांचे नुकसान झाले. या नुकसानीचे असहाय्य दुःखाने काही शेतकरी दुःख सहन न झाल्यामुळे आत्महत्या करुन हे जग सोडले. अशा दुःखद प्रसंगी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन्न त्यांच्या कुटुंबियाचे सांत्वन विभागीय केंद्राच्या वतीने देवसिंगा ता.

तुळजापूर येथे गुडीपाडव्या दिवशी कै. श्रीराम गोविंद देवकर या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या घरी जाऊन त्या शेतकऱ्याच्या कुटुंबियाचे सांत्वन विभागीय केंद्राच्या वतीने करण्यात आले.

तसेच पुढे शनिवार दि. ५ एप्रिल २०१४ व रविवार दि. ६ एप्रिल २०१४ या दोन दिवसात वरीलप्रमाणेच आळणी ता. जि. उस्मानाबाद येथील कै. अनिल विठ्ठलराव कुलकर्णी तसेच देवळाली ता. कळंब जि. उस्मानाबाद येथील कै. राजेंद्र हरिश्चंद्र लोमटे यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियाचे सांत्वन करण्यात आले.

**शुक्रवार दि. ११ एप्रिल २०१४**

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त कॉक्सिट कॉलेज लातूर येथे आजच्या जिराईत शेतकऱ्यासमोरील आव्हाने या विषयावर प्रख्यात शेतीविषयी ज्ञान असलेले प्राचार्य डॉ. संजय वाघमारे यांनी आपले मौलिक विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉक्सिट कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम.आर. पाटील हे होते. या कार्यक्रमाला शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

**सोमवार दि. १४ एप्रिल २०१४**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

**गुरुवार दि. १ मे २०१४**

हिंगोली येथे शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या प्रसंगी लोकनेते यशवंतराव चव्हाण यांचे योगदान या विषयावर अनेकांनी आपले विचार मांडले.

उस्मानाबाद येथे जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

**बुधवार दि. ११ जुन २०१४**

साने गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूरच्या वतीने ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान बुधोडा ता. औसा येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात प्रसिद्ध विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव मा. श्री. हरिभाऊ जवळगे हे होते. प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे म्हणाले की, ''आपल्या राज्यात साने गुरुजीसारखा एक महान माणूस होवून गेला. यावर आजच्या शिक्षणमहर्षी व नाणे गुरुजींचा विश्वास बसत नाही. नाणे गुरुजी म्हणजेच पाहिजे त्या मार्गाने कमाई करणे. साने गुरुजींनी दुःखी, कष्टी माणसाची सेवा, त्यांच्या मुलीमुलींचे शिक्षण हीच खरी परमेश्वर सेवा असे मानले. आपल्या जीवनात आपला खरा गुरु आपली आईच असते. आईच्या संस्कारानेच साने गुरुजी घडले, वाढले मोठे झाले. त्यांनी आपल्या हातून विपुल लिखाण केले. त्यांची श्यामची आई हा ग्रंथ आपली ग्रामगीताच होय.''

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना हरिभाऊ जवळगे म्हणाले की, ''मी ३५ वर्षे शिक्षक म्हणून जी सेवा केली ती परमपुज्य साने गुरुजींच्या विचाराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून. आज ही तीच माझ्या जीवानाची वाटचाल आहे. आजच्या तरुण शिक्षक बांधवांना माझा सल्ला आहे की, इतर पेशापेक्षा आपला शिक्षकी पेशा फार आदराचा आहे. तो सर्वदृष्टीने जपला पाहिजे. आपण आपल्या मनाला साक्ष ठेवून तळागाळातल्या विशेषतः गरीब मुलांसाठी प्रयत्न करावेत.''

या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून श्री. धनराज सुरवसे (सहाय्यक प्रा. राष्ट्रीय फॅशन टेक्नॉलाजी मुंबई) व श्री. विजय जाधव (महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, लातूर) हे लाभले होते.

**मंगळवार दि. १७ जुन २०१४**

राष्ट्रमाता जिजाऊसाहेब यांची पुण्यतिथी पिपल्स कॉलेज नांदेड येथे साजरी करण्यात आली. प्रमुख वक्ते प्रा. उत्तम सुर्यवंशी हे होते. ते म्हणाले, ''राष्ट्रमाता जिजाऊ साहेब हे महाराष्ट्राचे प्रेरक दैवत आहे. स्वराज्याबरोबरच सुराज्य निर्माण

करणाचा आदर्श त्यांनी निर्माण केला.'' यावेळी डॉ. तस्नीम पटेल यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले हे होते.

**दि. २६ जुन २०१४**

छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई व्रिभागीय केंद्र लातूरच्या वतीने शाहू चौक येथील महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून जाहीर सामुहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

**शनिवार दि. २८ जुन २०१४**

शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे शिवाजी महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या कार्यक्रमानिमित्त राजर्षी शाहू महाराज व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण या दोन महामानवाच्या जीवनावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. श्रीराम कराळे मराठी विभागप्रमुख नांदेड विद्यापीठ व इतर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे हे होते.

**रविवार दि. २९ जुन २०१४**

आखाडा बाळापूर जि. हिंगोली येथे स्वातंत्र्यसेनानी दिपाजी पाटील यांची २३ वी पुण्यतिथी प्रतिष्ठानच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. महेश मोरे लिखित ''स्वातंत्र्यसेनानी दिपाजी पाटील हिरवे रान व पाऊस काळ'' या पुस्तकाचा लोकार्पण सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. सु.ग.चव्हाण, साहित्यिक नरेंद्र नाईक यांची भाषणे झाली. अध्यक्षस्थानी स्वातंत्र्यसेनानी भिमराव बोढारे हे होते.

**१ जुलै २०१४ डॉक्टर्स डे**

विभागीय केंद्राच्या वतीने लातूर येथे डॉक्टर्स डे साजरा करण्यात आला. याप्रसंगी आजच्या प्रदुषणावर काय उपाय शोधावे या विषयावर अनेक मान्यवर, डॉक्टरांनी आपले विचार मांडले. विभागीय केंद्राच्या वतीने काही सेवाभावी डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.

**शनिवार दि. १२ जुलै २०१४**

गुरुपौर्णिमेनिमित्त काही सेवाभावी प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षक, अध्यापक या मान्यवरांचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**शुक्रवार दि. १ ऑगस्ट २०१४**

बाळ लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे या दोन्ही महामानवांना विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी काही विद्यार्थी विद्यार्थीनींनी आपले विचार मांडले.

**शनिवार दि. ९ ऑगस्ट २०१४**

भारतीय स्वातंत्र्याच्या क्रांतीदिनानिमित्त देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून हौतात्म्य पत्कारलेल्या थोर स्वातंत्र्यसैनिकांना विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

**शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०१४**

भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने भारतीय स्वातंत्र्यदिन करण्यात आला. आपण आपले स्वातंत्र्य व सार्वभौमत्व टिकवण्यासाठी आपल्या देशावर कसे प्रेम करावे हे काही जाणकारांकडून सांगण्यात आले.

❑❑❑

# माहिती आणि तंत्रज्ञान प्रबोधिनी
# कार्यवृत्त

- फेब्रुवारी २०१४ ते ऑगस्ट २०१४ दरम्यान झालेल्या प्रशिक्षणाची गणती खालीलप्रमाणे.
  सी - डॅक - ०९
  खास प्रशिक्षणे - ०९
  औद्योगिक प्रशिक्षण - ०१
- फेब्रु. २०१४ च्या डॅक कोर्सच्या मुलांसाठी प्लेसमेंट प्राग्रोम सुरु करण्यात आला. त्याखाली मुलांच्या मुलाखती वेगवेगळया कंपनीमध्ये नियोजित केल्या गेल्या. काही मुलांना ह्या प्रक्रीयेआधारे नोकरी प्राप्त झाली. मागे राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रक्रिया अजून सुरु ठेवण्यात आली आहे.
- पुढील दिलेल्या कोर्सेस साठी खास उन्हाळी वर्ग आयोजित केले होते. DIT, DMC, TALLY, व लहान मुलांसाठी काही प्रायोगिक वर्ग. यासाठी लहान, माध्यमिक, SSC आणि HSC च्या मुलांनी गर्दी केली.
- डॅक कोर्समध्ये ॲडमिशन मिळविण्याकरिता प्रवेश परीक्षा देणे आवश्यक असते. ही प्रवेश परीक्षा उतीर्ण होता यावी म्हणून आपल्याकडे प्री–डॅक कोर्स चालविला जातो. ह्या कोर्सची एक बॅच आपण जुलै २०१४ मध्ये सुरु केली ती डिसेंबर २०१४ पर्यत चालेल.
- वरीलप्रमाणे अशीच सी–कॅट (डॅक प्रवेशपरीक्षा) आपल्या केंद्रात १५ जुन २०१४ रोजी घेतली गेली. जवळजवळ १३० मुले ह्या परीक्षेला आपल्याकडे होती. ह्यातून उतीर्ण मुलांना डॅक ऑगस्ट २०१४ मध्ये प्रवेश मिळाला.
- स्नानकोत्तर डॅक कोर्सची नवीन बॅच आपल्याकडे २० ऑगस्ट २०१४ ला सुरु झाली. ती फेब्रु. २०१५ पर्यंत चालेल.

**औद्योगिक प्रशिक्षणे**

- ॲक्सीस बँक कर्मचाऱ्याकरीता दि. ३ एप्रिल २०१४ रोजी व्यावसायिक कार्यशाळा आयोजित केली.
- टाटा कंपनी तर्फे घेतल्या जाणाऱ्या खालील व्यावसायिक परीक्षा आपण आपल्या केंद्रात आचरीत केल्या.
  a) JEE Assessment
  b) MPSC
  c) State Bank of India
  d) Reserve Bank of India
  e) IDBI Bank
- वेलटेक या दक्षिणी विद्यापीठाद्वारे एम. टेक. च्या अभ्यासक्रमाची प्रवेशपरीक्षा सी–डॅक तर्फे आपल्या केंद्रात दि. २५ जुन २०१४ रोजी आयोजित व आचरीत केली.
- महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितचे पक्षकार DIG (Prisons) याने आपल्या सहाय्याने दि. ९ ऑगस्ट २०१४ रोजी त्यांची व्यावसायिक परीक्षा आपल्या केंद्रात आचरीत केली.
- C-DAC ने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासक्रमाची व्यवस्था केली आहे. अकॅडमीने ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली. ह्या विद्यार्थ्यांसाठी या योजनेअंतर्गत PG DAC : Post Graduate Diploma in Advanced Computing हा कोर्स चालविला जातो. C-DAC तर्फे या कोर्समध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना AIT ने ट्रेनिंग दिले. या कोर्सचे वैशिष्ट म्हणजे हा कोर्स डॉ. बाबासाहेब आंबडेकर रिसर्च आणि ट्रेनिंग इन्स्टिटयूट कडून प्रायोजित केला गेला. C-DAC आणि BARTI यांच्या संयुक्तविद्यमाने ह्या कोर्ससाठी आलेल्या सर्व

विद्यार्थ्यांना अकॅडमीने उत्तमरीत्या प्रशिक्षण दिले. उतीर्ण विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवून देण्याचा उपक्रम अकॅडमीने चालविला. हा कोर्स मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मोफत उपलब्ध आहे व BARTI तर्फे शिक्षण भताही दिला जातो.

| Course | Fee | Stipend |
|---|---|---|
| PG Diploma in Advanced . Computing | रु. ८९,०००/– नि:शुल्क १००% फी सवलत | रू. ६,००० /– X ६ महिने |

- प्रतिष्ठान तर्फे चालविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितच्या खालील अभ्यासक्रम यशस्वी करण्यासाठी अकादमीने संपूर्ण सहाय्य केले.

  a) MS-CIT - 06

  b) WAVE - 01

- MS-CIT कोर्स प्रचलित असून १२० विद्यार्थ्यांनी आजवर आपल्या केंद्रात त्याचे प्रशिक्षण घेतले.
- मे २०१४ मध्ये CCACA कोर्स YCP च्या अंमलाखाली सुरु झाला. AIT ने हा कोर्स एक वर्षे चालविणार असे जाहीर केले. HSC उत्तीर्ण झालेले विदयार्थी हा कोर्स करुन ग्राफिक्स आणि ॲनीमेशन मध्ये कारकीर्द करु शकतात.
- CCAC फेब्रु. २०१४, ला सुरु होउन ऑगस्ट २०१४ ला संपला. हा कोर्स AIT ने ६ महिने चालविला. हा कोर्स पदवीधरांसाठी अनुरुप असून हयायोगे विदयार्थी Software Engineer म्हणून कारकीर्द करु शकतात.
- S.S.C. व H.S.C. च्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी मोफत सल्ला व व्याख्यान आयोजित केली होती. वाधे हायस्कूल, सेंट जोसेफ हायस्कूल, बीएमसी माध्यमिक हायस्कूल हया शाळामधील मुलांनी हया व्याख्यानांना उपस्थिती लावली. PGDAC व ARTS कोर्सेससाठी कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या. हया कार्यशाळा २३ जुन २०१४ व १६ जुलै २०१४ रोजी आचरीत झाल्या.
- एप्रिल २०१४ ला आपण Rotary Club च्या सयुंक्तविद्यमाने महानगरपालिकेच्या शाळामध्ये शिकणाऱ्या मुलींना प्रशिक्षण दिले.
- अशा प्रकारच्या प्रशिक्षणासाठी AIT ची लायन्स क्लब बरोबर बोलणी चालू आहेत.
- PGDAC फेब्रु. २०१४ कोर्सचे विद्यार्थी एस्सेल वर्डला सहलीसाठी गेले होते. सर्वांनी त्या उपक्रमाचा आनंद घेतला.
- डॅकची फेब्रु. १४ ची बॅच, ऑगस्ट महिन्यात संपली. त्यांना पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा म्हणून एक निरोप समारंभ व स्नेहभोजन ठेवण्यात आले होते. पुढील कार्यक्रमाचा आराखडा

  ए) डॅक बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी सहलीचे आयोजन

  बी) नवीन आर्टस बॅचची घोषणा व अंमलबजावणी

  सी) इंजिनीअरिंग कॉलेजेसमध्ये निशुल्क कार्यशाळा व भाषणे

  डी) MKCL चा KLiC कोर्स मोठ्या प्रमाणावर प्रचलित करणे व चालविणे हा पार्ट–टाईम कोर्स विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त कारकीर्द देऊ शकतो.

- गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करुन देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेस मध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणी नंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT (YCP) तर्फे लष्कर आणि पोलिसखात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटंबीय यांसाठी फी मध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते. रोटरी क्लब च्या सयुंक्तविद्यमाने खास पालिका शाळेच्या मुलीसाठी संगणकीय वर्ग घेण्यात येतात.

उद्देश : – वेगवेगळ्या मार्गाने व कार्यक्रमाद्वारे तसेच इतर संस्थाच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षणे चालविणे.

❑❑❑

# यशवंतराव चव्हाण यांचे जन्मघर (देवराष्ट्रे) उद्घाटन समारंभ वृत्तांत

मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मघर देवराष्ट्रे, तालुका कडेगांव, जिल्हा सांगली या प्राचीन व ऐतिहासिक वास्तूतील स्मारकाचा उद्घाटन समारंभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते गुरुवार दिनांक २६ जून २०१४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६० (सन १९६१ महाराष्ट्र अधिनियम १२) या अधिनियमाच्या कलम ४, पोट कलम (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन २६ जानेवारी २००१ रोजी हे जन्मघर प्राचीन व ऐतिहासिक स्मारक असल्याचे जाहीर केले आहे. ही जुनी वास्तू काळाच्या ओघात नादुरुस्त व पडीक झाली होती. त्यामुळे पुरातत्त्व विभागाने तिचे २००९ मध्ये पुनर्निर्माण केले.

शासनाच्या प्राचीन स्मारके व पुराणवस्तु शास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६० च्या अधिनियमाच्या १५ व्या कलमातील तरतुदीनुसार पुरातत्व विभागामार्फत 'महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजने अंतर्गत' पाच वर्षांसाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला या जन्मघराचे पालकत्व दिलेले आहे व त्याबाबतचा रीतसर करार दिनांक ११.३.२०१४ रोजी करण्यात आला आहे. सदर स्मारकाचा ताबा मिळाल्यानंतर प्रतिष्ठानने त्या वास्तूत मा. यशवंतरावांचे चरित्र दर्शविणारा आराखडा तयार करुन घेतला. तो शासनाच्या पुरातत्व विभागाच्या पॅनलवर असलेले वास्तुविशारद मे. गजबर अॅन्ड असोसिएटस्, कोल्हापूर यांनी तयार केला. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या अतिशय लहान जन्मघरात त्यांचे महान् कर्तृत्व दर्शविणारा हा आराखडा आहे. तो महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या उच्च समितीने मंजूर केला आहे. त्याप्रमाणे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मघरातील खोली क्र. ६, ५ व ४ यामध्ये त्यांचे आई वडील, भाऊ-बहीण, पत्नी, त्यांचे जवळचे सहकारी, त्यांच्या परिचयांतील कांही नामवंत साहित्यिक व कलावंत यांची छायाचित्रे लावण्यात आली आहेत. तसेच मा. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कारकीर्दीतील पार्लमेंटरी सेक्रेटरी ते मुख्यमंत्रीपदापर्यंतचा काळ दाखविण्यात आलेला आहे. त्यानंतर ३ व २ या खोल्यांमध्ये देशाचे संरक्षण मंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्र मंत्री व उपपंतप्रधान या पदावर असतानाचे फोटो लावण्यात आलेले आहेत. एका खोलीमध्ये मा. चव्हाणसाहेबांची भाषणे ऐकण्याची व चलचित्रे पाहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

एका लहानशा खेडयात जन्म घेतलेल्या मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जडणघडणीत त्यांच्या मातोश्री विठाई व वडील बंधू ज्ञानोबा आणि गणपतराव यांचे व इतर सहकाऱ्यांचेही योगदान होते. त्याचबरोबर यशवंतरावांनी स्वतंत्र बुद्धीने केलेले वाचन, समवयस्कांबरोबरची चर्चा व सखोल चिंतन यांतून त्यांचे व्यक्तित्व घडत गेले. कोणतेही कौटुंबिक उच्चतेचे किंवा ऐश्वर्याचे वलय नसतांना त्यांनी राज्याच्या व राष्ट्राच्या राजकरणात स्वकर्तृत्वाने उंच भरारी घेतली. त्यांच्या या कर्तृत्वातून तरुणाईला प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा आहे.

या स्मारकामध्ये सातत्याने लोक येत रहावे अशी प्रतिष्ठानची अपेक्षा आहे. या स्मारकाचा ताबा प्रतिष्ठानकडे पाच वर्षांसाठीच असल्याने या ठिकाणी महिन्याला एक याप्रमाणे प्रतिष्ठानमार्फत कार्यक्रम आयोजित करण्याचा मानस आहे. या कार्यक्रमांमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे हे कार्यक्रम गांवातील लोकांना उपयुक्त व उद्बोधक ठरतील अशी दक्षता घेण्यात येईल.

या स्मारकाचे उद्घाटन गुरुवार दि. २६ जून २०१४ रोजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदरावजी पवार यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाला महाराष्ट्राचे माजी. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, मा. श्री. अजित पवार, श्री. जयंत पाटील, श्री. संजय देवतळे व सिक्कीमचे राज्यपाल श्री. श्रीनिवास पाटील, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, सरचिटणीस श्री. शरद काळे, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले उपस्थित होते.

❑❑❑

## प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने :

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधिमंडळातील निवडक मराठी भाषणे - भाग १ - संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधिमंडळ - भाग २ - संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय. बी. चव्हाण - खंड १ ते ४ - संपादक : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | १०.०० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | २५०.०० |
| ०६. | म. जोतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ०८. | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन - अण्णासाहेब शिंदे | २००.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन - दादासाहेब रूपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन - पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास - संशोधक /लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दाचे सामर्थ्य - संपादन - राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाऊंटीफूल बनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र - खंड ४ (इंग्रजी) बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक - ना.धो. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई' बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य/फोटो) | १५०.०० |
| २१. | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २२. | शैक्षणिक गुणवत्ता : आव्हान आणि आवाहन – डॉ. वसंत काळपांडे | २००.०० |
| २३. | हवामान बदल आणि महाराष्ट्र | ५०.०० |
| २४. | उपक्रम: वेचक-वेधक - डॉ वसंत काळपांडे | १००.०० |
| २५. | स्त्री रत्न सावित्रीबाई फुले - श्रीनिवास भालेराव | २०.०० |
| २६. | स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २७. | 'संवादिनी - सुप्रिया सुळे | २०.०० |
| २८. | Appraising Schools - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| २९. | 'शाळांचे प्रगतिपुस्तक' - डॉ. वसंत काळपांडे, बसंती रॉय, शुभदा चौकर | २००.०० |
| ३०. | Yashwantrao Chavan an Autobiogrephy | ३९५.०० |
| ३१. | यशवंतराव चव्हाण आत्मचरित्र-कृष्णाकाठ | ३००.०० |
| ३२. | यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व आणि कर्तृत्व | ५००.०० |
| ३३. | शिक्षणव्रती - डॉ. कुमुद बन्सल | २००.०० |
| ३४. | शिक्षणकट्टा – बसंती रॉय | |

## डि.व्ही.डि व व्हिडिओ कॅसेट्स

- मी एस. एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट
- प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट
- पु. ल. वृत्तान्त : पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट
  वरील चारही व्हिडिओ कॅसेट्सची निर्मिती दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.
- कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शन - श्री. राम गबाले
- येस आय ॲम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट, दिग्दर्शन - विनय नेवाळकर
- 'बशर नवाज : ख्वाब, जिंदगी और मै' माहीतीपट, दिग्दर्शक - जयप्रद देसाई
- 'जागर हा जाणीवांचा -----' लघुपट, दिग्दर्शक - चंद्रकांत कुलकर्णी

AIT YCP

# ACADEMY OF INFORMATION TECHNOLOGY (YCP)

## Computer Training Institute With State Govt. Certifications & Central Govt. Certifications

- Basics / Advanced Computing
- Multimedia Miracle / Animation
- Programming Languages
- Post Graduation for B.E.s
- Hardware & Networking

Special Batches For Senior Citizens & Housewives

PLACEMENT ASSISTANCE



**Mobile no. : 9769256343**
**Telephone no. : 022 22817975 / 22043619.**
E-mail - ycpait@vsnl.com ,Website - www.ycpait.org
Add. : 5th floor, Y. B. Chavan Centre, Gen. J. Bhosle Marg, Opp. Mantralaya, Nariman Point, Mumbai - 400 021.



## आम्ही अनुभवलंय अभिसरण,
## तुम्हीही व्हा या प्रवासाचे सोबती...

**एक प्रवास घडण्याचा!** महाराष्ट्र देशाच्या वेगवेगळ्या विभागातील युवांनी इतर विभागांमध्ये जाऊन तेथील सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, भौगोलिक, राजकिय अन् ऐतिहासिक वैविध्य आणि संपन्नता समजून घेण्याची ही एक जाणीव प्रक्रिया! या प्रक्रियेदरम्यानचा संपूर्ण प्रवास हा एस.टी. बसने करावयाचा असून राहण्याची व्यवस्था स्थानिक कुटूंबांमध्ये करण्यात येणार आहे. महाराष्ट्र अधिक जाणिवेने समजून घेण्याची इच्छा असणाऱ्या युवांना अभिसरणामध्ये सहभागी होण्याचे हार्दिक आमंत्रण!

शोधूया स्वत:ला...
समजूया महाराष्ट्राला!

# अभिसरण

मोहिम | २०१४

निमंत्रक - खा. सुप्रिया सुळे

| विदर्भ ते पश्चिम महाराष्ट्र | मुंबई ते उत्तर महाराष्ट्र |
|---|---|
| बुधवार, दि. १० डिसेंबर ते गुरुवार १८ डिसेंबर २०१४ | रविवार, दि. २१ डिसेंबर ते गुरुवार १८ डिसेंबर २०१४ |

INTRASTATE YOUTH EXCHANGE PROGRAM



**प्रवेश अर्ज उपलब्ध** : www.ybchavanpratishthan.org • **प्रवेश पाठविण्याची अंतिम मुदत** : ५ डिसेंबर २०१४

**किशोर** 9890540088 • **प्रथमेश** 9890869312 • email : navmaharashtra@gmail.com

**नवमहाराष्ट्र युवा अभियान**, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जन.जगन्नाथराव भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - २१.